सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ | वर्ष – ३ रे | अंक २४७ | पाने : ८ | किंमत रु. ६/- | inbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# मायक्रोसॉफ्ट महाराष्ट्रात १७.५ अब्ज डॉलर्स गुंतवणार

## राज्य सरकार आणि मायक्रोसॉफ्ट कंपनीमध्ये मोठा करार; मुख्यमंत्री करारासाठी मुंबईत

**मुंबई :** राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मायक्रोसॉफ्ट सीईओ सत्या नडेला यांची आज मुंबईत बैठक झाली. मायक्रोसॉफ्टकडून मुंबईत मोठी गुंतवणूक करण्यात येणार आहे. याबाबत देवेंद्र फडणवीस आणि सत्या नडेला यांच्यात चर्चा झाली. आजच्या या बैठकीसाठी हिवाळी अधिवेशन सोडून देवेंद्र फडणवीस तातडीने मुंबई पोहोचले होते.

मायक्रोसॉफ्ट सीईओ सत्या नडेला यांच्यासोबत बैठक झाल्यानंतर देवेंद्र फडणवीसांनी माध्यमांशी बोलत नेमकी कोणती चर्चा झाली, याबाबत माहिती दिली. मायक्रोसॉफ्टचा महाराष्ट्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणुकीचा विचार आहे. मायक्रोसॉफ्टसोबत ग्लोबल कपॅबिलिटी सेंटर हा महत्वकांक्षी प्रकल्प करण्याचा प्रयत्न आहे. २० लाख स्क्वेअर फुटांची जीसीसी महाराष्ट्रात उभारण्यात येईल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

**४५ हजार लोकांना मिळणार रोजगार**

४५ हजार लोकांना जीसीसीद्वारे रोजगार उपलब्ध होतील. याबाबत लवकरच सामंजस्य करार करण्यात येईल, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले. महाराष्ट्राला एआय हब करण्याबाबत मायक्रोसॉफ्ट सकारात्मक आहे. बैठकीत प्राईम एआयओएसची चित्रफीत दाखवली. इतर क्षेत्रात एआय कसा वापर करता येईल त्यांसदर्भात चर्चा झाली, अशी माहिती देवेंद्र फडणवीसांनी यावेळी दिली. मायक्रोसॉफ्ट भारतात १७.५ अब्ज डॉलरची गुंतवणूक करणार आहे. अमेरिकन टेक कंपनीची ही




आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक असेल. या निधीचा वापर एआय, क्लाउड आणि डेटा सेंटर यांसारख्या पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी केला जाईल. भारताच्या स्वप्नाला पाठिंबा देण्यासाठी मायक्रोसॉफ्ट १.५७ लाख कोटी गुंतवत आहे. ही आशियातील आमची आतापर्यंतची सर्वात मोठी गुंतवणूक आहे. यामुळे भारतात एआयसाठी मजबूत पायाभूत सुविधा निर्माण होतील, लाखो लोकांना नवीन कौशल्ये शिकवली जातील आणि आपला डेटा आपल्याकडे सुरक्षित ठेवण्याची ताकदही मिळेल. भारताच्या एआययुक्त भविष्यासाठी हेच हवे होते, असं सत्या नडेला यांनी सांगितले.

## नक्षलवाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर : मुख्यमंत्री

**नागपूर :** केंद्र शासनाने देशातून २०२६ पर्यंत नक्षलवाद हद्दपार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. महाराष्ट्र या उद्दिष्टपूर्तीत एक पाऊल पुढे असून महाराष्ट्र नक्षल-



वाद मुक्त होण्याच्या उंबरठ्यावर उभे आहे. राज्य शासनाने राबविलेल्या दूरदृष्टी धोरणांमुळे आणि पोलिसांच्या प्रयत्नांमुळे हे शक्य होत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्यातून नक्षलवाद संपूर्ण संपुष्टात आणण्यासाठी अति दुर्गम भागात पोलीस चौकी सुरू कराव्यात. सर्व पोलीस चौकीमध्ये आवश्यक मनुष्यबळाची नियुक्ती करून सर्व सुविधा देण्यात याव्यात. नक्षलवाद मुक्त झाल्यानंतर परिसरातील नागरिकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी नवीन पोलीस चौकी झालेल्या ठिकाणी विविध कल्याणकारी कार्यक्रमांचे आयोजन करावे. अशा कार्यक्रमांमध्ये शासकीय योजनांचा लाभ गावकऱ्यांना देण्यात यावा. येथील युवकांसाठी रोजगार उपलब्ध करून द्यावा, तसेच सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करून स्थानिक उत्पादनांना विक्रीसाठी बाजारपेठ निर्माण करून द्यावी, असे निर्देशही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. ही आढावा बैठक विधानभवनातील मंत्री परिषद सभागृहात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

बैठकीस मुख्य सचिव राजेश अग्रवाल, अपर मुख्य सचिव ओ. पी गुप्ता, अप्पर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला, गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग, अतिरिक्त पोलीस महासंचालक शीरिंग दोरजे, केंद्रीय राखीव पोलीस बलाचे अतिरिक्त महासंचालक अजय शर्मा आदींसह वरिष्ठ पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## १६५ कोटी अपात्र लाभार्थ्यांनी लाटले

**पुणे :** राज्यातील लाडकी बहीण योजनेत तब्बल १६५ कोटी रुपये अपात्र लाभार्थ्यांनी लाटल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबतची लेखी उत्तरात कबुली दिली आहे. १२ हजार ४३१ पुरुषांनी २५ कोटी रुपये तर ७७ हजार अपात्र महिलांनी १४० कोटी, तर ९५२६ शासकिय महिला कर्मचाऱ्यांनी १४.५० कोटी रुपये लाटल्याचं आदिती तटकरेंनी माहिती देताना सांगितलं आहे. शासकीय अधिकारी कर्मचारी यांच्याकडून या पैशांची वसुली करून त्यांच्यावरती रितसर कारवाई केली जाणार असल्याचंही अदिती तटकरे यांनी उत्तर देताना म्हटलं आहे.

**लाडकी बहीण योजनेत पुरुषांसह शासकीय अधिकारी कर्मचारी महिलांचाही समावेश : अदिती तटकरे**



तर प्रत्येक गावात जिल्हा बँके मार्फत लाडक्या बहिणींना एक लाख रुपयांच बिनव्याजी कर्ज देण्याची मुख्यमंत्री यांची घोषणा कागदोपत्रीच असल्याचंही समोर आलं आहे. या योजनेसंदर्भात मुख्यमंत्र्यांनी घोषणा केली होती. मात्र अद्यापही शासन निर्णय जारी केला नाही. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत लेखी उत्तरात माहिती दिली आहे. योजना सुरू करण्यात आली तेव्हा सरसकट महिलांनी अर्ज केले होते. सुरूवातील या योजनेसाठी अर्ज करताना आधार क्रमांक, बँक खाते आणि पात्रतेची माहिती तपासण्यासाठी तांत्रिक पडताळणी होती. मात्र काही जिल्ह्यांत डेटा व्हेरिफिकेशनमध्ये गंभीर त्रुटी निर्माण झाल्याचं निदर्शनास आलं होतं. त्यामुळे अपात्र महिलांनीही अर्ज करून लाभ घेतला अशी माहिती समोर आली आहे. सिस्टममध्ये झालेल्या चुकांमुळे पुरुषांचे अर्जही मंजूर झाले. लाभार्थ्यांची पात्रता तपासण्यासाठी असलेली तपासणी यंत्रणा तांत्रिक दृष्टीने चुकीची असल्याचे निकष समोर आले आहे.

## साहेबांनी आमचे खूप लाड केले : पंकजा मुंडे

**बीड :** पंकजा मुंडेंनी नुकतेच वडील गोपीनाथ मुंडेंच्या आठवणींना उजाळा दिला, त्यांच्या संवेदनशील स्वभावाचे आणि मुलींप्रति असलेल्या आदराचे अनेक पैलू उघड केले. पंकजा मुंडेंनी सांगितले की, मुलाच्या जन्मानंतर सगळे बाळाकडे असताना केवळ त्यांचे वडील त्यांच्याजवळ आले आणि त्यांना त्रास झाला का, असे विचारले. त्यांच्या या कृतीतून वडिलांची संवेदनशीलता स्पष्ट दिसते.

गोपीनाथ मुंडे हे मुलींना सन्मानपूर्वक वागणूक देत असत आणि त्यांच्या निर्णयांचा आदर करत असत. त्यांनी दाखवलेल्या आदरामुळे मुली कर्तृत्ववान होतात असे पंकजा मुंडे यांचे मत आहे. एका अपघातातून सावरल्यानंतर त्यांनी सर्वप्रथम समोरच्या मुलाची चौकशी केली, हे त्यांच्यातील माणुसकीचे उत्तम उदाहरण आहे. पंकजा मुंडे स्वतःला केवळ त्यांची मुलगी नव्हे तर त्यांची शिष्या मानतात. गोपीनाथ मुंडेंची लोकप्रियता त्यांच्या मृत्यूनंतरही वाढताना दिसते, असे पंकजा मुंडेंनी नमूद केले.

## मुख्यमंत्र्यांनी घेतले चाकूरकर यांच्या पार्थिवाचे अंत्यदर्शन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ :** लोकसभेचे माजी अध्यक्ष शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने जवळपास सहा दशके राजकारणात सेवा देणारे राजयोगी, सुसंस्कृत, अजातशत्रू व्यक्तिमत्व हरपले. जात-धर्म-भाषा-पक्ष यासारख्या भिंतींच्या पलीकडे जावून त्यांनी सर्वपक्षीय नेत्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले. त्यांच्या जाण्याने राज्याच्या, देशाच्या राजकारणात मोठी पोकळी निर्माण झाल्याची भावना व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवराज पाटील चाकूरकर यांना श्रद्धांजली अर्पण केली.

लातूर येथे शिवराज पाटील चाकूरकर यांच्या देवघर निवासस्थानी त्यांच्या पार्थिवाचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी अंत्यदर्शन घेतले. तसेच त्यांचे पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, स्नुषा डॉ. अर्चना पाटील चाकूरकर व कुटुंबियांचे सांत्वन केले. आमदार संभाजी पाटील निलंगेकर, माजी आमदार बसवराज पाटील, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे यावेळी उपस्थित होते.

**राजकारणातील राजयोगी, सुसंस्कृत नेता हरपला : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

शिवराज पाटील चाकूरकर यांनी आपल्या राजकीय जीवनात लातूरचे नगराध्यक्ष ते केंद्रीय गृहमंत्री, पंजाबचे राज्यपाल, लोकसभेचे अध्यक्ष अशी विविध पदे भूषविली. अतिशय स्वच्छ चारित्र्य असलेल्या या नेत्याने आपल्या कार्यकाळात लोकसभा अध्यक्ष पदाचा नवा मापदंड निर्माण केला. राजकीय संस्कृती कशी असावी,



सुसंस्कृत नेता कसा असावा, याची प्रेरणा शिवराज पाटील चाकूरकर यांच्यापासून मिळते, असे मुख्यमंत्र्यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले.

आपण घेतलेल्या अनेक निर्णयांचे शिवराज पाटील चाकूरकर यांनी स्वतः फोन करून कौतुक केल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यावेळी म्हणाले. जलयुक्त शिवार अभियान राबविण्याचा निर्णय घेतल्यानंतर त्यांच्याशी प्रत्यक्ष भेटीवेळी झालेल्या चर्चेची आठवणही मुख्यमंत्र्यांनी सांगितली.

# माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन

## लातुरात आज शासकीय इतमामात होणार अंत्यसंस्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. १२ :** भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे ज्येष्ठ नेते तथा माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांचे शुक्रवारी सकाळी साडेसहाच्या सुमारास वार्धक्यामुळे निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या पार्थिवावर शनिवारी, दि. १३ डिसेंबर २०२५ सकाळी ११ वाजता शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

मागच्या काही दिवसांपासून वयोमानापरत्वे त्यांची प्रकृती ठीक नव्हती. त्यांच्यावर लातुरातील 'देवघर' निवासस्थानी उपचार सुरु होते. उपचारादरम्यानच शुक्रवारी सकाळच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या गांधी परिवाराशी घनिष्ठ संबंध असणाऱ्या प्रमुख नेत्यांपैकी शिवराज पाटील चाकूरकर एक होते. दि. १२ ऑक्टोबर १९३५ रोजी



लातूर जिल्ह्यातील चाकूर येथील एका शेतकरी कुटुंबात त्यांचा जन्म झाला. कोणतीही कौटुंबिक राजकीय पार्श्वभूमी नसताना स्वकर्तृत्वावर त्यांनी राजकारणात मिळवलेले नेत्रदीपक यश खरोखर प्रेरणादायी असे आहे. तत्कालीन लातूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष, लातूरचे आमदार, तब्बल सातवेळा लातूर लोकसभा मतदार संघाचे खासदार, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री, लोकसभा सभापती, केंद्रीय गृहमंत्री, पंजाब - चंदीगडचे राज्यपाल म्हणूनही त्यांनी कार्य केले आहे.

राजकारणात कार्यरत असतानाही एक निष्कलंक, स्वच्छ चारित्र्याचे नेते म्हणून त्यांची जीवनभर ओळख कायम होती. तत्वाधिनिष्ठित राजकारण करण्यावर त्यांचा नेहमीच भर राहिला आहे. त्यांची राजकीय कारकीर्द अशी राहिली आहे : लातूर नगर परिषदेचे अध्यक्ष दि. १ ऑगस्ट १९६६ ते दि. ३१ मार्च १९७०, आमदार लातूर : १९७२ ते १९८०, विधानसभा उपाध्यक्ष दि. ५ जुलै १९७७ ते दि. २ मार्च १९७८, विधानसभा अध्यक्ष महाराष्ट्र - १७ मार्च १९७८ ते ६ डिसेंबर १९७९, खासदार लातूर लोकसभा : वर्ष १९८० ते २००४, केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री - १९८० ते १९८२, केंद्रीय वाणिज्य मंत्री - १९८२ ते १९८३, केंद्रीय विज्ञान व तंत्रज्ञान मंत्री -१९८३ ते १९८४, लोकसभा उपसभापती- १९ मार्च १९९० ते १३ मार्च १९९१, लोकसभा सभापती -१० जुलै १९९१ ते २२ मे १९९६, केंद्रीय गृहमंत्री-२२ मे २००४ ते ३० नोव्हेंबर २००८, राज्यसभा सदस्य - ५ जुलै २००४ ते २२ जानेवारी २०१०, राज्यपाल, पंजाब-२२ जानेवारी २०१० ते २१ जानेवारी २०१५. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या पार्थिवावर शनिवारी सकाळी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. त्यांच्या पश्चात पुत्र शैलेश पाटील चाकूरकर, सून डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर, दोन नाती असा परिवार आहे.

## दोन तरुणांवर अचानक बिबट्याचा हल्ला

**पुणे :** पुरंदर आणि हवेली तालुक्यांना जोडणाऱ्या महत्त्वाच्या बोपदेव घाटात दुसऱ्या वळणावर बिबट्याने दोन तरुणांवर अचानक हल्ला केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या हल्ल्यात भिवरी (ता. पुरंदर) येथील गणेश लक्ष्मण कटके यांच्या खांद्याला गंभीर दुखापत झाली आहे.

गणेश कटके आणि त्यांचे सख्खे बंधू दत्तात्रय लक्ष्मण कटके हे दोघे बुधवारी (१० तारखेला) रात्री अंदाजे साडेदहा वाजता पुणे शहरातील आपले काम संपवून बोपदेव घाटातून आपल्या भिवरी गावाकडील घरी परतत होते. घाटातील दुसऱ्या वळणावर झुडपात दबा धरून बसलेल्या बिबट्याने त्यांच्या दुचाकीवर अचानक झडप मारली. बिबट्याच्या या हल्ल्यामुळे त्यांची दुचाकी रस्त्यावर कोसळली आणि यात गणेश कटके यांच्या खांद्याला मोठी दुखापत झाली.

कटके बंधूंवर बिबट्याने हल्ला केला त्याचवेळी त्यांच्या मागून पारगाव येथील भाजप नेते गणेश मेमाणे यांची चारचाकी गाडी येत होती. गाडीच्या प्रकाशाने आणि आवाजाने घाबरलेल्या बिबट्याने तात्काळ तेथून पळ काढला. त्यामुळे पुढील मोठा अनर्थ टळल्याचे मेमाणे आणि जालिंदर वाडकर यांनी सांगितले. जखमी गणेश कटके यांच्यावर सध्या पुणे येथील भगली हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत.

बोपदेव आणि दिवे घाट परिसरात बिबट्याचा वावर मोठ्या प्रमाणात वाढला असल्याचे स्थानिक नागरिक आणि भाजप नेते गणेश मेमाणे यांनी सांगितले. बिबट्या हा हिंस्त्र प्राणी असल्यामुळे परिसरातील नागरिकांनी रात्रीच्या वेळी प्रवास करताना विशेष काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

## थोडक्यात...

### शिर्डी परिसरात बिबट्याचा मुक्त संचार

**शिर्डी :** राज्यात विविध भागात बिबट्याच्या संचारामुळे दहशतीचं वातावरण असतानाच आता शिर्डी - साकुरी शिवेवर बिबट्याचा मुक्त संचार असल्याचे मोबाईल कॅमेऱ्यात कैद झालं. मानवी वस्तीजवळ बिबट्या दिसल्याने नागरिक मात्र चांगलेच घाबरले आहेत. वन विभागाने लवकर बिबट्याचा बंदोबस्त करावा अशी मागणी करण्यात येत आहे.

### पंढरपुरात ऊस दराचं आंदोलन पेटले

**पंढरपूर :** पंढरपुरात ऊस दर आंदोलन पेटलं असून आक्रमक झालेल्या शेतकरी संघटनेचे कार्यकर्त्यांनी ४ ट्रॅक्टरचे एकूण ३२ टायर फोड. त्यामुळे ऊस वाहतूक ठेकेदारांचे लाखो रूपयांचे नुकसान झालं आहे. वाखरी येथे रात्री शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी टायर फोडून ऊस वाहतूक रोखली. गेल्या ५ दिवसांपासून पंढरपुरात ऊस आंदोलन सुरू आहे.

### विमानतळावर ७२ लाखांचा गांजा जप्त

**पुणे :** पुणे विमानतळावर महिलेकडून ७२ लाख रुपयांचा गांजा जप्त, बँकॉक ते पुणे या विमानाने आलेल्या महिलेने चिप्सच्या डब्यात ७२२ ग्रॅम गांजा लपवला होता. अखेर पुणे विभागाच्या एअर इंटेलिजन्स युनिटने कारवाई करून त्या महिलेला अटक केली आणि लाखोंचा गांजा जप्त केला.

### आठ जिल्ह्यात कुणबी प्रमाणपत्र

**जालना :** मनोज जरांगे पाटील यांच्या मुंबईतील आंदोलनानंतर २ सप्टेंबर रोजी निघालेल्या हैदराबाद गॅझेटियर जीआरनुसार मराठवाड्यातील आठ जिल्ह्यात साडेतीन महिन्यांमध्ये मराठा समाजाला केवळ ९८ कुणबी ओबीसी प्रमाणपत्रे मिळाली आहेत. त्यासाठी केवळ ५९४ जणांनी अर्ज केले होते. ९८ अर्ज मंजूर केल्यानंतर प्रमाणपत्र वाटपाची कार्यवाही करण्यात आलीय. त्यात सर्वाधिक ४४५ अर्ज ही एकट्या परभणी जिल्ह्यातील आहेत. परभणी जिल्ह्यात त्यापैकी ४७ कुणबी प्रमाणपत्र मिळाली आहेत. उर्वरित अर्जाची चौकशी सुरु असल्याचं सांगितलं जातंय.

### जिल्हा परिषद निवडणुका लांबणीवर

**मुंबई :** राज्यातील जिल्हा परिषदेच्या निवडणुका लांबणीवर पडणार असल्याचे संकेत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी दिले. त्यामुळे निवडणुकीतील गोंधळ अजूनही निस्तारलेले नसल्याचे दिसून येते. अगोदर महापालिका निवडणुका होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. मनपा निवडणूक या जानेवारी महिन्यात होणार असल्याची शक्यता त्यांनी वर्तवली आहे.

### एक चांगले नेतृत्व गमावले : पंकजा मुंडे

**बीड :** पंकजा मुंडे यांनी यावेळी मुंडे साहेबांच्या अनेक आठवणी सांगितल्या. त्यांच्या आठवणी खूप आहेत, मात्र आमच्यापेक्षा जनतेसोबत ते जास्त असायचे, असे त्यांनी सांगितले. यावेळी ज्येष्ठ नेते शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने दु:ख व्यक्त करताना पंकजा मुंडे म्हणाल्या की, ते देशपातळीवर नाव कमावलेले नेते होते. त्यांच्या निधनाने मराठवाड्याचे मोठे नुकसान झाले आहे. त्यांच्या जाण्याने त्यांची कमी लोकांना नक्कीच भासणार आहे. एक चांगले नेतृत्व गमावल्याची खंत यावेळी पंकजा मुंडे यांनी व्यक्त केली.

### तेजवानीला १५ तारखेपर्यंत कोठडी

**पुणे :** एका वृत्तवाहिनीने उघडकीस आणलेल्या पुणे जमीन गैरव्यवहार प्रकरणी आरोपी असलेल्या शीतल तेजवानीला १५ तारखेपर्यंत पोलीस कोठडी सुनावण्यात आली आहे. यापूर्वी देखील शीतल पोलीस कोठडीत होती, मात्र ती पोलिसांना तपासात सहकार्य करत नसल्याचे पोलिसांनी पुणे न्यायालयात सांगितले आणि अधिक चौकशीसाठी तिची पोलीस कोठडी वाढवून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर आता अधिक चार दिवस शीतल तेजवानी ही पोलीस कोठडीत राहील.

### ठाकरे नागपुरात पर्यटनासाठी आलेत : उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**नागपूर :** नागपुरात विधान सभा आणि परिषदेचं हिवाळी अधिवेशन सुरु आहे. अशातच गुरुवारी शिवसेना णइढ चे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेऊन सरकारच्या कामकाजावर टीका केली. यावर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी मीडियाला प्रतिक्रिया देताना उद्धव ठाकरेंवर टीका केली आणि ठाकरे पर्यटनासाठी आलेत असं म्हटलं.

### शिवरायांचा इतिहास दुर्लक्षित नाही : पंकज भोईर

**नागपूर :** छत्रपती शिवाजी महाराजांवरील



सीबीएसई अभ्यासक्रमातील माहिती अपुरी असल्याच्या विरोधकांच्या आरोपाला आज विधान परिषदेतील विशेष बैठकीत राज्यमंत्री पंकज भोईर यांनी सडेतोड उत्तर दिले. महाराजांचे आदर्श प्रशासकीय मॉडेल हेच सरकारच्या कारभाराचा आधार असल्याचे स्पष्ट करत, अभ्यासक्रमात आवश्यक बदल करण्यासाठी केंद्र सरकारकडे पाठपुरावा सुरू असल्याची माहिती त्यांनी दिली.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# थोडक्यात...

## दिव्यांग विद्यार्थ्यांना स्वेटर वाटप




**सोयगाव :** जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव येथील माजी मुख्याध्यापक तथा माजी नगरसेवक, समाजसेवक एकनाथ महाजन सरानी स्वेटर उपस्थित वाटप केले. एकनाथ महाजन, माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष रविंद्र काळे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य हर्षल काळे, राजेंद्र दुतोडे,अण्णा वाघ, रविंद्र साखळे, पालक सुधाकर सो-हनी, याच्या हस्ते करण्यात आले. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्याच्या चेहर्यावर आनंद दिसुन येत होता. यावेळी शाळेतील मुख्याध्यापक किरणकुमार पाटील,पदवीधर शिक्षिका सुरेखा चौधरी, पंकज रगडे सहशिक्षिका मंगला बोरसे, सविता पाटील, अकुश काळे, गणेश बाविस्कर, अनिल देसाई, तानाजी जाधव, शुभम देसले, पुनम लाड उपस्थित होते.

## एमजीएम ऑलिंपिक मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन




**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम विद्यापीठाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ९ व्या एमजीएम ऑलिंपिकचा उद्घाटन सोहळा आज मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत एमजीएम क्रिकेट स्टेडियम येथे संपन्न झाला. यावेळी, ऑलिम्पियन तथा अर्जुन पुरस्कार विजेते दत्तू भोकनळ यांनी उपस्थित खेळाडूंशी संवाद साधला. यावेळी, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, सचिव अंकुशराव कदम, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, एमजीएम स्कूल्सच्या संचालिका डॉ.अपर्णा कक्कड, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, प्रकल्प संचालिका डॉ.प्रेरणा दळवी, मानव संसाधन विभागाच्या संचालिका टीना सहरान, मुख्य वित्त लेखा अधिकारी राशी जैन, क्रीडा विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे, सर्व अधिष्ठाता, संचालक, प्राचार्य, विभागप्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, खेळाडू व सर्व संबंधित उपस्थित होते.

## जटवाडा येथे त्रिदिवसीय महामहोत्सव, महाआरती

**छत्रपती संभाजीनगर :** शहरापासुन १२ कि.मी. अंतरावरील लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री.१००८ संकटहर पार्श्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे त्रिदिवसीय लघु पंचकल्याणक प्रतिष्ठा व वार्षिक यात्रा महोत्सव दिनांक ११ डिसेंबर ते १५ डिसेंबर पर्यत आयोजीत करण्यात आला आहे. संकटहर पार्श्वनाथ भगवंताचा २८०१ व्या जन्म कल्याणक निमीत्त महाअर्चना, महाआरती आणि महामस्तकाभिषेक आयोजन करण्यात आले आहे. महोत्सवासाठी उपाध्याय विरंजन सागरजी महाराज, मुनिश्री विसौम्यश्रीसागरजी महाराज ससंघाचे सानिध्य लाभनार आहे.

## एमजीएममध्ये 'तिनके का सहारा'चे सादरीकरण


**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशन संस्थेच्या ४३ व्या वर्धापन दिनानिमित्त विविध कार्यक्रम संपन्न होत असून त्याचाच एक भाग म्हणून एआयु'च्या झोनल युथ फेस्टिवलमध्ये एमजीएम विद्यापीठाच्या संघाची 'तिनके का सहारा' ही हिंदी एकांकिका चर्चेची ठरली होती. याच एकांकिकेचा प्रयोग आज रुक्मिणी सभागृहात मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. या प्रयोगास एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, अधिष्ठाता डॉ. रेखा शेळके, एमजीएम प्रकल्प संचालिका डॉ. प्रेरणा दळवी, विभागप्रमुख डॉ. राजू सोनवणे, डॉ. शिव कदम, प्राध्यापक, विद्यार्थी व सर्व संबंधित मान्यवर उपस्थित होते.

## सोयगाव येथे विद्यार्थी बाल आनंद मेळावा उत्साहात

**सोयगाव :** जिल्हा परिषद प्रशाला सोयगाव इथे विद्यार्थ्यांना थेट अनुभवातून शिकता यावं, आत्मविश्वास वाढावा आणि व्यवहारज्ञान पक्कं व्हावं, या उद्देशानं विद्यार्थी बाल आनंद मेळावा मोठ्या उत्साहात भरवण्यात आला. विद्यार्थ्यांनी इडली-डोसा, पुलाव, भरीतपुरी, मसालेभात, भेळ, कचोरी, समोसे अशा घरगुती पदार्थांचे स्टॉल लावून पालकांना आणि पाहुण्यांना चवदार भोजनाची मेजवानी दिली. मटकीफोड, दहीहंडी, बौद्धिक खेळ यामुळे मेळाव्याला अधिक रंगत आली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना नफा-तोटा मोजणी, ग्राहक-विक्रेता नातं, श्रमप्रतिष्ठा आणि समूहभावना याचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. मेळाव्याला समाजसेवक संजय शहापूरकर, रवींद्र काळे, नगरसेवक हर्षल काळे यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थिती होती.

## नंदसिंह सोळंके यांचे निधन

**सोयगाव :** नंदसिंह गोविंदसिंह सोळंके (वय.६९,रा.वरठाण ता.सोयगाव) यांचे गुरूवार रात्री छत्रपती संभाजीनगर येथे उपचार दरम्यान निधन झाले.त्यांच्या पार्थिवावर शुक्रवार दि.१२ रोजी ११ वाजता वरठाण येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, दोन भाऊ, पत्नी, एक मुलगा, दोन मुली, सून, नातवंडे असा परिवार आहे.



## शेषराव कोरडे यांचे निधन

**सिल्लोड :** तालुक्यातील मंगरूळ येथील ज्येष्ठ नागरिक शेषराव नारायण कोरडे वय ७० यांचे बुधवारी दिनांक १० रोजी सकाळी निधन झाले शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पाश्र्चात पत्नी. चार मुले सून. नातवंडे असा परिवार आहे. जिल्हा परिषद शिक्षक विठ्ठल कोरडे यांचे ते वडील होते. तर यशवंतराव चव्हाण महाविद्यालयाचे माजी उप प्राचार्य बाजीराव कोरडे यांचे ते बंधू होत.



## सौ.रुपाली लहाबर यांचे निधन

**छत्रपती संभाजीनगर :** सेवा भारतीचे वाळूज जिल्हाध्यक्ष आणि विश्व हिंदू परिषदेचे माजी देवगिरी प्रांत सहमंत्री रामदास लहाबर यांच्या पत्नी सौ. रुपाली उर्फ पुष्पाताई रामदास लहाबर वय ५७ यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने ६ डिसेंबर २०२५ रोजी दुःखद निधन झाले.रविवार दिनांक ७ डिसेंबरला साऊथ सिटी, सिडको, वाळूज गोलवाडी परिसरातील स्मशान भूमीमध्ये त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पती मुलगा मुलगी सूनबाई नात असा परिवार आहे.

## पत्रकार आझम पठाण यांना मातृशोक

**सिल्लोड :** सिल्लोड येथील दैनिक भास्करचे पत्रकार आझम पठाण राहणार जमालशाह कॉलोनी यांच्या आई सलमा बेगम अजमत खान पठाण वय ६१ यांचे दि ११ गुरुवार रोजी सकाळी दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शहरातील फतेह इस्लाम मस्जिद येथे नमाजे जनाजा अदा करून तेथील कब्रस्तान येथे दफनविधी करण्यात आला.त्यांच्या पश्चात ८ मुली मुलगा आजम पठाण असा परिवार आहे.

# बिडकीनमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकरी आंदोलन छेडणार!

**तभा वृत्तसेवा**

**बिडकीन दि १२ डिसेंबर :** पैठण तालुक्यातील बिडकीन येथे आज दहा डिसेंबर रोजी बिडकीन डीएमआयसी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांची बैठक झाली त्यामध्ये वेळोवेळी प्रकल्पग्रस्तांच्या मागण्याबाबत डीएमआयसी प्रशासन तसेच शासनाकडे धाव घेऊ नये आश्र्वासनाशिवाय काहीच पदरी न पडल्याने प्रकल्प ग्रस्त शेतकऱ्यांनी आंदोलन करण्याचा निर्णय घेतला आहे.

प्रकल्पग्रस्तांच्या प्रलंबित मागण्यांमध्ये डीएमआयसी भूसंपादन करताना प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना विकसित करून प्लॉट जमिनीच्या भावातच दिले जातील असे ठरले असताना डीएमआयसी प्रशासन आता प्लॉट देताना झाडे, विहीर,रस्ता याचे पैसे लावत आहे ते लावू नका व प्लॉट जमिनीच्या भावातच द्या. प्रकल्पग्रस्तांना ७५० दिवसांची मजुरी देण्यात यावी, भुसंपादन प्रमाणपत्र देण्यात यावे, फळझाडे, पोटखराब जमीन, विहीर, रस्त्यामध्ये गेलेल्या जमिनीचे पैसे द्यावे, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांसाठी पुनर्वसन धोरण लागू करावे, डीएमआयसी प्रकल्पामधील कंपन्यामध्ये स्थानिक बेरोजगारांना प्राधान्याने काम द्यावे या व आशा अनेक प्रलंबित प्रश्नाबाबत शेतकऱ्यांनी डीएमआयसी प्रशासन व उद्योग मंत्री सामंत यांच्या भेटी घेतल्या.

नुकतेच उद्योगमंत्री उदय सामंत यांनी सप्टेंबर २०२५ ला झालेल्या बैठकीत ऑक्टोबर २०२५ पर्यंत सोडवू असे जाहीर सभेत सांगितले होते तरी देखील अधिकारी वर्गाने शेतकऱ्यांची कामे केली नाहीत.

त्यामुळे संतप्त झालेले डी एम आय सी प्रकल्पग्रस्त शेतकरी, बेरोजगार युवक व नागरिक तीव्र आंदोलन छेडणार आहेत. याबाबत सर्वांनीच आपण शांततेमध्ये भूसंपादन प्रक्रिया पार पाडली त्याचा गैरफायदा प्रशासन घेत असून सद्य परिस्थितीत आंदोलन छेडणे हाच त्यावर उपाय असेल असे सांगितले व सर्वांनी आंदोलन करण्याचा निर्धार केला.

याप्रसंगी सरपंच अशोक धर्मे, मनोज पेरे, पत्रकार नंदकुमार वैद्य, उपसरपंच किरण गुजर, ॲड. संचित पातूनकर माजी सैनिक मच्छिंद्र हाडे, शिवाजी गव्हाणे, बाबुराव आगाज, राजू कोथिंबिरे व मोठया प्रमाणात शेतकरी उपस्थित होते.



# भिवधानोरातील विद्यार्थी, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना करा

**तभा वृत्तसेवा**

**गंगापूर दि.१२ डिसेंबर :** गंगापूर तालुक्यातील भिवधानोरा शिवारातील विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थांना येण्या-जाण्यासाठी जीव धोक्यात घालून तराफ्यावरून प्रवास करावा लागतो. त्यामुळे या विद्यार्थी, ग्रामस्थांच्या सुरक्षिततेसाठी तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी आमदार सतीश चव्हाण यांनी बुधवारी (दि.१०) विशेष उल्लेखाव्दारे विधान परिषदेत केली.



### आ.सतीश चव्हाण यांची विशेष उल्लेखाव्दारे मागणी

भिवधानोरा शिवारातील काही भाग शिवना नदीच्या दोन्ही बाजूस असल्याने जायकवाडी धरणाचे बॅकवाटरचे पाणी नदीकाठी सर्वत्र पसरते. त्यामुळे परिसरातील या बॅकवाटरच्या पाण्यामुळे भिवधानोरा शिवारातील विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थांना येण्या-जाण्यासाठी जीव धोक्यात घालून तराफ्यावरून प्रवास करावा लागत असल्याची बाब उघडीस आल्यानंतर मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने या वृत्ताच्या आधारे सुमोटो जनहित याचिका दाखल करून घेत विद्यार्थ्यांना बोटीने प्रवास करण्यासाठी प्रशिक्षित नावाडी आणि मोटारबोट बारा तासांत उपलब्ध करून देण्याचे आदेश सन २०२३ मध्ये तत्कालीन जिल्हाधिकाऱ्यांना दिले होते. मात्र यासंदर्भात अद्यापही काहीच कार्यवाही झाली नसल्याचे आमदार सतीश चव्हाण यांनी विशेष उल्लेखाव्दारे सभागृहाच्या निदर्शनास आणून दिले.

२३ मार्च २०२३ रोजी देखील आमदार सतीश चव्हाण यांनी भिवधानोरा ते कोंडापूर या रस्त्याच्या कामासंदर्भात विधान परिषदेत नियम ९३ अन्वये सूचना उपस्थित करून सभागृहाचे लक्ष वेधेल होते. भिवधानोरा ते कोंडापूर हा रस्ता तयार करण्यासाठी ग्रामविकास विभागाला आदेश द्यावेत अशी आग्रही मागणी त्यांनी सभागृहात केली होती. भिवधानोरा शिवारातील विद्यार्थी, शेतकरी, ग्रामस्थांच्या दृष्टीने महत्वाचा असलेला हा प्रश्र्न प्राधान्याने मार्गी लागावा यासाठी आमदार सतीश चव्हाण वेळोवेळी शासनस्तरावर पाठपुरावा करीत असल्याचे या विशेष उल्लेखाव्दारे पुन्हा एकदा सिध्द झाले आहे.

# हतनुर शाळेत पिण्याच्या पाण्याचा प्रश्न तीव्र; विद्यार्थ्यांच्या आरोग्याला धोका

**तभा वृत्तसेवा**

**कन्नड, दि १२ डिसेंबर :** तालुक्यातील हतनुर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना आजही स्वच्छ पिण्याचे पाणी मिळत नसल्याने गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे. शालेय व्यवस्थापन समितीने वॉटर फिल्टर बसवण्यासाठी ग्रामपंचायतकडे दि.०८ सप्टेंबर रोजी अधिकृत मागणी केली होती, मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही न झाल्याने पालक आणि शिक्षकांत तीव्र नाराजी पसरली आहे.

या शाळेत एकूण ३६३ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, परंतु शाळेत पिण्याच्या पाण्याची कोणतीही योग्य व्यवस्था नसल्याने विद्यार्थ्यांना रोज घरून पाण्याची बाटली घेऊन यावे होत आहे. ग्रामपंचायतीची




लागते. विशेषतः उन्हाळ्यात आणि सद्यस्थितीत या समस्येने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

शाळा व्यवस्थापन समितीने वारंवार ग्रामपंचायत हतनुरकडे पाठपुरावा करूनही प्रस्तावाला गांभीर्याने न घेण्यात आल्याचा आरोप पालक व शिक्षकांकडून निष्क्रियता आणि दुर्लक्षामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे, अशी नाराजी स्थानिक स्तरावर व्यक्त केली जात आहे. शालेय समिती, पालक आणि ग्रामस्थांनी आता तातडीने वॉटर फिल्टर बसवून पाण्याची शुद्ध व्यवस्था उपलब्ध करून देण्याची मागणी जोरदारपणे केली आहे. या गंभीर प्रश्नावर ग्रामपंचायत नेमके कोणते पाऊल उचलते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आम्ही ग्रामपंचायतकडे तीन महिन्यांपूर्वी वॉटर फिल्टर बसवण्यात यावे यासाठी निवेदन दिले आहे पण आता पर्यंत त्यावर काही तोडगा निघाला नाही, अशी प्रतिक्रिया शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष रफिक शेख यांनी दिली.

आम्हाला निवेदन मिळाले असून पाण्याच्या टाकीतून पाईपलाईन करून शाळेला पाणीपुरवठा करण्यात येत आहे जानेवारी पर्यंत वॉटर फिल्टर बाबत हालचाली करण्यात येईल, असे ग्रामविस्तारधिकारी आर.बी.निकम म्हणाले.

# वेळेवर निदान झाल्यास श्रवणदोष बरा होतो : डॉ. भाग्यवंत

**तभा वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि १२ डिसेंबर :** श्रवणदोष हा जागतिक स्तरावर मोठ्या प्रमाणावर आढळणारा विकार असला, तरी दुर्लक्षित राहिल्याने अनेकांना योग्य वेळी उपचार मिळत नाहीत. मात्र, आधुनिक वैद्यकशास्त्रामुळे श्रवणदोष आता असाध्य राहिला नसून, वेळेवर निदान आणि 'कॉकलिअर इम्प्लांट'मुळे रुग्णांचे जीवनमान लक्षणीयरीत्या सुधारत असल्याचे मत मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे कोक्लियर इम्प्लांट व पुनर्वसन या विषयावर आयोजित परिसंवादात सिनिअर ईएनटी सर्जन डॉ. रितेश भाग्यवंत व्यक्त केले.

मेडिकव्हर हॉस्पिटलतर्फे कोक्लियर इम्प्लांट व पुनर्वसन या विषयावर आयोजित परिसंवादात सिनिअर ईएनटी सर्जन डॉ. रितेश भाग्यवंत यांनी नवजात बालकांमधील श्रवण स्क्रीनिंगचे महत्त्व अधोरेखित केले. हे उपकरण थेट श्रवण-तंत्रिकेला उत्तेजन देऊन स्पष्ट ध्वनी अनुभव देते, असे त्यांनी सांगितले. लहान वयात इम्प्लांट झाल्यास मुलांचा भाषाविकास अधिक प्रभावी होत असल्याचेही त्यांनी नमूद केले. डॉ. अतुल पोरे, डॉ. शरद शेळके आणि बालरोगतज्ज्ञ डॉ. राहुल गोसावी यांनीही लवकर निदान, नियमित श्रवणतपासणी आणि शस्त्रक्रियेनंतरचे पुनर्वसन यावर भर दिला. मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये आता जागतिक दर्जाची कोक्लियर इम्प्लांट सर्जरीची सुविधा उपलब्ध झाल्याचे सेंटर हेड डॉ. विशाल कुटे यांनी सांगितले व गरजूंनी याचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

# एमजीएममध्ये मानवाधिकार दिन



**छत्रपती संभाजीनगर, दि.१२ :** महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या स्कूल ऑफ लीगल स्टडीज अँड रिसर्च आणि एसडीजी क्शन लॅब यांच्या संयुक्त विद्यमाने मूट कोर्ट हॉलमध्ये जागतिक मानवाधिकार दिनानिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

'मानवाधिकार : आजची आव्हाने आणि संधी' या विषयावर अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, संचालक डॉ.सी.एम.राव आणि सचिन चौधरी यांनी आपले विचार मांडले. मान्यवरांनी आधुनिक समाजातील मानवाधिकारांचे वाढते महत्त्व, त्यांच्यासमोरील नवे प्रश्न आणि त्यातून निर्माण होणाऱ्या संधी यावर सखोल मार्गदर्शन केले. विचारमंथनानंतर उपस्थित सर्वांनी मानवाधिकारांचे पालन, संरक्षण आणि प्रसार करण्याची शपथ घेतली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. साधना गायकवाड यांनी केले तर आभार सिद्धार्थ वारभुवन यांनी केले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये मानवाधिकारांविषयी जागरूकता निर्माण झाली. या उपक्रमात प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

# देवगाव रंगारी ते कायगाव टोका ठरतोय शेतकऱ्यांची डोकेदुखी

**लासूर स्टेशन, दि १२ डिसेंबर :** येथून जाणारा देवगाव रंगारी ते कायगाव टोका या रस्त्याचे कामं सद्या सुरु असून लासूर ते माळीवाडगाव या दरम्यान सुरु असलेल्या कामाच्या ठिकाणी ठेकेदाराने रस्त्यात दाबण्यासाठी अक्षरशः मताड आणून टाकल्याने या मातीचा फुफाटा सर्व दूर पसरत असल्याने आजू बाजूला लावण्यात आलेला शेतकऱ्यांचा पालीभाज्या व पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत असल्याने हा रस्ता शेतकऱ्यांची डोकेदुखी बनला आहे.

माळीवाडगाव येथील शेतकरी भानुदास कडूबा गोरे यांनी मिरची पीक घेतले असून मिरची पिकावर धुळीचा संपूर्ण थर आल्याने संपूर्ण पिके खराब झाले असल्याचे त्यांनी सांगितले.

या फुफाट्या मुळे गोरे यांनी स्वतःहा ची मोटर चालू करून रोडवर पाणी सोडत आहे. तरी याप्रसंगी शेतकरी म्हणतात मिरची पिकाला १५०.०००. रुपये खर्च केला. चार ते पाच लाख रुपये उत्पन्न अपेक्षित आहे परंतु रोडवरची धूळ उडाल्याने पिकाची वाढ थांबली आहे. तर पिकातून उत्पादन काहीही मिळणार नाही.

कृषी भूषण गोरखनाथ गोरे म्हणतात देवगाव ते कायगाव हा प्रशस्त रोड होत असून सर्वांना याचा आनंद आहे यांनाही रोड जवळ कांदा पिकाची लागवड करायची असून रोडची धूळ उडाल्यामुळे संपूर्ण पिकावर धुळीचा थर येणार आहे.

यामुळे पिकाला प्रकाश संश्लेषण क्रियेला अडथळा येऊन पिकाची वाढ थांबेल म्हणून वेळीच खबरदारी म्हणून तालुक्याचे लोकप्रतिनिधी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संबंधित ठेकेदाराला याबाबत सूचना देऊन रोडवर तीन वेळा पाणी मारण्यासाठी सूचना द्याव्या. उर्वरित रोडचे कामे लवकरात लवकर करून घ्यावे. नसता आम्हाला शेतकऱ्यांना रस्ता रोको आंदोलन करण्याची वेळ आणू नये अशी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.

# जायकवाडीतील अतिक्रमण हटविली

**तभा वृत्तसेवा**

**पैठण दि १२ डिसेंबर :** नाथसागर जायकवाडी प्रकल्पाच्या उत्तर वसाहतीमध्ये अनेक वर्षांपासून असलेली निवास्थाने तसेच अतिक्रमणावर जायकवाडी पाटबंधारे विभागाच्या वतीने धडक



कारवाई करण्यात येत आहे. कडक पोलीस बंदोबस्तात अतिक्रमण हटाव मोहिमेत अनेक घरे जमीनदोस्त करण्यात येत आहेत. या कारवाईमुळे हातावर पोट असणारी अनेक गोरगरीब कुटुंबे एका क्षणात बेघर झाली असून, त्यांचे संसार उघड्यावर पडले आहेत.

जायकवाडी पाटबंधारे विभागाने आपल्या मालकीच्या जागेवर झालेले अतिक्रमण काढण्यासाठ जय्यत तयारी केली होती. कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी घटनास्थळी मोठा पोलीस फौजफाटा तैनात करण्यात आला होता. पोलीस संरक्षणात जेसीबी आणि पोकलेन मशीनच्या साह्याने ही पक्की आणि कच्ची बांधकामे पाडण्यात आली. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित रहिवाशांना यापूर्वीच नोटीस देण्यात आली होती, तरीही जागा खाली न केल्याने ही कारवाई अपरिहार्य होती.यापाठोपाठ जायकवाडी दक्षिण तसेच नाथसागर प्रवेशद्वार ठिकाणावरील अतिक्रमण ही काढण्यात येत आहे.

प्रशासनाचा हातोडा पडताच उत्तर वसाहतीत एकच खळबळ उडाली.

## जाहीर प्रगटन/सायदेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि. कि. अर्ज क्र ८३५/२०२५

अर्जदार :- १) अनिता संतोष दांडगे, वय. ४० वर्षे, धंदा. घरकाम, ग.रा.राजनगांव (शो.पु.) ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर २) गौरव संतोष दांडगे, वय. २७ वर्षे, धंदा. खाजगी नोकरी, रा. राजनगांव (शो.पु.) ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर, ३) शितल संतोष दांडगे, वय. २३ वर्षे, धंदा. घरकाम, ग. रा.राजनगांव (शे.पु.) ता. गंगापूर जि. छत्रपती संभाजीनगर.

विरुद्ध

गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशीप प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअर्शीप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. ए. एस. इंगळे यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्याची थोडक्यात हकीकत अशी की, संतोष मुकुंदराव दांडगे हे राजनगांव (शो.पु.) ता. गंगापूर येथील कायमन्ये रहिवासी होते ने दि. १३/०९/२०२५ रोजी राजनगांव (शो.पु.) ता. गंगापूर येथे मयत झाले असतात अर्जदार क्र. १ ही पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मुलगा असुन अर्जदार क्र. ३ ही मुलगी आहे. या व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारसदार नाही. मयत संतोष मुकुंदराव दांडगे यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असुन अर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय व इतरकार्यालयात अर्जदार हे मयत संतोष मुकुंदराव दांडगे यांचे कायदेशीर वारस असल्यबाबत दर्शविण्यासाठी म्हणुन अर्जदारांना हेअरशीप प्रमाणपत्रची आवश्यकता असल्याने सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे. त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांच्या सदर अर्जस व अर्जतील मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास सबबीतानी त्याचा आक्षेप उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत नोंदवावा. मुदतीनंतर आलेले आक्षेप उजर लक्षात घेतलेले जाणार नाहीत. व हे न्यायालयात अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअर्शीप प्रमाणपत्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्क्यानिशी दिले आहे.

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन/सायदेशन नोटीस

**मा. दिवाणी न्यायाधिश साहेब, क. स्तर गंगापूर यांच्या न्यायालयात**

दि.कि. अर्ज क्र. ८४९ /२०२५. पु.ता.२८/१/२०२६

अर्जदार :- १) गंगाधर यादव पवार, वय. ०५ वर्ग, धंदा. शेती, ग. नेवरगांव ता.गंगापूर जि. औरंगाबाद, २) माधव यादव पवार, वय. ०४ वर्ग, धंदा. शेती, ग. नेवरगांव ता.गंगापूर जि. औरंगाबाद, ३) अरविंद यादव पवार, वय. ६२ वर्ग, धंदा. शेती, ग. नेवरगांव ता.गंगापूर जि. औरंगाबाद४) भास्कर यादव पवार, वय. ४३ वर्षे, धंदा. शेती, ग. नेवरगांव ता.गंगापूर जि. औरंगाबाद, ५) अलका संताराम खेडकर, वय. ६४ वर्षे, धंदा. घरकाम, ग. गंगापूर ता. गंगापूर जि. औरंगाबाद, ६) बिंदाबाई भाऊसाहेब डांगे, वय. ५९ वर्षे, धंदा. नौकरी, रा., नेवरगांव ता. गंगापूर जि. औरंगाबाद

विरुद्ध गैरअर्जदार :- निरंक

प्रकरण :- **बॉम्बे रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी, वरील अर्जदारांनी या न्यायालयात हेअरशिप प्रमाणपत्र मिळण्यासाठी त्यांचे विधीज्ञ श्री. व्ही. एस. मनोरकर यांच्या मार्फत अर्ज दाखल केला असुन त्यांची थोडक्यात हकीकत अशी की, अर्जदार क्र. १ ते ६ व यांचे वडील यादवराव रूस्तमराव पवार हे दि. १४/१२/१९९४ रोजी मौजे नेवरगांव ता. गंगापूर येथे मयत झाले असुन त्यानंतरमयताची पत्नी व अर्जदार क्र. १ ते ६ यांची आई गंभुबाई यादव पवार ही दिनांक २७/०५/२०१५ रोजी मौजे नेवरगांव ता. गंगापूर येथे मयत झाले असुन मयतांना अर्जदार १ ते ४ हे मुले असुन अर्जदार क्र. ५ व ६ ही विवाहीत मुली आहे या व्यतिरिक्तमयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत यादवराव रूस्तमराव पवार व गंगुबाई यादव पवार यांना अर्जदार हेच केवळ कायदेशीर वारस असुनअर्जदारांच्या व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कार्यालयात अर्जदार हे मयत यादवराव रूस्तमराव पवार व गगुबाई यादव पवार याचे कायदेशीर वारस असल्याचेबाबतदरविवणासाठी म्हणून अर्जदारांना हेअरशिप प्रमाणपत्राची आवश्यकता असल्याचे सदरचा अर्ज अर्जदारांना करणे भाग पडले आहे.त्याअर्थी, तमाम जनतेस कळविण्यात येते की, अर्जदारांचा सदर अर्ज व अर्जंत केलेल्या मागणीस कोणाचा काही आक्षेप उजर असल्यास सदर अर्जास व उजर या न्यायालयात हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत नोटीस उजर लक्षात येणार नाहीत. व हे न्यायालय अर्जदारांच्या हक्कात त्यांनी केलेले विनंतीप्रमाणे हेअरशिप प्रमाणपत्र जारी करील. करीता सदरचे प्रगटन या न्यायालयाच्या सही शिक्यानिशी दिले आहे.

**सहाय्यक अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय क स्तर गंगापूर**

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर), सोयगांव यांचे न्यायालय, ता. सोयगांव जि. औरंगाबाद**

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ३२०/२०२५.

अर्जदार:- १) कासाबाई तेजराव गावंडे, वयः- ७३ वर्षे, धंदा:- घरकाम, रा. पोखरी ता. भोकरदन जि. जालना. २) सुनील तेजराव गावंडे, वयः- ५१ वर्षे, धंदा:- निरंक, रा. सी-६०-१, ए सेक्टर, शिवाजी नगर, ११ वी १२ वी योजना सीडको, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ३) छाया अर्जुन बडक, वयः- ४५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. प्लॉट नं. सी-६०/१, ११ वी योजना, शिवाजी नगर, क्रांती चौक, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर). ४) अंजली प्रकाश सपकाळ, वयः- ४० वर्षे, धंदा:- घरकाम, रा. एन ०९, एच. ११९/३, सिडको, श्रीक्रीष्णा नगर, औरंगाबाद ता. व जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).

//विरूध्द//

गैरअर्जदार:- निरंक.

अर्ज:- **वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

सर्व संबंधीतास जाहीर प्रकटन व्दारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी ड. आर. एस. महाजन साहेब, सोयगांव ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर), यांच्या मार्फत या न्यायालयात वारस प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेला आहे.मयत नामे- तेजराव रामा उर्फ रामराव गावंडे हे दिनांक: २३/०४/२०१८ ला मौजे औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) येथे उपचार घेत असतांना मयत झालेले असुन त्यांना वरील, अर्जदार हे वारसदार आहे. अर्जदारांना शासकीय सवलतसाठी व शासकीय लाभासाठी वारस प्रमाणपत्र मिळणे आवश्यकता आहे. सदरचा अर्ज हा अर्जदारांनी वारस प्रमाणपत्र मिळवण्यासाठी दाखल केलेला आहे.

(पुढील दिनांक: २१/०१/२०२६).

तरी, ज्या कोणाचा अर्जदारांच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रगटनव्दारे प्रसिध्द झाल्यापासुन ३० दिवसाच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदोपत्रीसह उजर अगर आक्षेप नोंदवावा. अन्यथा अर्जदारांना कायदेशीर वारस प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनांक :- ११/१२/२०२५ ला रोजी सही व न्यायालयाच्या शिक्कयासह दिले.

**विभागीय लिपीक**
**दिवाणी न्यायालय क. स्तर, सोयगांव**
**सहाय्यक अधिक्षक.**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, सोयगांव**
**प्रतीलीपी:- १. मा दिवाणी न्यायालय कनिष्ठ स्तर साहेब, सोयगांव नोटीस बोर्ड. २. गृप ग्राम पंचायत, फर्दापुर ता. सोयगांव जि. औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर).**

# एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात ट्युलिकॉन परिषदेचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर, दि.१२ :** एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयातील ट्युलिप ब्रेस्ट सेंटर यांच्या वतीने शनिवार दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी जनरल सर्जन्ससाठी स्तनरोगावर ट्युलीकॉन २०२५ ही विशेष परिषद आयोजित करण्यात आली आहे. या वर्षीच्या परिषदेची थीम 'स्तन शल्ल्यचिकित्सेतील आधुनिक प्रवाह' ही असून यावर देश विदेशातील ख्यातनाम तज्ञ मंडळी मार्गदर्शन करणार आहेत.

डॉ.आशुतोष कोठारी (गायज अँड सेंट थॉमस लंडन), डॉ.सुमोहन चॅटर्जी मँचेस्टर (युके) या आंतरराष्ट्रीय तज्ञांसोबत डॉ.डी. जी.विजय (अध्यक्ष असोसिएशन ऑफ ब्रेस्ट सर्जन्स ऑफ इंडिया), डॉ.नीता नायर आणि डॉ शलाका जोशी (टाटा हॉस्पिटल, मुंबई). डॉ. गीता कडायप्रथ (अपोलो हॉस्पिटल, दिल्ली), डॉ.सेल्वी राधाकृष्णन (चेन्नई), डॉ.राज नगरकर (एचसीजी मानवता कॅन्सर सेंटर, नाशिक), डॉ.वर्षा रोटे (जीएमसी, छत्रपती सांभाजीनगर) असे अनेक देश विदेशातील ख्यातनाम तज्ञ स्तन शस्त्रक्रिया क्षेत्रातील नवीन वैज्ञानिक प्रगती, शस्त्रक्रियात्मक कौशल्ये, आधुनिक निदान पद्धती, रुग्ण केंद्रित व्यवस्थापन आणि बहुविद्याशाखीय दृष्टिकोण यांची सविस्तर माहिती सहभागी डॉक्टरांना देणार आहेत. त्याचप्रमाणे अनुभवांची देवाण घेवाण करण्याची संधी सहभागी सर्जन्सना मिळणार आहे.

1st TULICON 2025

या परिषदेच्या उद्घाटनासाठी एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम.जाधव, अधिष्ठाता डॉ.राजेंद्र बोहरा, उपअधिष्ठाता डॉ.प्रवीण सूर्यवंशी, डॉ.राजेंद्र शिंदे, डॉ.राजेश सावजी, डॉ.मंगेश तांदळे व सर्व संबंधित मान्यवरांची उपस्थिती असणार आहे.

असोसिएशन ऑफ सर्जन्स ऑफ इंडिया आणि असोसिएशन ऑफ ब्रेस्ट सर्जन्स ऑफ इंडिया या राष्ट्रीय संस्थांनी या परिषदेला सहकार्य केले आहे. ट्युलीकॉन २०२५ ही परिषद स्तन शल्यचिकित्सेतील नवीनतम ट्रेंड्स, कौशल्य विकास आणि संशोधनासाठी एक महत्वपूर्ण व्यासपीठ ठरणार असून, जनरल सर्जन्स यांना याचा लाभ होणार आहे. तरी सर्वांनी शनिवारी सकाळी ९ वाजता द्योतन हॉल, एमजीएम परिसर येथे सुरू होणाऱ्या ह्या परिषदेला उपस्थित राहावे, असे आवाहन एमजीएम ट्युलिप ब्रेस्ट सेंटरच्या संस्थापिका डॉ.अरुणा शाह कराड आणि ट्युलीकॉन २०२५ परिषदेचे आयोजन सचिव डॉ.आशुतोष तोंडारे यांनी केले आहे.

# १ कोटी १४ लाख नागरिकांना मोफत आरोग्यसेवा

**छ. संभाजीनगर, दि. १२ :** महाराष्ट्र आपत्कालीन वैद्यकीय सेवेची १०८ रुग्णवाहिका राज्यातील नागरिकांसाठी जीवनदायिनी ठरत आहे. सलग ११ वर्षांपासून डायल १०८ रुग्णवाहिका राज्यातील नागरिकांना मोफत आरोग्यसेवा देत आहे. आरोग्य संजीवनी ठरलेल्या या सेवेमुळे १ कोटी १४ लाख ४७ हजार २९६ रुग्णांना मोफत सेवा देण्यात यश आले आहे. सार्वजनिक आरोग्य विभाग आणि भारत विकास समूह यांच्या संयुक्त विद्यमाने ही सेवा राज्यात अव्याहतपणे सुरू आहे.

सद्यस्थितीत राज्यात एकूण ९३७ रुग्णवाहिका कार्यरत आहेत. यात ॲडव्हान्स लाईफ सपोर्ट आणि बेसिक लाईफ सपोर्ट प्रकारातील रुग्णवाहिकांचा समावेश आहे. रुग्णवाहिकेत पल्स ऑक्सिमीटर, वैद्यकीय ऑक्सिजन यंत्रणा आदी सुविधांचा समावेश आहे. देशातील २४ तास डॉक्टर आणि अत्यावश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देणारी ही एकमेव सेवा आहे. राज्यात ५ डिसेंबरपर्यंत अपघाती घटनांमध्ये १०८ रुग्णवाहिकेमधून ५,४४,२२४ रुग्णांना उपचारासाठी रुग्णालयात पोहोचविण्यात आले. त्याचबरोबर आगीच्या घटनांतील ३१,९२७, हृदयरोगातील १,०३,८८९, उंचावरून पडून जखमी झालेल्या १,५९,५५१, विषबाधेच्या २,६७,४७४, प्रसूतीवेळीच्या १७,९६,६५५ आणि शॉक/वीज पडून जखमी झालेल्या ७,३९९ रुग्णांना सेवा देण्यात आली. अशा प्रकारे राज्यात १०८ सेवेमार्फत एकूण १ कोटी १४ लाख ५८ हजार ३१६ रुग्णांना मोफत आरोग्यसेवा देण्यात यश आले आहे. विदर्भातील गोंडवाना विभागातील गडचिरोली, चंद्रपूर, यवतमाळ, नागपूर, गोंदिया, भंडारा आणि अमरावती हे आदिवासी बहुल जिल्हे आहेत. या विभागातील १ लाख ३८ हजार ६६५ नागरिकांनी या सेवेचा लाभ घेतला आहे.


**(This is an Advertisement for information purposes only and not for publication or distribution or release outside India and is not an Offer Document)**

## JAINEX AAMCOL LIMITED

**Our Company was originally incorporated in the name and style of "Anglo American Marine Company Limited' as a Public Limited Company under the Companies Act, 1913 on April 15,1947 by the Registrar of Companies, Bombay. The name of the Company was changed to Aamcol Tools Limited pursuant to a fresh Certificate of Incorporation granted by the Registrar of Companies, Bombay on June 05, 1984.The name of the Company was once again changed to "Jainex Aamcol Limited" and a fresh Certificate of Incorporation pursuant to the name change was issued by the Registrar of Companies, Maharashtra at Mumbai on May 24, 2005. For details of changes in name and registered office of our Company, see "General Information" on page 31 of the Letter of Offer.**

**Registered Office: L-3, MIDC Industrial Area., P.O. Chikalthana, Aurangabad- 431 006, Maharashtra, India**
**Tel: +91 2406614480 / +91 22 22002252 Fax: +91 240 2482208 / +91 22 22002254**
**Contact Person: Sonam Dubey Company Secretary & Compliance Officer**
**Email: info@jnxaamcol.com Website: www.jainexaamcol.com**
**Corporate Identity Number : L74999MH1947PLC005695**

**OUR PROMOTERS : BHAGAT SINGH DUGAR**

**ISSUE OF UP TO 7,48,169 FULLY PAID-UP EQUITY SHARES OF FACE VALUE OF ₹10/- EACH OF OUR COMPANY (THE "RIGHTS EQUITY SHARES") FOR CASH AT A PRICE OF ₹120 PER RIGHTS EQUITY SHARE (INCLUDING A PREMIUM OF ₹110 PER RIGHTS EQUITY SHARE) AGGREGATING TO ₹ 897.80 LAKHS* ON A RIGHTS BASIS TO THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS OF OUR COMPANY IN THE RATIO OF ONE (1) RIGHTS EQUITY SHARE FOR EVERY TWO (2) FULLY PAID-UP EQUITY SHARES HELD BY THE ELIGIBLE EQUITY SHAREHOLDERS ON THE RECORD DATE, THAT IS ON THURSDAY, NOVEMBER 20, 2025 (THE "ISSUE"). FOR FURTHER DETAILS, SEE "TERMS OF THE ISSUE" ON PAGE 65 OF THE LETTER OF OFFER**

***Assuming full subscription with respect to Rights Equity Shares**

**BASIS OF ALLOTMENT**

The Board of Directors of our Company thanks all Investors for their response to the Issue, which opened for subscription on Thursday, December 01, 2025. Out of the total 620 Applications for 1038086 Rights Equity Shares, 107 Applications for 8655 Rights Equity Shares were rejected due to technical reasons as disclosed in the Letter of Offer. The total number of valid Applications received were 513 for 10,29,431 Rights Equity Shares, which was 137.59% of the number of Rights Issue Size under the Issue. In accordance with the Letter of Offer and the Basis of Allotment finalized on December 10, 2025 in consultation with BSE Limited ("BSE"), the Designated Stock Exchange, and the Registrar to the Issue, the Rights Issue Committee of the Company on December 10, 2025 has approved the allotment of 7,48,169 Rights Equity Shares to the successful Applicants. In the Issue, Nil Rights Equity Shares have been kept in abeyance. All valid Applications after technical rejections have been considered for Allotment.

**1. After removing technical rejections (details of which are given in the subsequent paragraphs), the total number of valid applications eligible to be considered for allotment were as detailed below:**

| Category | Gross | | | Less: Rejections/Partial Amount | | | Valid | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | Applications | Shares | Amount (₹) | Applications | Shares | Amount (₹) | Applications | Shares | Amount (₹) |
| Eligible Equity Shareholders | 607 | 1023334 | 122800080 | 107 | 8655 | 1038600 | 500 | 1014679 | 121761480 |
| Fraction | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| Renouncees | 13 | 14752 | 1770240 | 0 | 0 | 0 | 13 | 14752 | 1770240 |
| Total | 620 | 1038086 | 124570320 | 107 | 8655 | 1038600 | 513 | 1029431 | 123533520 |

**2. Summary of Allotment in various categories is as under:**

| Category | Number of Allottees | Number of Equity Shares Allotted - against REs | Number of Equity Shares Allotted - Against valid additional shares | Total Equity Shares Allotted |
|---|---|---|---|---|
| Eligible Equity Shareholders | 607 | 4,34,978 | 2,99,641 | 7,34,619 |
| Renouncees | 13 | 13,550 | 0 | 13,550 |
| Total | 620 | 4,48,528 | 2,99,641 | 7,48,169 |

**3. The Promoter shareholder portion of the holding as on record date (i.e. November 20, 2025) is 66.38 % (i.e. 993313 Equity Shares) and portion of 51.46 % (i.e. 1155038 Equityres) holding after allotment date i.e. 10th December,2025. The details are as under:**

| Sr. No | PAN | Folio No (DPID CLID) | Name | Shares held as on record date (A) | RE Allotted (B) | RE Renouncees (C ) | RE Applied (D) | Additional shares applied (E) | Total Shares Applied (F ) = (D+E) | Additional Allotment (G) | Total Shares Allotted (H )= (D+G) | Post Allotment Holding (I) = (A+H) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | AABPD5470C | IN30018310027154 | BHARATI BAFNA | 287200 | 143600 | 0 | 42573 | 2427 | 45000 | 0 | 42573 | 329773 |
| 2 | AEJPB3041D | IN30018310024050 | KUNAL BAFNA | 94800 | 47400 | 0 | 20800 | 0 | 0 | 0 | 20800 | 115600 |
| 3 | AAACJ9421F | IN30048410403000 | JAINEX FOODS PRIVATE LIMITED | 577956 | 288978 | 0 | 98352 | 0 | 0 | 0 | 98352 | 676308 |
| 4 | AABPD5488J | IN30429584934389 | BHAGAT SINGH DUGAR | 33347 | 16673 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 33347 |
| 5 | | P0059 | MR. PRAVIN CHIMANLAL VORA | 10 | 5 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 0 | 10 |
| | | | | 993313 | | | | | | | | 1155038 |

**Information for Allotment/refund/rejected cases :** The dispatch of Allotment Advice cum Refund Intimation to the investors, as applicable, has been completed on December 10, 2025. The instructions for unblocking of funds in case of ASBA Applications were issued to SCSBs on December 12, 2025 and for refund of funds through NACH/NEFT/RTGS/direct credit were issued to ICICI Bank Limited, the Banker to the Issue, on December 12, 2025. The listing application was filed with BSE on December 11, 2025. The credit of Rights Equity Shares to the respective demat accounts of the allottees in respect of Allotment in dematerialized form has been completed on December 11, 2025. For further details, see "Terms of the Issue – Allotment Advice or Refund/ Unblocking of ASBA accounts" on page 86 of the Letter of Offer.The trading in the Rights Equity Shares issued in the Rights Issue shall commence on BSE upon receipt of trading permission. The trading is expected to commence on or about December 12, 2025. Further, in accordance with SEBI circular bearing reference - SEBI/HO/CFD/DIL2/CIR/P/2020/13 dated January 22, 2020, the request for extinguishment of Rights Entitlements has been sent to NSDL & CDSL on December 11,2025.

**INVESTORS MAY PLEASE NOTE THAT THE RIGHTS EQUITY SHARES CAN BE TRADED ON THE STOCK EXCHANGE ONLY IN THE DEMATERIALISATION FORM.**

**DISCLAIMER CLAUSE OF SEBI :** The Draft Letter of Offer has not been filed with SEBI in terms of SEBI ICDR Regulations. The Letter of Offer has been submitted to SEBI for information purposes only.

**DISCLAIMER CLAUSE OF BSE (THE DESIGNATED STOCK EXCHANGE) :** It is to be distinctly understood that the permission given by BSE Limited should not, in anyway, be deemed or construed that the Letter of Offer has been cleared or approved by BSE Limited; nor does it certify the correctness or completeness of any of the contents of the Letter of Offer. The investors are advised to refer to the Letter of Offer for the full text of the Disclaimer clause of BSE as provided in "Other Regulatory and Statutory Disclosures - Disclaimer Clause of BSE" on page 61 of the Letter of Offer.

"BSE Limited ("the Exchange") has given vide its letter dated October 17, 2025, permission to this Company to use the Exchange's name in this Letter of Offer as the stock exchange on which this Company's securities are proposed to be listed. The Exchange has scrutinized this letter of offer for its limited internal purpose of deciding on the matter of granting the aforesaid permission to this
Company. The Exchange does not in any manner :

- Warrant, certify or endorse the correctness or completeness of any of the contents of this letter of offer; or
- Warrant that this Company's securities will be listed or will continue to be listed on the Exchange;or
- Take any responsibility for the financial or other soundness of this Company, its promoters, its management or any scheme or project of this Company;

and it should not for any reason be deemed or construed that this letter of offer has been cleared or approved by the Exchange. Every person who desires to apply for or otherwise acquires any securities of this Company may do so pursuant to independent inquiry, investigation and analysis and shall not have any claim against the Exchange whatsoever by reason of any loss which may be suffered by such person consequent to or in connection with such subscription/acquisition whether by reason of anything stated or omitted to be stated herein or for any other reason whatsoever"

Unless otherwise specified, all capitalised terms used herein shall have the same meaning ascribed to such terms in the Letter of Offer.

**THE LEVEL OF SUBSCRIPTION SHOULD NOT BE TAKEN TO BE INDICATIVE OF EITHER THE MARKET PRICE OF THE EQUITY SHARES OR THE BUSINESS PROSPECTS OF THE COMPANY.**

| MUFG | |
|---|---|
| **MUFG INTIME INDIA PRIVATE LIMITED**<br>**C-101, 247 Park L B S Marg Vikhroli (West) Mumbai 400 083**<br>**Telephone: +91 (22) 4918 6200; Fax No: 022 4918 6060**<br>**Contact Person: Shanti Gopalkrishnan**<br>**Email: jainexaamcol.rights2025@linkintime.co.in;**<br>**Website: www.linkintime.co.in**<br>**Investor Grievance ID: jainexaamcol.rights2025@linkintime.co.in**<br>**SEBI Registration No.: INR000004058** | **SONAM DUBEY**<br>**COMPANY SECRETARY & COMPLIANCE OFFICER**<br>**JAINEX AAMCOL LIMITED**<br>L-3, MIDC Industrial Area., P.O. Chikalthana,<br>Aurangabad- 431 006, Maharashtra, India<br>Tel: +91 2406614480 / +91 22 22002252<br>Fax: +91 240 2482208 / +91 22 22002254<br>Email: info@jnxaamcol.com, Website: www.jainexaamcol.com |

**Investors may contact the Registrar or our Company Secretary and Compliance Officer for any pre-Issue or post-Issue related matter. All grievances relating to the ASBA process may be addressed to the Registrar, with a copy to the SCSBs, giving full details such as name, address of the Applicant, contact number(s), E-mail address of the sole/ first holder, folio number or demat account number, number of Rights Equity Shares applied for, amount blocked, ASBA Account number and the Designated Branch of the SCSBs where the Application Form or the plain paper application, as the case may be, was submitted by the Investors along with a photocopy of the acknowledgement slip. For details on the ASBA process, see "Terms of the Issue" on page 65 of the Letter of Offer.**

**For JAINEX AAMCOL LIMITED**

**Place: Aurangabad**
**Date: 12/12/2025**

**Sd/-**
**Sonam Dubey**
**Company Secretary & Compliance Officer**

**Disclaimer : Our Company has filed a Letter of Offer with the Securities and Exchange Board of India and BSE. The Letter of Offer is available on the website of SEBI at www.sebi.gov.in, website of the company at www.jainexaamcol.com. Investors should note that investment in equity shares involves a high degree of risk and are requested to refer to the Letter of Offer including the section "Risk Factors" beginning on page 17 of the Letter of Offer. This announcement has been prepared for publication in India and may not be released in the United States. This announcement does not constitute an offer of Rights Equity Shares for sale in any jurisdiction, including the United States, and any Rights Equity Shares described in this announcement may not be offered or sold in the United States absent registration underthe US Securities Act of 1933, as amended, or an exemption from registration. There will be no public offering of Rights Equity Shares in the United States.**

## अग्रलेख...

# हवा गेलेल्यांची 'हवा' पुन्हा काढली जाते तेव्हा...

निवडणूक सुधारणा आणि एसआयआर या विषयावर लोकसभेत झालेल्या चर्चेला केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी जसे आक्रमक, मुद्देसूद आणि घणाघाती उत्तर दिले, ते पाहता कुठून आपण या विषयावर चर्चेची मागणी केली, असे काँग्रेसला आता वाटत असेल. या विषयावर चर्चेची मागणी करीत काँग्रेसने 'आ बैल मुझे मार' करून घेतले, असे म्हणायला हरकत नाही. अमित शाह यांच्या बिनतोड युक्तिवादाचे सत्ताधारी स्वागत करत होते, तर विरोधी पक्षांच्या सदस्यांचे चेहरे पडले होते. बुधवारी लोकसभेत अमित शाह यांनी केलेले भाषण हे त्यांच्या संसदीय कारकीर्दीतील अनेक चांगल्या भाषणांतील एक होते. त्यामुळे त्यांच्या भाषणाचे कौतुक करण्यापासून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनाही स्वतःला रोखता आले नाही. गेल्या काही महिन्यांपासून काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी मतदार यादीच्या पुनरीक्षणाच्या (एसआयआर) मुद्यावरून आकाशपाताळ एक करीत आहेत. मतचोरीचा आरोप करीत निवडणूक आयोग आणि भाजपाला घेरण्याचा प्रयत्न करीत आहेत. बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीच्या आधी एसआयआर म्हणजे मतदार यादीचे पुनरीक्षण करण्यात आले आणि मतदारयादीत अवैधरीत्या घुसखोरी केलेल्यांची नावे मतदारयादीतून वगळण्यात आली. मुस्लिम तुष्टीकरणाची आणि घराणेशाहीतून वारसा हक्काची परंपरा लाभलेल्या राहुल गांधींनी या मुद्यावरून निवडणूक आयोगाला आणि पर्यायाने मोदी सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभे करण्याचा प्रयत्न केला. पण बिहारच्या सुजाण आणि प्रगल्भ मतदारांनी भाजपाच्या नेतृत्वातील रालोआला दोन तृतीयांश बहुमत देत हा प्रयत्न हाणून पाडला. तरीही राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाचे डोळे उघडत नाहीत, याचे आश्चर्य वाटते.

आता पश्चिम बंगालमध्येही याच मुद्यावरून काँग्रेस नव्हे, तर ममतादीदींची तृणमूल काँग्रेस रान उठवत आहे. एसआयआरविरोधी प्रचार करण्यात राहुल गांधी आणि काँग्रेस पक्षाने जेवढी मेहनत घेतली, त्याच्या एकदशांश मेहनत पक्ष मजबूत करण्यात घेतली असती तर एसआयआरवरून आकांडतांडव करण्याची वेळ त्यांच्यावर आली नसती. पक्षाची दुर्दशा झाली नसती. पण, विवेकाचा स्वर ऐकतील ते राहुल गांधी कसले! ते बोललेच. नको तेच बोलण्यात ते पटाईत आहेत. अमित शाह यांनी लोकसभेत निवडणूक सुधारणा आणि एसआयआर या मुद्यावर झालेल्या चर्चेत विरोधी पक्षांनी केलेले सर्व आरोप खोडून काढले. विशेषतः राहुल गांधी यांचे दात त्यांनी त्यांच्याच घशात घातले. भाजपाला निवडणूक सुधारणा या विषयावर चर्चा अपेक्षित होती, तर काँग्रेसने ही चर्चा फक्त एसआयआरवर केंद्रित करण्याचा प्रयत्न केला. मुळात एसआयआरची प्रक्रिया देशात यावेळी पहिल्यांदाच राबविण्यात आली, असे नाही. यापूर्वी अनेक वेळा ती राबविण्यात आली आहे. काँग्रेसच्या शासनकाळातही एसआयआर अभियान राबविण्यात आले. यावेळी काँग्रेसने त्यावर आक्षेप घेण्याचे कारण नव्हते. एसआयआरला काँग्रेस करीत असलेला विरोध हा मुस्लिम तुष्टीकरणातून आहे, असे अमित शाह यांनी आपल्या भाषणात पुराव्यानिशी सिद्ध केले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे राहुल गांधींच्या मतचोरीच्या आरोपातील हवा त्यांनी एकापाठोपाठ तीन बॉम्ब टाकत काढून टाकली. देशातील सर्वांत पहिली मतचोरी पंडित जवाहरलाल नेहरू यांनी केली, दुसरी इंदिरा गांधींनी तर तिसरी सोनिया गांधी यांनी, हा अमित शाह याचा आरोप राहुल गांधी यांच्या मतचोरीच्या आरोपावरचा 'नहले पे दहला' होता. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशाचा पहिला पंतप्रधान कोण होणार, याचा निर्णय प्रदेश काँग्रेस अध्यक्षांच्या मतदानातून घेतला जाणार होता. पंतप्रधानपदासाठी सरदार वल्लभभाई पटेल यांना २८ प्रदेश काँग्रेस अध्यक्षांची पसंती होती, तर नेहरू यांना फक्त दोन प्रदेश काँग्रेस अध्यक्षांची. म्हणजे बहुमत पटेलांच्या बाजूला होते. मात्र, मतचोरी करीत म्हणजे बहुमताचा निर्णय डावलून नेहरू देशाचे पहिले पंतप्रधान झाले, असे म्हणण्यापेक्षा त्यांनी पंतप्रधानपद बळकावले, असे म्हणणे जास्त योग्य राहील. दुसरी मतचोरी इंदिरा गांधी यांनी केली. अलाहाबाद उच्च न्यायालयाने त्यांची निवडणूक बेकायदेशीर ठरवली असता, इंदिरा गांधी यांनी घटनादुरुस्ती करत न्यायालयाचा निर्णय रद्द ठरवला. तिसरी धक्कादायक मतचोरी सोनिया गांधी यांची होती. देशाचे नागरिकत्व स्वीकारण्याआधी सोनिया गांधी मतदार झाल्या होत्या आणि मतदार यादीत त्यांचे नाव होते, हा अमित शाह यांनी टाकलेला तिसरा बॉम्ब काँग्रेसच्या सदस्यांना दिल्लीच्या कडाक्याच्या थंडीत घाम फोडणारा होता. मतचोरीसाठी नेहरू-गांधी घराण्यातील तीन सर्वोच्च नेत्यांना जबाबदार धरत शाह यांनी राहुल गांधी यांचे अवसान एकदम जमिनीवर आणले. आपल्या घराण्यातील तीन नेत्यांनी पणजोबा, आजी आणि आईने मतचोरी केली, हे काँग्रेसच्या अन्य ज्येष्ठ नेत्यांनी राहुल गांधींच्या कानावर आधीच घातले असते, तर मतचोरीचा आरोपच त्यांनी केला नसता. राहुल गांधी पत्रपरिषद घेऊन बॉम्ब, अणुबॉम्ब आणि हायड्रोजन बॉम्ब टाकण्याच्या गोष्टी करीत होते. पण एकाच वेळी तीन हायड्रोजन बॉम्ब अमित शाह टाकू शकतात, याचा त्यांना किंवा त्यांच्या पक्षातील नेत्यांना अंदाजच नव्हता. अमित शाह यांच्या आरोपांनी काँग्रेसवाल्यांनाच नव्हे, तर अन्य विरोधकांनाही पळता भुई थोडी झाली. त्यामुळे त्यांनी सभात्याग केला, असे म्हणण्यापेक्षा सभागृहातून पळ काढला, असे म्हणणे योग्य होईल.

निवडणूक सुधारणांवर भाषण करताना अनेक विरोधी नेत्यांनी ईव्हीएमला विरोध करताना पुन्हा मतपत्रिकेद्वारे मतदानाची मागणी केली. ही मागणी म्हणजे घड्याळाचे काटे उलटे फिरवण्याचा प्रयत्न होय. कधीतरी विरोधकांनी आपल्या पराभवासाठी ईव्हीएमवर ठपका ठेवण्याऐवजी आत्मपरीक्षण केले पाहिजे. विरोधकांची जनतेशी असलेली नाळ तुटली आहे. त्यामुळे जनता त्यांना सतत नाकारत आहे. पण विरोधक आपल्या वर्तनात सुधारणा करण्याऐवजी पराभवाचे खापर ईव्हीएमवर फोडत आहेत. सर्व विषयांत अनुत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्याने अभ्यास करण्याऐवजी शिक्षक बदलण्याची मागणी आणि मतपत्रिकांवर निवडणूक घेण्याची मागणी हे समान पातळीवरील बौद्धिक दिवाळखोरीचे लक्षण आहे.

पूर्वी वयाच्या २१ व्या वर्षी मतदानाचा अधिकार मिळायचा. तो कमी करीत १८ वर आणला गेला. आता निवडणूक लढविण्यासाठी असलेली २५ वर्षांची मर्यादा २१ वर्षे करण्याची गरज आहे. सरकारने यादृष्टीने विचार केला पाहिजे. लोकप्रतिनिधीला परत बोलविण्याचा अधिकारही मतदारांना मिळाला पाहिजे. मात्र, तशी मागणी संसदेत कोणत्याच राजकीय पक्षाने केली नाही. सर्व जण एसआयआरचे तुणतुणे वाजवत राहिले. एसआयआर ही काळाची गरज आहे. एसआयआर म्हणजे मतदारयादीचे आणि पर्यायाने निवडणूक प्रणालीचे शुद्धीकरण आहे. मतदारयादीतील घुसखोरी हुडकून काढण्यासाठी एसआयआरची प्रक्रिया राबविली जात आहे. या प्रक्रियेत कोणत्याही भारतीय नागरिकाचे नाव मतदार यादीतून वगळले जाणार नाही, याची दक्षता घेताना मतदार यादीत कोणताही घुसखोर आणि परकीय नागरिक राहणार नाही, हे पाहण्याची जबाबदारी सरकार, निवडणूक आयोगाएवढीच राजकीय पक्षांची आहे. या देशाचा पंतप्रधान आणि मुख्यमंत्री कोण होणार, हे बाहेरचे लोक म्हणजे घुसखोर नव्हे तर या देशातील नागरिकांना ठरविता आले पाहिजे. एसआयआर आम्हा सर्वांना तोच अधिकार पूर्णपणे शुद्ध स्वरूपात देणार आहे. त्यामुळे ज्या राजकीय नेत्यांच्या आणि राजकीय पक्षांच्या निष्ठा या देशाच्या मातीशी नाहीत, या देशातील जनतेला जे आपले समजत नाहीत, तेच एसआयआरला विरोध करीत आहेत, असा अर्थ काढला गेला तर वावगे होणार नाही. राहुल गांधींनी एसआयआरला विरोध करण्याचा ढोंगीपणा सोडला पाहिजे. या प्रक्रियेत राष्ट्रीय हिताच्या दृष्टीने काही बदल हवे असतील तर तशी मागणी ते करू शकतात. सरसकट या प्रक्रियेला विरोध करणे राष्ट्रहिताचे नाही. जनता प्रत्येक निवडणुकीत आपल्याला का नाकारते, याचे भान आता तरी त्यांना आले पाहिजे. जनतेच्या कौलरूपी विवेकाने त्यांच्या पक्षाचे पानदान कधीचेच वाजविले आहे. आता संधी मिळाली आहे तर सभागृहात तरी नीट वागावे, बोलावे म्हणजे लोकशाहीसोबत त्यांचे आणि काँग्रेस पक्षाचेही भले होईल. अन्यथा, आपली हवा कधीचीच गेली असली तरी ती पुनःपुन्हा कुणीतरी काढून घ्यावी, यासाठीच्या आट्यापिट्याची कीवच येत राहील.

## प्रासंगिक

# शिक्षण क्षेत्रात नेमका बदल हवा

**विजय पांढरीपांडे**

महाराष्टात काही भागात बोली भाषेत 'या ठिकाणी, त्या ठिकाणी' अशा निरर्थक शब्दाचा वापर काही लोक बोलताना करतात. हा खरे तर सवयीचा भाग असतो. वारंवार येणाऱ्या अशा शब्दांना तसा काही अर्थ नसतो. उलट ते ऐकताना विचित्र वाटते. हास्यास्पद वाटते. आता याच धर्तीवर ठिकाण म्हणजे स्पेस वापरण्याऐवजी टाईम म्हणजे वेळ ही संज्ञा वापरून काही लिहावे, असा विचार मनात आला. या दोन टाईम झोनमध्ये शिक्षण क्षेत्रात नेमका काय बदल झाला, यावर विचार करणे मनोरंजक ठरेल. त्यावेळी-यावेळी अशी शिक्षण क्षेत्रासंबंधी तुलना करताना त्यावेळी म्हणजे १९६० चे दशक अन् यावेळी म्हणजे २०२०-२०२५ हे चालू दशक असे परिमाण घेतले आहे. कारण या काळातून माझा स्वतःचा शिक्षण क्षेत्रातला प्रवास झालाय. त्यावेळी म्हणजे ६० च्या दशकात शाळेत महिला शिक्षिका फारशा नव्हत्या. महाविद्यालयातही महिला प्राध्यापकांची संख्या त्या मानाने तुरळक होती. सायन्स कॉलेजला आमच्या वर्गात एकही मुलगी नव्हती तर इंजिनीअरिंग कॉलेज वर्गात फक्त एकमेव मुलगी होती. सांगितले तर आश्चर्य वाटेल, पण आयआयटीमध्ये देखील एम.टेक.ला एखाददुसरी मुलगी. मी पुढे १० वर्षे आयआयटीत शिकवले. त्या काळात ५० संख्या असलेल्या वर्गात दोन-तीन मुली असायच्या. आयआयटीत महिला प्राध्यापिका नव्हत्या शिकवायला.. असल्याच तर पाच-दहा टक्के पूर्ण कॉलेजात!

शिक्षक-विद्यार्थी यांचे त्या काळात जवळचे, जिव्हाळ्याचे नाते होते. भावनिक संबंध होते. शिक्षक मन लावून शिकवत त्यावेळी. आता सारखा पाट्या टाकण्याचा, शिक्षणाला ओझे समजण्याचा प्रकार नव्हता. त्यावेळी हुशार (मेरिट) विद्यार्थ्यांच्या यादीत मुलेच जास्त असायची. आता यावेळी चित्र एकदम उलटे झाले आहे. शाळेत, कॉलेजात मुलींची संख्या कितीतरी प्रमाणात वाढली आहे. इंजिनीयरिंगमध्ये पूर्वी आठ-दहा मुली असायच्या ५० च्या वर्गात. आता मुलींची संख्या ६० टक्के झाली. शिकविणाऱ्या महिला प्राध्यापकाची संख्या दुपटी-तिपटीने वाढली आहे. त्यावेळी विभाग प्रमुख, प्राचार्य महिला हे दृश्य क्वचितच दिसायचे. आता याही पदावर महिला जबाबदारी समर्थपणे पार पाडताना दिसतात. मेरिटमध्ये, सुवर्ण पदकाच्या यादीत मुलीच आजकाल जास्त असतात. आमच्या इलेक्ट्रॉनिक्स विभागात तर ८० टक्के सुवर्ण



पदक मिळविणाऱ्या विद्यार्थिनीच.. महिला विभाग प्रमुख, प्राचार्य, कुलगुरू यांची संख्या बरीच वाढली आहे. उच्च शिक्षण क्षेत्रात कोणत्याही विभागात मुली हिरीरीने मुलांशी समर्थपणे स्पर्धा करताना, जिंकताना दिसतात. पण त्यावेळसारखे लळा-जिव्हाळ्याचे भावनिक नाते आता राहिलेले नाही. विद्यार्थी-शिक्षक नात्यात कृत्रिमता आली आहे. कामापुरता मामा असा स्वार्थी व्यवहार उरला आहे. विद्यार्थी वर्गात बेशिस्तपणा प्रमाणाबाहेर वाढला आहे. शिक्षक, प्राध्यापक, पालक कुणाचीच भीती राहिली नाही. नियम, कायदे याविषयी वचक राहिला नाही. सगळीकडे शिथिलता आलेली दिसते. 'चलता है' ही बेफिकीर वृत्ती दिसते. या सगळ्याचा परिणाम म्हणजे त्यावेळच्या तुलनेत शालेय म्हणा, महाविद्यालयीन उच्च शिक्षण म्हणा, सगळीकडे गुणवत्तेचा दर्जा यावेळी पार ढासळला आहे. सर्वच क्षेत्रात तांत्रिक प्रगती भरपूर प्रमाणात झाली. शाळा-कॉलेजेसची, विद्यापीठांची संख्या तर भूमिती श्रेणीने वाढली गेल्या काही दशकात. अभ्यासक्रम बदलले, नवे कोर्सेस, नवे विषय, नवी माध्यमे, नव्या पद्धती, नवी आव्हाने असे सगळेच नावीन्याने भारलेले, सजलेले. पण आतून पोकळ असलेले. वरून कीर्तन आतून तमाशा असा काहीसा प्रकार. पूर्वीच्या परीक्षा, पूर्वीचे गुणदान सगळेच विश्वसनीय होते. कडक धोरण राबविले जायचे त्यावेळी. आता पदवी दान केली जाते. मार्क्स उधळले जातात. परीक्षेचा दर्जादेखील सुमार असतो. पदवी, पदव्युत्तरपासून तर पीएचडीपर्यंत असाच दुधात पाणी टाकण्याचा प्रकार, गुण उधळून खुश करण्याचा प्रकार. गुणपत्रिकेत तथ्य ना पदवीला अर्थ.. सगळा देखावा. मोठमोठ्या संस्था, देखण्या इमारती, विस्तीर्ण परिसर, लाखो रुपयांचे शुल्क अन् शेवटी हातात पदवीचा चिटोरा! ज्याचे नोकरीच्या क्षेत्रातले बाजार मूल्य शून्य! त्यावेळी नोकरीची सोय करणे ही विद्यापीठाची जबाबदारी नव्हती. प्लेसमेंट सेल वगैरे प्रकार नव्हता. आता रोजगाराभिमुख शिक्षण, स्कील डेव्हलपमेंट, काळाची, भविष्याची गरज अशा परिमाणावर कॉलेजचे, विद्यापीठाचे मानांकन ठरते. नाटकी संशोधन, रिसर्च पब्लिकेशन यावर शिक्षकाचे मोल ठरते. आता तर कॉलेजेस, विद्यापीठांचीदेखील परीक्षा होते, त्यांनाही गुण दान केले जाते. तिथेही कॉपी, फसवणूक होते! खोटेनाटे सर्टिफिकेट मिळते. त्यावेळी प्रमाणपत्र नसूनही दर्जा होता. तांत्रिक तयार केलेले अहवाल नसले, तरी एंड रिझल्ट उत्तम होता. आता सगळेच गणित उलटे झाले आहे. भपका, नाटक पण वाढले. पैशाचा खेळ झालाय आता शिक्षण म्हणजे! ावेळी हे असे असले तरी पुढे काय होईल देवच जाणे! कारण आतापर्यंत माणूस आपली बुद्धिमत्ता वापरत होता. आता आपली बुद्धी गहाण ठेवून संगणकाची कृत्रिम बुद्धिमत्ता वापरत आहेत. तेव्हा उद्याचे जग, उद्याचे शिक्षण कसे असेल याचा विचार न केलेलाच बरा. जे जे होईल ते ते पाहावे हे धोरण उत्तम!

७६५९०८४५५५

## वेध

**रेवती जोशी-अंधारे**

# शहाणी जीवनशैली... हारा हाचि बू!

यंदा देशाने आपला ७९ वा स्वातंत्र्य दिन साजरा केला. त्या दिवशी लाल किल्ल्यावरून देशबांधवांना संबोधित करताना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भारतीयांनी आहारात तेलाचे प्रमाण कमी करण्याचे आवाहन केले होते. भारतीय कुटुंबांनी स्वयंपाकातील तेलाचा वापर किमान १० टक्क्यांनी कमी करायला हवा; जेणेकरून वाढता लठ्ठपणा आणि त्यातून येणारे मधुमेह किंवा उच्च रक्तदाबासारखे विकार टाळता येतील. वर्ष २०१९ मध्ये पंतप्रधान मोदी यांनीच फिट इंडिया चळवळीची सुरुवात केली होती. हे सगळे विषय आज पुन्हा चर्चेला येण्याचे कारण 'हारा हाचि बू'ची वाढती लोकप्रियता हे ठरले आहे.

आपल्या देशात मध्येच केव्हातरी लोकांमध्ये डायटचे फॅड येते. किटो डायट, ऋतुजा दिवेकरांचे डायट, योगगुरू रामदेव बाबांचे डायट, मेडीटेरेनियन डायट, डॅश डायट, लो कार्ब डयट, ॲटकिन्स डायट... अजून बरेच! पण, पारंपरिक भारतीय आहारशास्त्राच्या सर्वाधिक जवळचा डायट प्लान म्हणजे हारा हाचि बू! जपानी मूळ असलेला हा डायट प्लान आपल्या लोकांना प्रचंड आवडतो आहे. याचे खरे कारण म्हणजे त्याच्या अंमलबजावणीतील सोपेपणा! तांदूळ-डाळी बंद, भाज्या बंद, कर्बोदके बंद-प्रथिने सुरू, अमुक अंतराने जेवण, तमुक धान्याचा नाश्ता, दिवसभर १० लिटर पाणी अशा भन्नाट कल्पना ऐकून आणि वाचून, 'आज कुछ तूफानी करते हैं' म्हणत नवीन पिढी असे डायट प्लॅन डोळे झाकून 'फॉलो' करते.

मग, 'हारा हाचि बू' वेगळा कसा? तर, निवडक पदार्थ न खाता जे खाताय ते खा पण, पोट ८० टक्केच भरू द्या. 'हारा हाचि बू' या जपानी शब्दांचा अर्थच असा आहे की, घशापर्यंत खाऊ नका. अन्नावर पचनक्रिया होण्यासाठी, त्यातील वायू निघण्यासाठी, पाण्यासाठी पोटाचा २० टक्के भाग रिकामा ठेवावा. रोजचे जेवण वरण-भात, भाजी-पोळी, कढी-कोशिंबीर, लोणचं-चटणी हे सगळे खा पण, पोट ८० टक्के भरताच थांबा! प्राचीन चीनमध्ये कन्फुशियस या विचारवंताने 'हारा हाचि बू'ची संकल्पना सर्वप्रथम मांडली. त्याचे फायदे लक्षात घेऊन लोकांनी हीच आहार पद्धती अवलंबिली. जपानच्या ओकिनावा प्रांतातील लोक दीर्घायुषी होतात. ओकिनावाला जगाचा 'ब्ल्यू झोन' म्हटले जाते. या निरामय दीर्घायुष्यामागच्या कारणांपैकी एक महत्त्वाचे म्हणजे 'हारा हाचि बू'! या भागातील लोक इतरांपेक्षा सरासरी २० ते २५ टक्के कमी कॅलरीज खातात आणि दैनंदिन जीवनात अगदी बालपणापासून मरेपर्यंत 'हारा हाचि बू' डायटनुसारच आहार घेतात. ओकिनावा सेंटेनरियन स्टडी या सलग ४० वर्षे चाललेल्या अभ्यासातून कॅलरी कमी करण्यासाठी 'हारा हाचि बू' ही सर्वाधिक सोपी आणि नैसर्गिक पद्धत असल्याचे स्पष्ट झाले आहे. रोजचा आहार घेण्याची ही पद्धत म्हणजे वैद्यकीय भाषेत 'कॅलरिक रिस्ट्रिक्शन' होय. मुळात आहारच कमी केल्यास साहजिकच कॅलरीज कमी, पेशींवरचा ऑक्सिडेटिव्ह ताण कमी, मधुमेह-हृदयरोग, अल्झायमर आणि स्ट्रोकचा धोका कमी परिणामी, वृद्धत्वाची गती कमी होते. हे निष्कर्ष जगभरातील संशोधकांनी वेगवेगळ्या काळात आपापल्या संशोधनातून नोंदविले. अन्न हळूहळू आणि चावून खाल्ल्यास, घ्रेलिन नावाचा हार्मोन मंदावतो आणि पोट भरल्याची भावना निर्माण होते. पोट भरल्यानंतर लेप्टिन हार्मोन कार्यान्वित होऊन, मेंदूला 'आता पुरे' असा संदेश देतो. 'हारा हाचि बू' अंमलात आणणे इतर डायटच्या तुलनेने सोपे वाटते. ताटात वाढून घेतानाच कमी घ्या, प्रत्येक घास २० ते ३० वेळा चावावा, जेवणाची प्रक्रिया किमान २० मिनिटे चालते, 'माईंडलेस इटींग' म्हणजे टीव्ही-मोबाईल बघत जेवण करणे टाळून 'माईंडफुल इटींग' करा, जेवण सुरू करण्यापूर्वी पाणी किंवा सूप प्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे 'आता पुरे' हा क्षण ओळखून, ढेकर येईपर्यंत खाऊ नका, असे 'हारा हाचि बू'चे सूत्र आहे. बाकी तांत्रिक बाबी सोडल्या तर, 'हारा हाचि बू' रोजच्या जीवनात करणे सहजशक्य आहे. 'सर सलामत तो पगडी पचास' हे सूत्र लक्षात ठेवून, हा नवा ट्रेंड भारतीयांनी अंमलात आणायला हवा. फक्त आपला 'हारा हाचि बू' कुठे म्हणजेच आपल्याला 'कुठे थांबायचंय' एवढे प्रत्येकाच्या लक्षात येणे महत्त्वाचे!

९८५०३३९२४०

## दखल


# तेव्हा कुठे जाते मराठी अस्मिता?

**मोरेश्वर बडगे**

१० वर्षांपूर्वीचे दिवस आठवा. विधानसभा अधिवेशनासाठी मायबाप सरकार नागपुरात येई तेव्हा त्याचे स्वागत कसे होत असे? कडकडीत 'विदर्भ बंद'चे आवाहन केले जात असे. वेगळ्या विदर्भ राज्याच्या मागणीसाठी विदर्भवाद्यांचा लाखालाखांचा मोर्चा विधानसभेवर येत असे. पोलिसांना लाठीमार करावा लागे. प्रसंगी अश्रुधूरही. विदर्भाचा बॅकलॉग कसा वाढतोय हे विरोधी नेते हिरीरीने सांगत. जांबुवंतराव धोटे मैदानात असेपर्यंत विदर्भ राज्यासाठीचे आंदोलन जोरात होते. नंतरचे नेते हा दबाव टिकवू शकले नाहीत. विदर्भवादी संपले अशातला भाग नाही. विदर्भाचा संपूर्ण विकास झाला अशीही परिस्थिती नाही. तरीही विदर्भ राज्याचा आवाज कुठेतरी क्षीण झाला आहे. याला कारण आहे. वेगळे राज्य घेऊन जे मिळायचे ते महाराष्ट्रात राहून मिळत असेल तर फुटून निघण्याची भाषा का करायची? असा व्यवहारी विचार विदर्भाची जनता करू लागली आहे.

लोकांना विकास हवा आहे. भाजपा आणि महायुतीचे सरकार तो देत आहे. वेगळ्या राज्याची मागणी देशभर आहे. आज ना उद्या केंद्र सरकारला झुकावे लागेल. काही नवी राज्ये द्यावी लागतील. तेव्हा विदर्भ राज्य मिळाले तर विदर्भाच्या जनतेला आनंदच होईल. पण आज त्यासाठी रस्त्यावर यायची जनतेची मानसिकता नाही. नागपूर अधिवेशनानिमित्ताने सरकार नागपुरात मुक्कामाने असताना हेच चित्र पाहायला मिळते. २०१४ पूर्वीचा विदर्भ आठवा आणि आताच विदर्भ पहा. खूप काही बदलले आहे. पूर्वी नागपुरात काही घडत नसे. अधिवेशनापुरतं नागपूर जागत असे. अधिवेशन संपलं की ११ महिने नागपूर झोपून जात असे. आज नागपूर २४ तास जागं असताना दिसते आहे. मोठमोठ्या संस्था इथे आल्या आहेत. पुण्याच्या आधी नागपुरात मेट्रो रेल्वे आली. लहान-मोठे उद्योग आले. नागपूर झपाट्याने बदलतं आहे. सर्वाधिक विदेशी गुंतवणूक महाराष्ट्रात येत आहे. मुंबईत नवे विमानतळ आले, कोस्टल रोड झाला, मेट्रो ३ धावू लागली. केंद्रात भाजपाचे सरकार आहे. त्याचा फायदा महाराष्ट्रातल्या महायुती सरकारला होत आहे. विकासाचे प्रकल्प फटाफट मोकळे केले जात आहेत. राजकारण हा पार्टटाईम जॉब नाही, हे फडणवीसांनी छान ओळखलं आहे. त्यांची १८-१८ तासांची मेहनत आणि कामाचा झपाटा चकित करणारा आहे. त्यामुळेच तर आजच्या कुरघोडीच्या राजकारणात फडणवीस रिझल्ट देऊ शकले. बदलांची दिशा ओळखून फडणवीस निर्णय करीत आहेत. येत्या १० वर्षांत महाराष्ट्र देशातले मोठे आर्थिक केंद्र झालेला दिसेल.

देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राला पडलेलं सुंदर स्वप्न आहे, असे मी नेहमी म्हणतो. व्हिजनरी नेता मिळाला तर तो काय चमत्कार करू शकतो ते आपण फडणवीस यांच्या रूपात पाहतो आहे. त्यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली त्या गोष्टीला आता वर्ष झालं. २०१५ मध्ये 'अधिकारी ऐकत नाहीत' म्हणणारे फडणवीस आज 'ऐकावंच लागेल' असे म्हणतात. हा मोठा बदल आहे. आल्या आल्या १०० दिवसांचा कार्यक्रम देऊन फडणवीसांनी अधिकारी



आणि मंत्र्यांना कामाला लावले. वर्षानुवर्षे कुण्या मंत्र्याचे पीए किंवा कुठल्या खात्यात ठाण मांडून बसलेल्या अधिकाऱ्यांना त्यांच्या खात्यात परत पाठवताना त्यांच्यातल्या कणखर मुख्यमंत्र्यांचे दर्शन झाले. आजवर कुण्याही मुख्यमंत्र्याने वाटली नसेल एवढी वैद्यकीय मदत त्यांनी गरजू रुग्णांना वाटली. मागेल त्याला सौर पंप या त्यांच्या योजनेची गिनीज बुक ऑफ रेकॉर्ड्सला दखल घ्यावीशी वाटली. शांत, संयमी, मितभाषी, कठीण परिस्थितीत न डगमगणारा, डोक्याचा वापर करणारा हा मुख्यमंत्री आज महाराष्ट्राचा ब्रँड झाला आहे. ते सहसा कोणाच्या वाटेल जात नाहीत. पण अंगावर आलेल्याचा करेक्ट कार्यक्रम केल्याशिवाय सोडत नाहीत. महाराष्ट्राचे राजकारण कित्येक वर्षे शरद पवार यांच्याभोवती फिरत होते. फडणवीसांनी हे चक्र उलटे केले. राजकारणात फडणवीस यांनी केलेल्या तोडफोडीमुळे तर त्यांना 'चाणक्य' म्हटले जाते. फडणवीस समोरच्याचा विश्वास कमावतात. पण विश्वासघात करणाऱ्याला सोडत नाहीत. २०१९ ची विधानसभा निवडणूक भाजपा आणि शिवसेना यांनी युती करून लढवली. जनतेने या युतीला बहुमताचा कौल दिला. मात्र, निकालानंतर उद्धव ठाकरे यांची नियत फिरली. मुख्यमंत्री होण्याच्या स्वार्थापायी त्यांनी भाजपाला दगा दिला. शरद पवारांच्या मांडीवर जाऊन बसले. अवघ्या अडीच वर्षांतच फडणवीसांनी याचा बदला घेतला. ठाकरेंची शिवसेनाच फोडली. नंतर अजित पवारांना कामाला लावले, शरद पवारांची माणसं फुटत नाहीत असा सर्वसाधारण समज होता. फडणवीसांनी अजितदादांना फोडले. काकाला एकदम रिकामं केलं. दोन-दोन पक्ष फोडून विरोधकांना थंड करणारे फडणवीस यांना आज महाराष्ट्राने 'देवाभाऊ' म्हणत डोक्यावर घेतले आहे. एकाच वेळी आपण काय काय करू शकतो, ते देवाभाऊने दाखवले. तीन पक्षांची महायुती नावाची सर्कस देवाभाऊ लीलया सांभाळत आहेत. मध्यंतरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि त्यांच्यात अबोला आहे अशी चर्चा रंगली होती. दोघात संवाद नाही असे मीडिया दाखवत होता. पण शिंदे यांनीच तो खोटा प्रचार हाणून पाडला. 'बॉलिवूडमध्ये बिग बी' आहे. आमच्याकडे 'बिग डी' आहे, अशा शब्दात शिंदेंनी देवाभाऊंचे वर्णन केले. ज्याच्याशी खटकलं त्याच्याबाबतीत कुणी या प्रकारे बोलू शकतो? देवाभाऊंना माणसं जिंकण्याची कला छान अवगत आहे. देवाभाऊंना माणसं हाताळता येतात. ते त्यांच्या प्रत्येक कृतीत दिसून येते. उद्धव ठाकरे देवाभाऊंना टोमणा मारण्याची एकही संधी सोडत नाहीत. म्हणून देवाभाऊने त्यांच्याशी कसे वागावे? बाळासाहेब ठाकरे यांचे मुंबईत स्मारक होत आहे. त्या स्मारक समितीचा अध्यक्ष देण्याचा विषय आला तेव्हा देवाभाऊने उद्धव ठाकरे यांचे नाव ओक्के केले. प्रतिस्पर्ध्याला जिंकण्यासाठी आणखी काय करायचे असते? 'सारे विरोधी पक्ष देवाभाऊच चालवतात' असे मंत्री मंगलप्रभात लोढा म्हणाले होते. त्यांचे काय चुकले?

नागपुरात सध्या भरलेल्या विधानसभा अधिवेशनाचे एक विशेष आहे. विरोधी नेत्याशिवाय हे अधिवेशन पार पडत आहे. विधानसभा आणि विधानपरिषद अशा दोन्ही सभागृहाला विरोधी नेता नाही. विधान परिषदेत अंबादास दानवे होते. पण त्यांची आमदारकी संपली. आता विरोधी नेताच नाही असे हे पहिल्यांदाच घडते आहे. लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीला चांगले यश आले. मात्र विधानसभा निवडणुकीत सुपडा साफ झाला. त्या धक्क्यातून विरोधकांना अजून सावरणं जमलेले नाही. विधानसभा निवडणुकीत ठाकरे सेनेचे २० आमदार निवडून आले. काँग्रेसचे १६ तर शरद पवारांच्या राष्ट्रवादीचे फक्त १०. तिघे मिळूनही ४६ आमदार होतात. आता सभागृहातले विरोधी पक्षनेतेपद मिवण्यासाठी उद्धव ठाकरे यांची धडपड सुरू आहे. पण कसे मिळणार? त्यासाठी सभागृहाच्या सदस्य संख्येच्या किमान १० टक्के आमदार पाहिजेत. महाविकास आघाडीमधल्या तिन्ही पक्षाकडे २९ आमदार नाहीत. तरीही विरोधकांचा आग्रह चालू आहे. कुठली अट लागत नाही, असा विरोधकांचा दावा आहे. पण १० टक्के खासदार नसल्याने लोकसभेच्या पहिल्या तीन निवडणुकीत कोणालाही विरोधी पक्षनेतेपद मिळालं नव्हतं, हे ते सोयीस्करपणे विसरतात. सध्या साऱ्यांना महापालिका निवडणुकीचे वेध लागले आहेत. गेली २५ वर्षे मुंबईचे महापौरपद शिवसेनेकडे होते. यावेळी काट्याची टक्कर आहे. भाजपाला आपला महापौर बसवायचा आहे. निवडणुकीच्या निमित्ताने उद्धव सेनेने मराठीचा मुद्दा पुन्हा उकरून काढला आहे. मराठी अस्मितेचा विषय काढत ठाकरेंनी वातावरण तापवलं आहे. त्यासाठी आपला चुलतभाऊ मनसेचे सुप्रीमो राज ठाकरे यांना सोबतीला घेतले आहे. अडचणीची वेळ आहे म्हणून ठाकरेंना मराठी आठवली. पण राजकारण खेळायचे असते तेव्हा मराठीचे काय होते?

राज्यसभेत पाठवायचं होतं तेव्हा ठाकरेंनी कोणा कोणाला पाठवलं? तेव्हा त्यांना चंद्रिका केनिया, प्रीतिश नंदी, वेणुगोपाल धूत आठवले? आजच्या घडीला प्रियांका चतुर्वेदी शिवसेनेच्या राज्यसभा सदस्य आहेत. मोक्याच्या वेळी कुठे गायब होते तुमची मराठी अस्मिता? महापालिका निवडणुकीत मराठी माणूस हा प्रश्न नक्कीच विचारणार आहे.

९८५०३०४१२३

(लेखक ज्येष्ठ पत्रकार आहेत.)

## वाचक पत्रे

### सण आणि आंब्याचे पान



हिंदू संस्कृतीमध्ये आंब्याच्या पानाला विशेष महत्त्व आहे. ज्या दोरीवर सर्व आंब्याची पाने एकत्र केली जातात त्यास तोरण असे म्हटले जाते. अगदी पुरातन काळापासून या आंब्याच्या पानाला घरच्या उंबरठ्यावरच्या दारावर जागा नेमून दिलेली आहे. हिरव्यागार लांब पानामुळे घराची शोभा वाढीस लागते. तसे पाहिले तर निसर्गात अनेक झाडं आहेत आणि अनेक झाडांची पाने आकर्षक आहेत. तरी आंब्याच्या पानांची निवड शुभ कार्यासाठी केली जाते. लग्नाच्या आदल्या दिवशी वर आणि वधूच्या घरासमोर मांडव टाकण्यापासून फुलांच्या हारापर्यंत या पानांचा वापर करतात. आंब्याच्या पानाला डहाळी म्हटले जाते. आंबा हा गुणकारी आहेच. उन्हाळ्यात आपण सारेच आंब्याचा आस्वाद घेत असतो. आंब्यासोबत त्या झाडांची पानेही गुणकारी आहेत. अँटी ऑक्सिडंट म्हणूनही ही पाने उपयुक्त असून ती पाण्यात उकळून अथवा चूर्ण स्वरूपात वापरता येतात. आंब्याची कोवळी पाने टॅनिनने युक्त असतात. डायबेटिसची सुरवात असेल तर ही पाने वाळवून पावडर करावी व पाण्यात रात्रभर भिजवून ती गाळून सकाळी हे पाणी प्यावे. त्याने मधुमेहाची लक्षणे कमी होतात, ब्लड प्रेशर कमी करण्यासाठी, रक्तवाहिन्यांचे काठिण्य कमी करण्यासाठी ही पाने उपयोगी आहेत. मनात असलेली अस्वस्थता या पानांनी दूर करता येते. त्यासाठी आंघोळीच्या पाण्यात ही पाने टाकावी. पित्तखडे अथवा मूत्रखड्याचा त्रास होत असेल तर पानांचे बारीक चूर्ण पाण्यात भिजवून रात्रभर ठेवावे व हे पाणी सकाळी प्यायलाने पित्तखडे, मूत्रखडे मोडतात व शरीराबाहेर पडतात. सर्व श्वासविकारांवर म्हणजे सर्दी, अस्थमा यावर पानांचा पाण्यात उकळवून केलेला काढा घेतल्याने बरे वाटते. त्यात थोडा मध घातला तर कफावर गुणकारी ठरतो. कानदुखीचा त्रास होत असेल तर पानांचा रस काढून चमचाभर रस कानात थेंबथेंब टाकत रहावा. उचक्या लागत असल्यास अथवा घशाचा त्रास होत असल्यास ही पाने जाळून त्याचा धूर श्वासमार्गे आत ओढावा. पोट स्वच्छ व हलके राहण्यासाठी एका झाकणाच्या डब्यात पाने पाण्यात टाकून झाकण लावावे व रात्रभर ते तसेच ठेवून सकाळी गाळून हे पाणी अनशा पोटी प्यावे. असे हे गुणकारी आंब्याचे पान आहे. तेंव्हा आपल्या घरात फक्त सणासुदीलाच नाही तर आयुर्वेदिक म्हणून या पानांचे स्वागत करू या.

**नासा येवतीकर**/९४२३६२५७६९

### सेवा करणारे हात कधीच मळत नसतात

सेवा धर्म हा जगातील सर्वश्रेष्ठ धर्म आहे. सेवा शुद्ध भावनेने करणे, सेवा करीत असताना कोणताही स्वार्थ मनी न बाळगता, कोणताही हेतू मनी न बाळगता सेवा करीत राहणे हा मानवी धर्म आहे. 'जनसेवा हीच ईश्वर सेवा' असे नेहमी संबोधले जाते. दीन-दुबळे, गोर-गरीब, दिव्यांग-अबलांची सेवा, प्राणिमात्रांची सेवा इत्यादी सेवा असेल तर या सर्व सेवा नि:स्वार्थी वृत्तीने करणे हा मानवी धर्म आहे. सेवा करीत असताना ती नि:स्वार्थी, सकारात्मक, विधायक व प्रामाणिकतेची असावी, अशी सेवा ज्या हातांनी ज्या मनाने ज्या शुद्ध भावनांनी केली जाते या सर्व बाबी कधीच मलिन होत नसतात; उलट मनापासून नि:स्वार्थ सेवा असल्यास वरील सर्व बाबी पवित्र, मंगल, स्वच्छ तसेच निर्मळ बनतात. याबाबत अनेक धार्मिक व ऐतिहासिक दाखले आहेत. निकोप, नि:स्वार्थी मनापासून केलेली सेवा ही पवित्र व निर्मळ भावना असते हे कदापिही विसरता कामा नये.

**धोंडीरामसिंग राजपूत**/९४२१३१२२४४

रविवारची पत्रे व वाचक पत्रे पाठविण्यासाठी ई-मेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

## आजचे संघगीत-७०

शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५

### भगवा झेंडा प्राण माझा, भगवा झेंडा प्राण

भगवा झेंडा प्राण माझा, भगवा झेंडा प्राण
जिंदगीची आण माझ्या जिंदगीची आण ॥धृ.॥

डुलते कशी पहा रायाची स्वारी
खुशीत आला राया डुलतोय भारी
मोतियांची खाण माझी मोतियांची खाण ॥१॥

याच्याच छायेखाली हिंदुमर्दानी
गनिम पिटाळिलं पाजुन पाणी
माझ्या अंगी त्राण त्येचं माझ्या अंगी त्राण ॥२॥

अन्यायाची आता येई शिसारी
घेऊन हातामधी नंग्या समशेरी
करू दाणादाण सारी करू दाणादाण ॥३॥

साऱ्या गावामधी वेशीवेशीला
प्रांता प्रांताला अन् साऱ्या देशाला
मांडुन बसला ठाण आता मांडुन बसला ठाण ॥४॥

ग्यानबा तुकाराम विठु रखुमाई
याच्यात दिसती मला काशी गंगामाई
गेलं हरपुन भान माझं गेलं हरपुन भान ॥५॥

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## संक्षिप्त वृत्त...

### स्व. भोलारामजी कांकरिया यांच्या ४९व्या स्मृतिदिनानिमित्त रविवारी गंगाखेडात मोफत हृदयरोग व नेत्र तपासणी शिबिर

**गंगाखेड,/प्रतिनिधी :** स्व. भोलारामजी कांकरिया बहुउद्देशीय चॅरिटेबल ट्रस्ट गंगाखेड व आनंदऋषिजी हॉस्पिटल अँन्ड हार्ट सर्जरी सेंटर अहिल्यानगर यांच्या संयुक्त विद्यमाने स्व. भोलारामजी कांकरीया यांच्या ४९व्या स्मृतिदिनानिमित्त रविवार १४ डिसेंबर रोजी गंगाखेडात मोफत हृदयरोग व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले.

शिबिराचे उद्घाटन जिल्हा पुनर्वसन अधिकारी प्रतिभा गोरे यांच्याहस्ते व गंगाखेड येथील पोलिस अधिक्षक श्रीकांत डोंगरे, ऱ्हदयरोगतज्ञ डॉ. हेमंत मुंढे (गंगाखेड), ऱ्हदयरोगतज्ञ डॉ. रविराज गवळी (अहिल्यानगर), ऱ्हदयरोगतज्ञ रविंद्र येळीकर (अहिल्यानगर), एपीआय दिपाली गित्ते व महेश बँकेचे अध्यक्ष घनशाम मालपाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.

या शिबीरात अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया व फ ेकोलेझर शस्त्रक्रिया शिबीरही होणार आहे. सर्व तपासण्या व मार्गदर्शन ऱ्हदयरोग विशेषज्ञ डॉक्टरांकडून करण्यात येणार आहे. फक्त ऱ्हदय रुग्णांसाठी प्रवेश असणार असून त्यासाठी तपासणी निशुल्क असेल, रक्तातील साखर व ईसीजीची निशुल्क तपासणी केली जाणार असून गंगाखेड येथील डीपी रस्त्यावरील राजेश्वर फंक्शन हॉलमध्ये हे शिबीर होणार आहे. दरम्यान, या शिबिरात सहभागी होणाऱ्यांनी नाव नोंदणी करावी, त्यासाठी बीकेबीसी ट्रस्ट, अमर करंडे, सिध्दार्थ दर्डा, आनंद धोका, रमेश औसेकर, नंदू सोमानी, विजय बंग, रामेश्वर भोसले, रामेश्वर बचाटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

### मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २२ लाख रुपयांचा धनादेश सुपूर्द :

#### माजी आ.बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त उपक्रम

**परभणी,/प्रतिनिधी :** माजी आमदार बोर्डीकर यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी केलेल्या आवाहनाला प्रतिसाद देत जिंतूर-सेलू मतदारसंघातील सर्व बोर्डीकर प्रेमी, आजी-माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या सहकार्याने मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी २२ लाख रुपयांचा निधी जमा करण्यात आला.

या निधीसाठीचा धनादेश आज गुरुवारी (दि.११) मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना सुपूर्त करण्यात आला. यावेळी जिल्ह्याच्या पालकमंत्री सौ. मेघना साकोरे बोर्डीकर, तालुकाध्यक्ष गणेश काटकर, शहराध्यक्ष अशोक शेलार, प्रभाकर वाघीकर, सुनिल भोंबे, अभिजित पारवे, गजानन बोर्डीकर, नामदेव आवटे आदी उपस्थित होते.

### अपघात टाळण्यासाठी वाहनांना निःशुल्क रिफ्लेक्टर पट्टी अभियान : डॉ. खोडवे

**परभणी,/प्रतिनिधी :** सामाजिक दायित्व म्हणून डॉ. संजीव खोडवे यांनी त्यांच्या वडील स्व. दिवाकर खोडवे यांच्या स्मरणार्थ आर.टी.ओ. मान्यताप्राप्त ३एम रेट्रो रिफ्लेक्टर पट्टी सर्व प्रकारच्या वाहनांसाठी निःशुल्क उपलब्ध करून देण्याचे अभियान सुरू केले आहे.

या अभियानांतर्गत आज गुरुवार ११ डिसेंबर रोजी जिंतूर रस्त्यावरील विसावा कॉर्नर येथे वाहनांना रेट्रो रिफ्लेक्टर पट्टी लावण्यात आली. यावेळी परिवहन अधिकारी पराशर व पोलिस निरीक्षक दंतूलवार यांनी नागरिकांना या उपक्रमाला सहकार्य करण्याचे आवाहन केले. रस्ते अपघात टाळण्यासाठी रिफ्लेक्टर पट्ट्यांचा वापर अत्यंत आवश्यक असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. दरम्यान, गेल्या तीन दिवसांत एकूण ९४ वाहनांना निःशुल्क रिफ्लेक्टर पट्टी लावून देण्यात आल्या असून पुढील काही दिवस ही सेवा सुरू राहणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

### महानगरपालिकेतर्फे आयोजित शालेय क्रीडा स्पर्धा उत्साहात; २८०० विद्यार्थ्यांचा सहभाग

**परभणी,/प्रतिनिधी:** महानगरपालिकेद्वारे आयोजित १४ ते १९ वयोगटातील मुला-मुलींच्या शालेय क्रीडा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. या स्पर्धा २० नोव्हेंबर रोजी सुरू झालेल्या या स्पर्धेचा समारोप ५ डिसेंबर रोजी झाला.

या क्रीडा महोत्सवात विविध खेळांच्या एकूण ५० स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धा शहरातील स्टेडियम मैदान, शिवाजी महाविद्यालय मैदान, डॉ. जाकीर हुसेन मैदान, आदर्श विद्यालय, न्यू ज्योतिर्गमय स्कूल, जामकर महाविद्यालय, बॅडमिंटन हॉल, कल्याण मंडपम, जलतरणीका तसेच विविध शाळांच्या मैदानावर घेण्यात आल्या.

या स्पर्धांमध्ये शहरातील ४५ शाळा आणि ५ महाविद्यालयांमधून एकूण २८०० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. सर्वच खेळांमध्ये विद्यार्थ्यांनी चुरशीने भाग घेतल्याने स्पर्धा अत्यंत उत्साहवर्धक वातावरणात पार पडल्या. स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यामध्ये आयुक्त नितीन नार्वेकर तसेच उपायुक्त प्रज्ञावंत कांबळे यांचे मोलाचे योगदान राहिले. विजेत्या खेळाडूंना बक्षिसांचे वितरण आयुक्तांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

या स्पर्धांच्या यशस्वी आयोजनासाठी जिल्हा क्रीडा अधिकारी साखरे, महानगरपालिकेचे सहाय्यक आयुक्त, स्वच्छता निरीक्षक, अधिकारी-कर्मचारी, मनपा क्रीडा अधिकारी राजकुमार जाधव, हैबती हत्तीआंबिरे, अक्षय अहिरराव, तसेच क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, क्रीडा संघटना आणि पंच यांचे सहकार्य लाभले. महानगरपालिकेतर्फे त्यांच्या सर्वांचे आभार मानण्यात आले.

सोलापूर तरुण भारत

कार्यालयाचा पत्ता- डॉ.लोया नेत्र रुग्णालयासमोर ढवळे यांचे निवासस्थान शिवाजी नगर, परभणी

तात्काळ प्रतिनिधी नेमणे आहे.

संपूर्ण मराठवाडयामध्ये झपाटयाने वाढणाऱ्या **दै.सोलापूर तरुण भारत** साठी परभणी जिल्हयात खालील ठिकाणी प्रतिनिधी नेमणे आहे.

**१.गंगाखेड-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी, **०२. पूर्णा-** तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०३. मानवत** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी,

**०४. पालम** - तालुका प्रतिनिधी व शहर प्रतिनिधी **०५. सेलू** - शहर प्रतिनिधी ताडकळस, बोरी, राणी सावरगाव, कौसडी, चारठाणा, वालूर या सर्व ठिकाणी तात्काळ प्रतिनिधीची नियुक्ती करावयाची आहे. पत्रकारितेतील अनुभव असलेल्या व दै.तरुण भारतसाठी काम करु इच्छिणाऱ्या प्रतिनिधींनी संपर्क साधावा.

**जिल्हा प्रतिनिधी- मोहन धारासूरकर**

९४ २३३२४६६५, ९२८४६६४४३०, ९२८४६९५५८३

# ओडिशात हरवलेल्या आजी महाराष्ट्रात परतल्या

## मुळचे परभणीचे झारगुडाचे जिल्हाधिकारी चव्हाण व सीईओ नरवाडे यांची उल्लेखनीय कामगिरी

**मोहन धारासूरकर**
**परभणी,/प्रतिनिधी-** मानवी हक्क दिन प्रत्येक व्यक्तीचा सन्मान, सुरक्षितता आणि जगण्याचा अधिकार अधोरेखित करतो. याचे सकारात्मक उदाहरण म्हणजे ओडिशात हरवलेल्या बार्शीच्या आजी झारसगुडाचे जिल्हाधिकारी कुणाल चव्हाण आणि सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्यातील संवेदनशील समन्वयामुळे स्वगृही परतल्या.

दरवर्षी १० डिसेंबर हा दिवस मानवी हक्क दिन म्हणून साजरा केला जातो. पण यंदा, या अनोख्या घटनेने नुकताच साजरा करण्यात आलेला हा दिवस अधिकच अर्थपूर्ण ठरला. घरापासून, आपल्या माणसांपासून आणि परिचित जगापासून दूर अनोळखी ठिकाणी आजीचा हा एकाकी अनपेक्षित प्रवास ओडिशाहून व्हाया सांगली ते परत बार्शीपर्यंत प्रशासनाच्या सुंदर सहकार्याने परिपूर्ण झाला. कहाणी आहे ७३ वर्षांच्या विजयाबाई रघुनाथ जाधव यांची. विजयाबाई मूळच्या बार्शीच्या. एखाद्या चित्रपटात शोभेल असे वळण आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांच्या जीवनात आले. कुर्डुवाडी येथून हरवलेल्या या आजी परिस्थितीने ओडिशा राज्यातील झारसुगुडा जिल्ह्यातील झारसगुडा येथे ढकलल्या गेल्या. मात्र, डोळ्यांमध्ये आपल्या नातलगांकडे जाण्याची आस लावून बसलेल्या या आजींचा मानवतेवरचा विश्वास प्रशासनाच्या संवेदनशीलतेने आज दृढ झाला आहे. यासाठी त्या वारंवार कृतज्ञता व्यक्त होत्या. विजयाबाई जाधव यांचा बालविवाह झाला होता. त्यांचे पती रघुनाथ जाधव रंगकाम करत. लग्नाच्या काही वर्षानंतर त्यांच्या पतीचे निधन झाले.

पदरी दोन मुले व एक मुलगी. साफसफाईची कामे करून त्यांनी मुलांना वाढवले. एका मुलाचा विवाह करून दिला. नातवंडांत रमायचे स्वप्न रंगवणाऱ्या विजयाबाई कामानिमित्त मुलीला भेटायला कुर्डुवाडीला गेल्या होत्या. विचित्र परिस्थितीने त्यांच्या गावापासून हजारो किलोमीटर दूर त्यांना ओडिशा राज्यातील झारसुगुडा जिल्ह्यातील झारसगुडा येथे पोहोचवले. कुटुंबियांनी बार्शी तालुक्यात शोधमोहीम घेतली. पण, यश आले नाही. त्यांच्या विवंचनेत कुटुंबिय हताश झाले होते. विजयाबाई सापडण्याचा आशा धूसर झाल्या. दरम्यान, ओडिशा राज्यातील झारसुगुडा येथील रेल्वे स्थानकावर विमनस्क अवस्थेत सापडल्यानंतर तिथल्या विकाश या स्वयंसेवी संस्थेने त्यांना आपल्या कुशीत घेतले. विजयाबाई संस्थेच्या वृद्धाश्रमात गेली दोन वर्षे राहिल्या. आपले नाव आणि गावापुरती ओळख असलेली ही अशिक्षित आजी. वृद्धत्व आणि अचानक ओढवलेल्या परिस्थितीमुळे नाव वगळता अन्य अनुषंगिक ओळखही आजीच्या स्मृतीपटलाहून पुसली गेली होती. त्यामुळे तिची स्वतःची अधिक माहितीही तिला सांगता येत नव्हती. ओडिशात पोहोचल्यावर भाषेचाही मोठा अडसर होताच. अशा परिस्थितीत कुटुंबाला भेटायची आस धरून त्या प्रत्येक दिवस कंठत होत्या. संविधान दिनी संबंधित विकाश या शासननोंदित स्वयंसेवी संस्थेला भेट देण्यासाठी तिथले जिल्हाधिकारी कुणाल चव्हाण (मूळ गाव परभणी) आले होते. योगायोगाने त्यांच्या नजरेस या मराठी भाषक आजी आल्या. चेहऱ्यावर वयाने उमटवलेल्या रेषा आणि डोळ्यांमध्ये आपल्या नातलगांकडे जाण्याची अनंत ओढ. कुणाल चव्हाण यांनी परिस्थिती जाणली. त्यांनी त्यांचे बॅचमेट असलेले सांगली जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांच्याशी तात्काळ संपर्क साधला. दोघांनीही आजीची तिच्या नातेवाईकांशी भेट घडवून आणण्याचा संकल्प केला. आजीचा फोटो व सद्यस्थिती





सांगणारा व्हीडिओ मराठी भाषक असल्याने कुणाल चव्हाण यांनी स्वतः बनवला आणि विशाल नरवाडे यांनी पाठवला. सोशल मीडियावरून हा व्हिडीओ आजीच्या लेक वंदना वाघमारेपर्यंत पोहोचला. आई गवसल्याचा आनंदाच्या भरात तिने विशाल नरवाडे यांच्या टीमशी संपर्क साधला. विशाल नरवाडे, कुणाल चव्हाण यांच्या माध्यमातून वंदना वाघमारे व त्यांच्या आई यांच्याशी कॉन्फरन्स कॉलवरून संवाद झाल्यानंतर आजीची ओळख पटली. नातेवाईकांना भेटण्यासाठीची विजयाबाई जाधव यांची अधीरता पाहून विशाल नरवाडे यांनी स्वखर्चाने तिच्या परतीचा प्रवास सुकर केला. थेट ट्रेन नसल्याने प्रवासातील वेळ वाचवण्यासाठी त्यांनी विकाश संस्थेचे रश्मी रंजन राऊत यांनाच तिला परत घेऊन येण्याची विनंती केली. त्यांनीही संस्थेचे प्रमुख सुशांत बेहेरा, श्रीमती स्मिता साहु यांच्या अनुमतीने तात्काळ होकार दिला. आणि ८ डिसेंबरला परतीचा प्रवास सुरू झाला. झारसगुडा ते छत्तीसगड ते गोंदिया ते महाराष्ट्र एक्स्प्रेसने सांगली असा प्रवास मजल दरमजल करत रश्मी रंजन आणि आजीबाई आज सांगलीत पोहोचल्या. येथून त्यांना त्यांच्या कुटुंबाकडे, बार्शी येथे पाठवण्यात आले. आजी सुखरूप आहेत या भावनेने घरच्यांच्या डोळ्यांत पाणी तर आपल्या कुटुंबाकडे परतण्याच्या भावनेने आजींना हुरूप आला आहे. त्यांच्या काळजीची काजळी दूर झाली आहे. या सर्व घटनाक्रमात सांगलीचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) प्रमोद काळे, जिल्हा परिषदेचे कर्मचारी नितीन जाधव, आदिंनी आपला खारीचा वाटा उचलला. दरम्यान सांगलीत आल्यानंतर या आजीचे स्वागत मुख्य कार्यकारी अधिकारी विशाल नरवाडे यांनी केले. यावेळी त्यांनी या घटनाक्रमाची दखल राज्य मानवी हक्क आयोग, आयोगाच्या सचिव यांनी सकारात्मकतेने घेतल्याचे आवर्जून सांगितले. पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांनीही दूरध्वनीवरून त्यांची पाठ थोपटली. तसेच, जिल्हा प्रशासनाच्या वतीने जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या स्वाक्षरीचे व जिल्हा परिषद प्रशासनाच्या वतीने विकाश संस्थेचे प्रतिनिधी रश्मी रंजन यांना यावेळी आभारपत्र प्रदान करण्यात आले. ओडिशापासून सांगलीपर्यंतचा हा प्रवास म्हणजे फक्त अंतराचा नव्हे तर तो माणुसकीचा, सहकार्याचा आणि आशेचा पुल आहे. म्हणूनच सांगलीत परतल्यानंतर विजयाबाई प्रशासनाला वारंवार दुवा देत होत्या. विजयाबाई जाधव यांची ही कहाणी केवळ एका हरवलेल्या माऊलीची नाही; तर ती मानवतेवरचा विश्वास दृढ करणारी, संवेदनशील प्रशासनाचा सुंदर दाखला देणारी आणि जागतिक मानवी हक्क दिनाला अर्थपूर्णता देणारी आहे.

## दिव्यांग विशेष सहाय्य योजनेच्या अर्थसहाय्यात वाढ; वैश्विक ओळखपत्र अनिवार्य - राजापुरे

**परभणी,/प्रतिनिधी:** शासन निर्णयाअन्वये दिव्यांग विशेष सहाय्य योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या मासिक अर्थसहाय्यात वाढ करण्यात आली आहे. या निर्णयानुसार लाभार्थ्यांना मिळणारे अर्थसहाय्य रुपये १ हजार ५०० वरून २ हजार ५०० इतके करण्यात आले असून हे अर्थसहाय्य डी.बी.टी. पोर्टलद्वारे थेट लाभार्थ्यांच्या आधार-संलग्न बँक खात्यात वितरित करण्यात येणार आहे.

तसेच दिव्यांग कल्याण विभागाच्या शासन निर्णयानुसार राज्यातील सर्व दिव्यांगांना शासनाच्या विविध योजना, सवलती आणि लाभ मिळण्यासाठी वैश्विक दिव्यांग ओळखपत्र (युडीआयडी कार्ड) अनिवार्य करण्यात आले आहे.

याअनुषंगाने संजय गांधी निराधार अनुदान योजना, श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्तीवेतन योजना, तसेच इंदिरा गांधी राष्ट्रीय दिव्यांग निवृत्तीवेतन योजनेंतील दिव्यांग लाभार्थ्यांचे युडीआयडी कार्ड व आधार कार्ड यांचे परस्पर संलग्नीकरण करणे आवश्यक आहे. तसेच युडीआयडी कार्ड क्रमांक व आधार क्रमांक संलग्न असल्याची खातरजमा करणे आवश्यक आहे. परभणी तालुक्यातील सर्व दिव्यांग लाभार्थ्यांना युडीआयडी कार्ड व आधारकार्ड तहसील कार्यालयात सादर करण्याचे आवाहन परभणी तहसीलदार डॉ. संदीप राजापुरे यांनी केले आहे.

## सोयाबीन आणि वाहन चोरी प्रकरणातील आरोपी जेरबंद

### स्थानिक गुन्हे शाखेद्वारे कठोर कारवाई, पोलिसांचे यश

**परभणी,/प्रतिनिधी :** जिल्ह्यातील विविध तालुक्यांमध्ये तसेच मोठ्या गावांमध्ये झालेल्या सोयाबीन व वाहन चोरी प्रकरणांमध्ये गुंतलेल्या गुन्हेगाराला परभणी पोलिसांच्या स्थानिक गुन्हा शाखेने बुधवारी (दि. १०) कारवाई करत जेरबंद केले.

पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांनी स्थानिक गुन्हा शाखेच्या पथकाला मार्गदर्शक सूचना देऊन पथक रवाना केले. हे पथक गस्त घालीत असताना बोरी पोलीस ठाणे हद्दीतील सोयाबीन चोरी प्रकरणातील मुख्य आरोपी ज्ञानेश्वर शंकर पवार (वय २६, रा. राजीव गांधीनगर, सेलू) हा सेलू शहरात असल्याची गुप्त माहिती मिळाली. या माहितीच्या आधारे सेलू पोलिसांच्या पथकाने आरोपी ज्ञानेश्वर पवार यास अष्टविनायक मंदिर परिसरातून शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेत असताना आरोपीने पोलिसांना गुंगारा देण्याचा प्रयत्न केला मात्र पोलिसांनी पाठलाग करून त्यास पुन्हा ताब्यात घेतले. चौकशीत आरोपीने बोरी पोलीस ठाणे हद्दीतील सोयाबीन चोरीसह अनेक ठिकाणी चोरी केल्याची कबुली दिली. तसेच त्याच्यासोबत सागर सुंदर काळे (वय १९) आणि गणेश राजू कळे (दोघे रा. राजीव गांधीनगर, सेलू) हे साथीदार असल्याचेही उघड झाले.

आरोपीच्या कबुलीनुसार त्याच्या घरातून सोयाबीनचे तब्बल ४ कट्टे सोयाबीन ज्याची अंदाजे किंमत ७० हजार रुपये आहे. असा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला. आरोपी ज्ञानेश्वर पवार याने सेलू, पालम, पूर्णा, परतुर, मंठा येथेही सोयाबीन चोरी तसेच सेलू येथे शेतीपंप मोटार चोरी, परतूर आणि मंठा येथे वाहन चोरी केल्याची कबुली दिली. चोरीतील सोयाबीन अनिस पठाण वैतागवाडी, सेलू यास विकल्याची देखील माहिती दिली. त्यामुळे परभणी जिल्ह्यातील अनेक पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यांची उकल झाली आहे.

बोरी पोलीस ठाणे हद्दीत दाखल गुन्ह्यातील ७० हजार रुपयांचा मुद्देमाल, सेलू पोलीस ठाण्यात दाखल तीन गुन्हे, पालम पोलीस ठाण्यात दाखल सोयाबीन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच ०३ सीव्ही ८१४९, पूर्णा पोलीस ठाण्यात दाखल सोयाबीन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच २० सीटी ८८०२, परतुर पोलीस ठाण्यात दाखल वाहन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच २० सीटी ८८०२ टाटा एस, आणि मंठा पोलीस ठाण्यात दाखल वाहन चोरी प्रकरणातील वाहन क्रमांक एमएच ०३ सीव्ही ८८४९ अशोक लेलँड अशा एकूण आठ गुन्ह्यांची उकल झाली आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षक रवींद्रसिंह परदेशी यांच्या मार्गदर्शनात अपर पोलीस अधीक्षक सुरज गुंजाळ यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हा शाखेचे पोलीस निरीक्षक विवेकानंद पाटील, सहायक पोलीस निरीक्षक पांडुरंग भारती, सहायक पोलीस उपनिरीक्षक मधुकर साठे, सहायक पोलीस उपनिरीक्षक सुग्रीव केंद्रे, पोलीस अंमलदार भुजबळ, तूपसुंदर, बुधवंत, चव्हाण, ढवळे, हनवते यांच्या पथकाने मिळून केली.



**मानवत-** तालुक्यातील मा**नोली येथे शेतकरी संघटनेचे संस्थापक अध्यक्ष स्व, शरद जोशी यांच्या स्मृति दिन निमित्त शेतकरी संघटनेचे नेते कै शरद जोशी याना मानोली येथे अभिवादन करण्यात** आले.**यावेळी शेतकरी संघटनेचे पदाधिकारी व इतर बांधव दिसत आहेत.**

## सेलू तालुक्यातील शेतकऱ्यांनी ई-केवायसी तातडीने करावी

**परभणी,/प्रतिनिधी:** माहे सप्टेंबर २०२४, जुलै २०२५ व सप्टेंबर २०२५ मध्ये झालेल्या अतिवृष्टी, पूरस्थिती, वादळी वारे तसेच अवेळी पावसामुळे बाधित शेतकऱ्यांच्या अनुदान वाटपाची प्रक्रिया सुरु असून, ग्राम महसूल अधिकाऱ्यांमार्फत प्राप्त बाधितांची यादी ई-पंचनामा पोर्टलवर अपलोड करण्यात आली आहे. या यादीनुसार संबंधित शेतकऱ्यांचे व्हीके (विशिष्ट क्रमांक) ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी गावांत वेळोवेळी प्रसिद्ध केले असून, ई-केवायसी पूर्ण करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तथापि, अद्यापही काही शेतकऱ्यांनी ग्राम महसूल अधिकाऱ्यांकडून आपला व्हीके क्रमांक घेऊन ई-केवायसी पूर्ण केली नाही. अशा सर्व शेतकऱ्यांनी पुढील सात दिवसांच्या आत आपल्या नजीकच्या महा-ई-सेवा केंद्रामध्ये जाऊन ई-केवायसी पूर्ण करावी.

ई-केवायसी न केल्यास शेतकऱ्यांचे नैसर्गिक आपत्ती अनुदान शासनास परत करावे लागू शकते. म्हणून सेलू तालुक्यातील ई-केवायसी पूर्ण न केलेल्या अथवा प्रलंबित असलेल्या शेतकऱ्यांनी तातडीने पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन सेलू तहसिलदार डॉ. शिवाजी मगर यांनी केले आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस डॉक्टर ऑफ सायन्सने सन्मानित

**परभणी ,/प्रतिनिधी-** येथील वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या सभागृहात आज झालेल्या विशेष पदवीदान समारंभ पार पडला. विविध क्षेत्रात भरीव कामगिरी करून राज्याला विकसित करण्यासाठी केलेल्या उल्लेखनीय योगदानासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना डॉक्टर ऑफ सायन्सने सन्मानित करण्यात आले.




यावेळी व्यासपीठावर अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. इंद्र मणि, प्रमुख अतिथी भारतीय कृषि संशोधन परिषदेचे माजी महासंचालक आयसीएआर दिल्ली डॉ. मंगला राय, विशेष निमंत्रित श्रीरंग देवबा लाड, जनार्दन कातकडे, पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ अकोलाचे कुलगुरु डॉ. शरद गडाख, महात्मा फुले कृषि विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. विलास खर्चे, जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, मनपा आयुक्त नितीन नार्वेकर, उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, माजी कुलगुरु डॉ. व्ही. के. पाटील, डॉ. के. पी. गोरे, डॉ. अशोक धवण, संतोष वेणीकर, दीपक कशाळकर, अनंत कदम, डॉ. भगवान आसेवार आदी व्यासपीठावर उपस्थित होते. या पदवीदान दीक्षांत समारंभात २ हजार ९६८ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली. दीक्षांत समारंभात सन २०२४-२५ या शैक्षणिक वर्षातील विद्यापीठातील विविध अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाने व दात्यांनी निश्चित केलेल्या सुवर्ण, रौप्य पदके व रोख पारितोषिके पात्र स्नातकांना प्रदान करून मान्यवरांच्या हस्ते गौरविण्यात आले. या समारंभात एकूण ६३ पदके आणि प्रमाणपत्रे वितरण करण्यात आली. तसेच १४ विद्यापीठ सुवर्ण पदके, दात्यांकडून देण्यात येणारी ११ सुवर्ण पदके, १ रौप्य पदक आणि १२ रोख पारितोषिकांचे मान्यवरांच्या हस्ते वितरण करण्यात आले. तसेच २५ पदव्युत्तर पदवी गुणवत्ता प्रमाणपत्रांचा समावेश आहे. यामध्ये ४४ स्नातकांना आचार्य, पदव्युत्तर पदवी ३३३, व २ हजार ५९१ स्नातकांना पदवी प्रदान करण्यात आली. तसेच वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाचे माजी कुलगुरु, कृषि परिषदेचे आणि विद्यापीठ कार्यकारी परिषदेचे सदस्य यावेळी उपस्थित होते.

सोलापूर तरुण भारत

www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा संघ राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय

**तभा वृत्तसेवा**
**माजलगाव दि.१२ डिसेंबर**

टेनिसव्हॉलीबॉल महाराष्ट्र असोसिएशन यांच्यावतीने अक्कलकोट येथे घेण्यात आलेल्या २७ व्या मिनी व युथ राज्यस्तरीय टेनिसव्हॉलीबॉल स्पर्धेमध्ये सुंदरराव सोळंके महाविद्यालयाचा मुलींचा टेनिसव्हॉलीबॉल चा संघ युथ गटामधून राज्यस्तरीय स्पर्धेमध्ये द्वितीय आला आहे,



सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या संघामध्ये कर्णधार वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, आसावरी शिंदे, आरती जाधव, प्रियंका जाधव, गौरी गायकवाड या विद्यार्थिनींचा समावेश होता. या खेळाडूंचा पहिला सामना अहमदनगर जिल्हा सोबत होऊन सरळ दोन सेट मध्ये विजय मिळवला, दुसरा सामना लातूर जिल्ह्याशी झाला , लातूरच्या संघास सहज पराभूत करून, फायनल चा अंतिम सामना सांगली विरुद्ध बीड असा झाला, अंतिम सामन्यांमध्ये अटीतटीच्या लढतीमध्ये रौप्य पदक प्राप्त केले. या संघामधील उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन केल्यामुळे, २४ ते २७ डिसेंबर झारखंड येथे होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी वैष्णवी कोरडे, अदिबा शेख, यांची निवड झाली आहे, सुंदरराव सोळंके महाविद्यालयाच्या या दोन खेळाडू झारखंड येथे महाराष्ट्र संघाचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

विजेत्या खेळाडूंना प्रा. प्रविण कोरडे, प्रा. नवनाथ आवारे, प्रा. चंद्रकांत फड यांचे मार्गदर्शन लाभले.यशस्वी विद्यार्थिनीचे म.शि.प्र.मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह महाविद्यालय विकास समितीचे सदस्य ॲड. भानुदासराव डक, प्राचार्य डॉ. जी. के. सानप, प्रभारी प्राचार्य डॉ. नंदकिशोर मुळे, उप प्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, प्रा.प्रकाश गवते, प्रा.पवनकुमार शिंदे, पर्यवेक्षक प्रा.महादेव अलझेंडे, प्रा. टाक सर. प्रबंधक प्रशांत चव्हाण, प्रा. सुदर्शन स्वामी, प्रा.आय. एस. पठाण, एकनाथ मस्के,बनसोडे सर, गोकुळ शिंदे,बेदरेआदींनी अभिनंदन केले.

# मराठवाड्यात उष्ण हवामानातही स्ट्रॉबेरी शेतीचा यशस्वी प्रयोग : मयंक गांधी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ/श्रीराम लांडगे**



स्ट्रॉबेरी म्हणजे नेहमी थंड हवामान व पर्वतीय प्रदेशातील पिक अशी सर्वसाधारण धारणा. परंतु ही समजूत आता बदलत चालली असून मराठवाड्यासारख्या उन्हाळ्यात तब्बल ४२ ते ४५ डिग्री सेल्सिअस तापमान आणि हिवाळ्यात सुमारे १५ डिग्री पर्यंत घसरणाऱ्या हवामानातही स्ट्रॉबेरी पिकाचा अभिनव प्रयोग येथील कृषीकुल परिक्षेत्रात यशस्वी होत असल्याचा दावा ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष मयंक गांधी यांनी केला आहे.

यासंबंधी सोशल माध्यमातून व्हिडिओ शेअर करत गांधी यांनी स्ट्रॉबेरी विषयी माहिती देत सांगितले की नवीन तंत्रज्ञान, योग्य व्यवस्थापन आणि पिकांच्या गरजेनुसार केलेल्या उपाययोजनांच्या आधारे मराठवाड्यात केलेला स्ट्रॉबेरी शेतीचा प्रयोग अत्यंत यशस्वी ठरू शकतो. उष्ण व कोरड्या हवामानात स्ट्रॉबेरीच्या वाढीस अडथळे निर्माण होतात, असे मानले जात असतानाच कृषीकुलचा हा प्रयोग शेतकऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

थंड प्रदेशातील स्ट्रॉबेरी पिक मराठवाड्यातही शक्य

हवामानातील चढ-उतार असूनही स्ट्रॉबेरीचे रोपण, वाढ आणि फळधारणा या तिन्ही टप्प्यांमध्ये समाधानकारक परिणाम दिसून आले आहेत. त्यामुळे स्ट्रॉबेरी केवळ हिल-स्टेशनची शोभा नसून योग्य तंत्रज्ञान वापरल्यास मराठवाड्यातही फुलू शकते हे या प्रयोगातून सिद्ध झाल्याचे जलनायक मयंक गांधी यांनी सांगितले.

कृषी क्षेत्रात सतत नवनवे प्रयोग करणे वेळेची गरज असून बदलत्या हवामानाचा सामना करण्यासाठी आणि शेतकऱ्यांना नवीन पर्याय उपलब्ध करून देण्यासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता असल्याचे मतही यावेळी गांधी यांनी व्यक्त केले.

# साबला समाजसेवक,आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप



**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१२ डिसेंबर**

साबला येथील रहिवासी समाजसेवक ,आदर्श शिक्षक नरहरी काकडे यांच्या वाढदिवसानिमित्त.जि.प.प्रा . शाळा,कटारेवस्ती साबला .या विद्यालयातील सर्व विद्यार्थांना शालेय शैक्षणिक साहित्याचे वाटप करुन वाढदिवस साजरा करण्यात आला . यावेळी मुख्याध्यापक लोकरे , श्रीमती बनसोडे मॅडम,ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ,शालेय व्यस्थापन समिती अध्यक्ष गणेश कटारे,रामचंद्र राऊत, राहुल मुळे,अनिल कटारे तसेच यावेळी सर्व विद्यार्थी उपस्थित होते

# लोकनेते मुंडे यांच्या जयंतीनिमित्त ४२ रक्तदात्यांनी केले रक्तदान

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.१२ डिसेंबर**

जीवन विकास शिक्षण मंडळ केज आयोजित स्वामी विवेकानंद विद्यामंदिर माध्यमिक विभाग केज या शाळेमध्ये दिवंगत लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या ७६ व्या जयंतीनिमित्त दि. १२ डिसेंबर २०२५ वार शुक्रवार रोजी एकूण ४२ रक्तदात्यांनी रक्तदान करून रक्तदान चळवळीवरील आपले प्रेम व्यक्त केले. याप्रसंगी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून जीवन विकास शिक्षण मंडळ या संस्थेचे अध्यक्ष अंकुशरावजी इंगळे हे उपस्थित होते. तर प्रमुख पाहुणे म्हणून रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी, उपजिल्हा रुग्णालय केज श्रीकृष्ण नागरगोजे उपस्थित होते. इतर मान्यवर उपस्थितीमध्ये संस्थेचे सचिव जी. बी. गदळे, मा. वि. चे मु. अ. शिवनंदा मुळे, प्रा. वि. चे मु. अ. वसंत शितोळे, स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलचे मु. अ. गणेश कोकीळ, प्राचार्य शंकर भैरट आदी उपस्थित होते.

सदरील रक्तदान शिबिर हे मागील ३० वर्षापासून या शाळेमध्ये आयोजित केले जाते. यावर्षी सदरील शिबिराने ३१ व्या वर्षात पदार्पण केले आहे. मागील ७ वर्षापासून हे शासकीय शिबिर सुरू आहे. या शिबिराचा सर्वसामान्य याचकाला



उपयोग होतो. रक्तदानाबद्दल रक्तदात्यामध्ये बरेच गैरसमज असतात परंतु रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे, वयाच्या १८ ते ५५ वर्षापर्यंत आपण रक्तदान करू शकतो, रक्तदान केल्याने बरेच आजार कमी होतात, रोगप्रतिकारशक्ती वाढते, वजन कमी होते तसेच ७२ तासांमध्ये दिलेले रक्त पुन्हा परत येते. दर ६ महिन्याला रक्तदान केले पाहिजे जेणेकरून याचकाचे प्राण वाचतील.

याप्रसंगी माजी विद्यार्थी डॉ. अशोक डोईफोडे, सहशिक्षक महादेव गिरी तसेच कैलास अंधारे हे या शिबिराचे पहिले रक्तदाते ठरले. या शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ. श्रीकृष्ण नागरगोजे, रक्तपेढी वैज्ञानिक अधिकारी उपजिल्हा रुग्णालय केज व जिल्हा रुग्णालय बीड तसेच सतीश गायकवाड लॅब असिस्टंट, विनोद रावताडे लॅब टेक्निशियन तर युवराज बाबरे, हेमंत बेलदार, वैभव टाकळे यांनी ब्रदर्स म्हणून विशेष परिश्रम घेतले.

तसेच या कार्यक्रमाचे औचित्य साधून युवा मास्टर स्ट्रोक कॉम्पिटिशन च्या वतीने घेण्यात आलेल्या चित्रकला स्पर्धा परीक्षेमध्ये आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांनी नेत्रदीपक यश मिळविले. यामध्ये- सातवी ते दहावी गटातून कु. वेदिका सिद्धेश्वर घुले ७ वी, अनुष्का बाळासाहेब अहंकारे ७ वी, यांचा उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. वरील यशस्वी विद्यार्थ्यांना शाळेतील चित्रकला शिक्षक दादासाहेब गायकवाड यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.कार्यक्रमाचे सूत्रसंचलन व आभार सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रबोधकांत समुद्रे यांनी मानले.

# श्री नाथांच्या नगरात नवनाथ शिराळे पाटील यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.१२ डिसेंबर**

मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैभव असलेले व महाराष्ट्रातील श्री साधू संतांचे माहेर घर असलेले श्री प्रतिष्ठाननगर अर्थातच श्री दक्षिण श्री काशी क्षेत्र म्हणून ओळखले जाणारे असे श्री पवित्र श्री क्षेत्र पैठण या ठिकाणी २७ महा कुंडी महायज्ञाचे आयोजन श्री हरिभक्त परायण श्री वेदशास्त्र संपन्न व श्री शांती ब्रह्म श्री एकनाथ महाराजांचे १४ वे वंशज श्री योगीराज महाराज गोसावी यांच्या कुशल उत्तम अप्रतिम नियोजनातून व श्री योगीराज महाराज यांच्या उत्तम मार्गदर्शनाखाली त्यांच्या माध्यमातून या ठिकाणी महायज्ञाचे आयोजन करण्यात आले आहे या यज्ञासाठी श्रीक्षेत्र वाराणसी अर्थातच श्री क्षेत्र भगवान श्री विश्वनाथाचे ठिकाण असलेल्या श्री काशी क्षेत्रातील वेदमूर्ती ब्रह्म वृंदांच्या पवित्र वेद मंत्राच्या जयघोषात २७ महा कुंडी महायज्ञ व अखंड हरिनाम सप्ताह ९ डिसेंबर ते १४ डिसेंबर या दरम्यान श्रीक्षेत्र पैठण येथे संपन्न होत आहे. तसेच या ठिकाणी विविध धार्मिक कार्यक्रमाचे देखील आयोजन करण्यात आले आहे या कार्यक्रमांमध्ये सप्ताह मध्ये होत असलेले कार्यक्रम श्री विष्णुसहस्त्रनाम व हरिपाठ भजन गवळणी श्री शांती ब्रम्ह एकनाथ महाराज यांचे भारुड



तसेच हरी किर्तन हे देखील नामांकित महाराष्ट्रातील कीर्तनकार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हा धार्मिक सोहळा मोठ्या थाटामाटा मध्ये श्री क्षेत्र पैठण येथे संपन्न होत आहे याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र तथा भारतीय जनता पार्टीचे ज्येष्ठ नेते तथा बीड जिल्हा भारतीय जनता पार्टीचे उपाध्यक्ष तथा महाराष्ट्र मध्ये नामांकित असलेल्या महाराष्ट्र राज्य लोकशाही पत्रकार संघाचे महाराष्ट्र राज्य मुंबई प्रदेशचे प्रदेश उपाध्यक्ष तथा देव देश धर्म यासाठी सातत्याने आपले समाजसेवेचे कार्य करत स्वतःला समाज सेवेमध्ये सातत्याने व्यस्त ठेवणारे व गोरगरिबाच्या मदतीला सातत्याने धावून येणारे असे मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांच्या उत्कृष्ट समाजसेवेच्या कार्याची दखल घेत श्री शांती ब्रम्ह श्री एकनाथ महाराज यांचे चौदावे वंशज श्री योगीराज महाराज गोसावी यांनी दखल घेऊन मा श्री नवनाथ जी अण्णा शिराळे पाटील यांचा श्री शांती ब्रह्म एकनाथ महाराज यांच्या प्रतिष्ठानच्या वतीने मोठा धुमधडाक्यात शाल व श्री जनार्दन स्वामी व श्री संत श्री भानुदास महाराज व श्री संत शांती ब्रम्ह एकनाथ महाराज श्री विजय पांडुरंग यांची दिव्य प्रतिमा अण्णांना देऊन अण्णांचा यथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला व त्यांच्या हातून होणाऱ्या पुढील समाज सेवेसाठी श्री शांती ब्रह्म एकनाथ महाराजांच्या प्रतिष्ठानच्यावतीने श्री योगीराज महाराजांनी भरभरून आशीर्वाद दिला.

# थंडीच्या धुसर पहाटेतील शेकोटीची ऊब : शरीराला ताप , शेताला श्वास , आणि जगण्याला नवी आस

हिवाळ्याचा हंगाम : निसर्गाचा एखादा शांत कवी जणू हिवाळ्याच्या ऋतूत आपल्या मृदू श्वासाने धरतीला गारवा देत फिरतो . पहाटे धुक्याची चादर पसरलेली असते , दवबिंदूंनी चमकणारी गवताची पाती मनाला आनंद देतात . गावाकडच्या घराबाहेर दूरवर दिसणारा काळा शेतपट्टा आणि मंद गार वारा – हा संपूर्ण निसर्गाचा अनुभव अंगाला शहारे आणणारा असतो . हिवाळ्याची सुरुवात अंगात उभारी आणते , भूक वाढवते , मन प्रसन्न करते ; परंतु म्हण आहे : थंडीचा माहोल सुंदर , पण त्यात दडलेला धोका कुंदर ! म्हणूनच या ऋतूत आरोग्य , शेती , प्रवास व दैनंदिन जिवनशैली यामध्ये काळजी तितकीच आवश्यक ठरते .



चंद्रकांत सरस्वती प्रकाश शेळके (तहसीलदार बीड)

थंडीचे फायदे : हिवाळा शरीराला तंदुरुस्त ठेवणारा ऋतू मानला जातो . शरीरातील जठराग्नी वाढल्यामुळे अन्न नीट पचते आणि ताकद मिळते . शेतात काम करताना थकवा कमी जाणवतो . गहू , हरभरा , कांदा , मटार , बटाटा , कोबी , फ्लॉवर यांसारखी पिकं या काळात उत्तम वाढतात . हवेत जंतुसंसर्ग कमी असतो आणि त्वचा तजेलदार दिसते . हिवाळा अंगावर घेतल्यास शरीराला नवसंजीवनी देतो.

थंडीचे तोटे : मात्र थंडीचा दुसरा चेहराही तितकाच गंभीर आहे . लहान मुलांना सर्दी , खोकला , ताप , न्यूमोनिया , त्वचा कोरडी पडणे यांसारखे त्रास होतात . मुलांनी डोकं , कान , मानेचं संरक्षण करावं . वृद्धांना सांधेदुखी , संधिवात , बीपी चढउतार , श्वास घेताना त्रास असे त्रास अधिक होतात . त्यांना उबदार कपडे , ऊन , गरम पाणी आवश्यक ठरते . बीपीचे रुग्ण कडाक्याच्या थंडीत बाहेर पडू नयेत ; कारण रक्तवाहिन्या आकुंचन पावल्यामुळे बीपी वाढतो . हृदयरोगींसाठी तर हा ऋतू धोक्याचा – छातीत दडपण , झिणझिण्या , श्वास घ्यायला त्रास होण्याची शक्यता वाढते . अचानक श्रम व थंड हवा टाळावी.

हिवाळ्यातील ग्रामीण आहार : हिवाळा म्हणजे पौष्टिक अन्नाचा हंगाम . मेथीची भाजी , हरभऱ्याची उसळ , तिळाचे लाडू , गूळ – शेंगदाणा , कणकेची खीर , उकडलेली अंडी , मटकी , वाल , उडीद हे पदार्थ शरीराला ताकद देतात . गूळ हा थंडीतील औषध – शरीरात ऊब निर्माण करतो . दुधात हळद , आले टाकून प्यायल्यास सर्दीपासून बचाव होतो . थंडीमुळे तहान लागत नाही म्हणून लोक पाणी टाळतात ; पण ही चूक – रक्त दाट होते आणि बीपी वाढतो.

हिवाळ्यातील विहार / दिनचर्या : पहाटेची कडाक्याची थंडी टाळावी . सकाळी गरम पाणी पिऊन दिवसाची सुरुवात करावी . व्यायाम उन्ह आल्यावर करावा . कान , नाक , मान या तीन ठिकाणांमधून थंडी शरीरात घुसते , म्हणून त्यांचं संरक्षण अत्यावश्यक . धूर असलेल्या बंद जागेत बसू नये – दम्याचा त्रास वाढतो .

अचानक त्रास झाल्यास तातडीने काय करावे : सर्दी – खोकला आल्यास वाफ घ्यावी , आले – गूळ – मिरीचा काढा घ्यावा , गरम पाण्याने गुळण्या कराव्यात . श्वास घेण्यास त्रास झाल्यास रुग्णाला सरळ बसवावे , वाफ द्यावी , इनहेलर द्यावा . छातीत दडपण , झिणझिण्या जाणवल्यास तीव्र हृदयरोगाचा संकेत असू शकतो – रुग्णाला बसवून तातडीने दवाखान्यात न्यावे . बीपी वाढल्यास रुग्णाला शांत ठेवावे , औषध वेळेवर द्यावे .

हिवाळा आणि शेती : हिवाळ्यात पिकांवर विविध रोग दिसतात . गव्हात रस्ट रोग व पावडरी भुरी दिसते – मॅन्कोझेब , हेक्साकोनाझोल फवारणी करावी . कांद्यात दमट परिस्थितीत कुज – कार्बेन्डाझिम + कॉपर ऑक्सिक्लोराईड उपयुक्त . हरभऱ्यात अळ्या , फुलकिडे – इमामेक्टिन , थायमेथॉक्सॅम वापरावे . बटाट्यात करपा रोग – मेटालेक्सिल + मॅन्कोझेब फवारावे . फवारणी सकाळी १० नंतर करावी , हवामान अंदाज पाहावा .

हिवाळ्यातील प्रवास : धुकं हे वाहनचालकांसाठी मोठं संकट . धुक्याची चादर रस्ता लपवते , सावधानता जीवन वाचवते . म्हणूनच हेडलाईट लो बीमवर ठेवावे , फॉग लाईट वापरावी , काच स्वच्छ ठेवावी . वेग कमी ठेवावा , ओव्हरटेक टाळावा . रस्त्यावर अचानक प्राणी दिसण्याचा धोका वाढतो .

शेतकऱ्यांनी रात्री शेतात जाताना घ्यायची काळजी : शेतात रात्री जाणे म्हणजे सावलीत चालण्यासारखे . दोन जणांनी एकत्र जावे . टॉर्च , काठी , मोबाइल घ्यावा . दवामुळे साप , विंचू चावण्याचा धोका वाढतो . रानडुक्कर , कोल्हे यांचा धोका असतो . शेतात चुल करावी ; परंतु बंद खोलीत अंगीठी जाळू नये – कार्बन मोनॉक्साईडचा धोका . डोकं , मान , छाती झाकणं आवश्यक.

हिवाळा म्हणजे निसर्गाची परीक्षा . जो सज्ञान , तो सुरक्षित ; जो निष्काळजी , त्याला त्रास . म्हणून गावात म्हणतात – थंडीची वेल , सज्ञानाची बेल . जपलं तर धन , नाहीतर जीव गेल . थंडी अंगावर घेतली तर त्रास ; शहाणपणाने झेलली तर आराम . शेकोटीची ऊब अंगाला ताप देते आणि सावधपणाची ऊब माणसाला सुरक्षित ठेवते.

# परळीत १३ डिसेंबर रोजी मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाचे आयोजन

**बहुजन समाजाने उपस्थित राहण्याचे आवाहन**

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.१२ डिसेंबर**

बुद्धभूमी चारिटेबल ट्रस्ट आयोजित व प्रकाश वाघ निर्मित मी रमाई या एकपात्री नाट्यप्रयोगाचे परळी वैजनाथ शहरात आयोजन करण्यात आले आहे.या नाट्यप्रयोगास शहरातील बहुजनांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन निर्माते प्रकाश वाघ यांनी केले आहे. सिनेअभिनेत्री प्रियंका उबाळे या रमाईच्या भुमिकेत आहेत.

परळी वैजनात शहरात दिनांक १३ डिसेंबर २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५:०० वाजता लोकनेते गोपीनाथराव मुंडे नटराज रंगमंदिरात या प्रयोगाचे सादरीकरण होणार आहे. परळी शहरातील व ग्रामीण भागातील लोकांनी परिसरातील सर्व रसिक प्रेक्षकांनी विनंती आहे की आपण जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहून या कार्यक्रमाची शोभा वाढवावी.

या नाटकाचे दिग्दर्शक=प्राध्यापक रमाकांत भालेराव सर आहेत. लेखिका व रमाबाई आंबेडकर यांच्या मुख्य भूमिकेत आंतरराष्ट्रीय पुरस्कार प्राप्त सिने अभिनेत्री प्रियंका उबाळे या आहेत. त्यांनी अनेक चित्रपटांमध्ये भूमिका साकारलेल्या आहेत आम्ही



जरांगे,डिलिव्हरी बॉय, प्रेमवारी, मलिका = बाळूमामाच्या नावानं चांगभलं,ज्ञानेश्वर माऊली,साता जन्माच्या गाठी,अशा अनेक मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या आहेत. तसेच त्यांचे शिक्षण डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थिनी असून त्यांनी अनेक वर्ष रमाई च्या आयुष्यावर संशोधन करुन रडणाऱ्या नाही तर लढणाऱ्या रमाईचा इतिहास सांगणारे भारतातील पहिले नाटक उभे केले आहे.

घराघरात धाडसी रमाईचा इतिहास पोहोचवणारं ही संकल्पना घेवून सध्या त्यांचा महाराष्ट्र दौरा सुरु आहे.या कार्यक्रमाला परळी शहरातील आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्ते यांचे विशेष सहकार्य लाभले आहे.तसेच या नाटकाचे तांत्रिक कलावंत पार्श्व संगीत =अनिल दुधाटेप्रकाश योजन,=माणिकचंद थोरात,नेपथ्य =विशाल धनंजय कहळे ,रंगभूषा = कमलाकर चव्हाण काजल चव्हाण,प्रगती गोधणे यांनी केल्या आहेत.

या प्रयोगासाठी तिकीटासाठी प्रकाश वाघ मोबाईल क्रमांक ९६९९५१००४९, तसेच ९९६०५१५०५६ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पोत्रा-तेलंगवाडी शिवारात बिबट्याच्या हल्ल्यात दोन शेळ्या ठार

## नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता वनविभागाला संपर्क करावा- नाळे




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**

कळमनुरी तालुक्यातील पोत्रा-तेलंगवाडी शिवारात बिबट्याने परिसरातील दोन शेळ्यांवर हल्ला करीत त्यांना ठार केले असून बिबट्याच्या वावरामुळे परिसरातील नागरिकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला असून नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता वनविभागाला तत्काळ संपर्क करावा असे आवाहन विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे यांनी केले आहे.

राज्यात सध्या बिबट्यांच्या हल्ल्याच्या घटना घडत असतांना हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी तालुक्यातील पोत्रा-तेलंगवाडी शिवारात दि १२ डिसेंबर रोजी काशीराम मोदे यांच्या शेतातील आखाड्यावरील २ शेळ्यांवर हल्ला करून त्यांना ठार केल्याची घटना घडली आहे. या घटनेची माहीती मिळताच वनविभागाचे वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्यासह पथकाने घटनास्थळी तत्काळ भेट दिली. तसेच पशुवैद्यक अधिकारी यांनी शेळ्याचे शवविच्छेदन केले असून संबंधीत शेतकरी यांना तातडीची शासकीय आर्थिक मंजुरीसाठी कार्यवाही वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्या स्तरावरून करण्यात आली आहे. या परिसरात बिबट्या असल्याची खात्री वनविभागाने केली असून नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे. स्थानिक व शेतकरी यांना एकट्याने रात्री व पहाटे शेतात जाणे टाळावे तसेच शेतात जाणे अगत्याचे असल्यास गटाने जावे असे आवाहन करण्यात आले आहे. गावात आणि आखाड्यावर घराच्या बाहेर झोपणे टाळावे. आपत्कालीन परिस्थिती निर्माण झाल्यास तातडीने वन विभागास कळविण्याचे आवाहन वन विभागाने नागरिकांना केले आहे.

काहीजण एआय च्या माध्यमातून व्हिडीओ बनवून अफवा पसरल्याची बाब देखील वन विभागाच्या निदर्शनास आली आहे. सर्व नागरिकांना अशा अफवांना बळी पडू नये व घाबरून जाऊ नये. वन व वन्यजीवाच्या संदर्भात संरक्षण, वन गुन्हा किंवा संघर्षाची स्थिती निदर्शनास आल्यास तत्काळ वन विभागाच्या १९२६ या हेल्प लाईनवर संपर्क साधण्याचे आवाहन विभागीय वन अधिकारी डॉ राजेंद्र नाळे यांनी केले आहे.

# हिंगोलीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी

## श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठानचा पुढाकार

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**



येथील श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान यांच्या वतीने ज्योतिबा फुले सेवा ट्रस्ट संचलित निवासी मूकबधिर विद्यालय हिंगोली येथे महाराष्ट्राचे सुपुत्र झुंजार व्यक्तिमत्व लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची जयंती साजरी करण्यात आली. जयंतीनिमित्त संस्थेचे सचिव विठ्ठलराव गुट्टे यांनी राष्ट्रसंत भगवान बाबा व लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, प्रतिष्ठानचे पदाधिकारी व सहकारी शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित सर्वांनी लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना पुष्प अर्पण करत अभिवादन केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रतिष्ठानचे मेजर पंढरीनाथ घुगे, मुख्य अतिथी संस्थेचे सचिव विठ्ठलरावजी गुट्टे, विद्यालयाचे मुख्याध्यापक अशोक पाटील, राजकुमार झगडे, माधवजी शिंदे, प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष एकनाथराव कुटे,सहसचिव संजय बांगर, संदीप नागरे, गोपाल बांगर, बाळासाहेब आघाव, पिंटू नागरे, दत्ता घुगे, मनोज बांगर, ज्ञानेश्वर घुगे, वैभव घुगे, प्रणव गिते, गोपाल दराडे सह श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान सहकारी व शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी संग्राम कागणे, भास्कर टाले, अनिल शिंदे, किशोर सुलताने, रमेश खंदारे, विलास रायपलवार, व्यंकट मुंडे, संभाजी गुट्टे, नारायण वसु, एल टी मुंडे, विलास उबाळे ,पवार भराडे, सुभाष जाधव, स्वप्निल इंगोले, सुनील लामतुरे, मंगेश महाजन तिन्ही विद्यालयातील विद्यार्थी विद्यार्थिनी आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संजय बांगर, यांनी सूत्रसंचालन गोपाल बांगर, आभार प्रदर्शन संदीप नागरे यांनी केले. मुख्याध्यापक अशोक पाटील यांनी सत्यासाठी लढणारा लोकनेता म्हणजेच झुंजार लोकनेते गोपीनाथराव आहेत असे मनोगत व्यक्त केले. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या विषयी मनोगत व्यक्त करताना अध्यक्ष समारोपात मेजर पंढरीनाथ घुगे यांनी गोपीनाथराव मुंडे हे महाराष्ट्रातील व देशातील प्रभावी, जनसामान्यांचे नेते म्हणून ओळखले जातात. त्यांनी ग्रामीण विकास, जलसंधारण, शेतकरी प्रश्न आणि सामान्य माणसाच्या हक्कासाठी सतत लढा दिला. महाराष्ट्राच्या व राष्ट्रीय राजकारणात जन आधारित, थेट लोकांशी जोडणारा नेता म्हणून त्यांची विशेष छाप राहिली अशा भावना व्यक्त करीत लोकनेते गोपीनाथ मुंडे यांना विनम्र अभिवादन केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री संत भगवान बाबा प्रतिष्ठान हिंगोली व निवासी मूकबधिर विद्यालय हिंगोली यातील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य परिश्रम घेतले.

# कळमनुरी तालुक्यातील विकास कामांची जिल्हाधिकाऱ्यांकडून पाहणी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**



जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दि. १० डिसेंबर रोजी कळमनुरी तालुक्यातील सेलसुरा, माळधामणी, सोडेगाव व उमरा या गावांना भेट देऊन विविध विकास कामांची सविस्तर पाहणी केली.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी विवेक गायकवाड, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. कैलाश शेळके, तहसीलदार जीवककुमार कांबळे यावेळी उपस्थित होते. यावेळी त्यांनी संबंधित अधिकारी व ग्रामस्थांना आवश्यक त्या सूचना देत मार्गदर्शनही केले.

सेलसुरा येथे स्मार्ट व्हिलेज योजनेंतर्गत सुरू असलेल्या विविध उपक्रमांची पाहणी करण्यात आली. ग्रामपंचायतीत नागरिकांशी संवाद साधून स्थानिक समस्यांची माहिती घेण्यात आली. आरोग्य उपकेंद्र, जिल्हा परिषद शाळा व स्मशानभूमीची पाहणी तसेच अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी कॅम्पला भेट देऊन प्रगतीचा आढावा घेण्यात आला. माळधामणी येथे स्मार्ट व्हिलेजअंतर्गत सुरू असलेल्या कामांची पाहणी करण्यात आली. नरेगा अंतर्गत तयार करण्यात आलेला गोठा, भाऊसाहेब फुंडकर फळबाग योजनेतील प्रगतीची पडताळणी, अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी कॅम्प व ॲग्रीस्टॅक कॅम्पला भेट यांचा समावेश होता. सोडेगाव येथे स्मार्ट व्हिलेजचे काम पाहणी करून अतिवृष्टी अनुदान ई-केवायसी कॅम्पला भेट देण्यात आली. उमरा येथेही जिल्हाधिकाऱ्यांनी स्मार्ट व्हिलेज उपक्रमांची पाहणी केली. नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या अपेक्षा व अडचणी जाणून घेतल्या तसेच ई-केवायसी कॅम्पची प्रगती तपासली. या दौऱ्यादरम्यान विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



**हिंगोली- नांदेड परिक्षेत्राचे पोलिस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी हिंगोली जिल्ह्यातील अनेक पोलिस ठाण्यांची पाहणी केली. त्यानंतर संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर त्यांनी पोलिस अधिकारी, कर्मचारी यांची बैठक घेऊन अडीअडचणी व समस्यांवर चर्चा केली. यावेळी पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांची उपस्थिती होती. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### आजपासून क्रिडा सप्ताहाला सुरूवात

हिंगोली- क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय हिंगोली व जिल्ह्यातील विविध क्रीडा संघटनांच्या संयुक्त विद्यमाने १२ डिसेंबर ते १८ डिसेंबर, २०२५ या कालावधीत क्रीडा सप्ताहाचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. हिंगोली जिल्ह्यात क्रीडा संस्कृतीचा प्रचार-प्रसार, युवा शक्तीचे सबलीकरण व स्थानिक खेळाडूंच्या प्रोत्साहनासाठी या सप्ताहाचे विविध ठिकाणी आयोजन होणार आहे. या उपक्रमाचे उद्घाटन दि. १२ डिसेंबर रोजी येथील तालुका क्रीडा संकुलावर विविध क्षेत्रातील मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात येणार आहे. उद्घाटन दिवशी मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन, स्थानिक खेळाडूंचे संचलन, तसेच विद्यार्थ्यांच्या समूहगानाचे आयोजन करण्यात येणार आहे. उद्घाटनानंतर सकाळी १०.३० वाजता खुल्या मैदानी क्रीडा स्पर्धांना सुरुवात होणार असून पुढील सात दिवस जिल्ह्यात विविध ठिकाणी अनेक स्पर्धा, क्रीडा प्रात्यक्षिके व युवकांना प्रोत्साहन देणारे उपक्रम राबविण्यात येणार आहेत. जिल्ह्यातील सर्व खेळाडूंनी दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ९ वाजेपर्यंत तालुका क्रीडा संकुल, हिंगोली येथे उपस्थित राहावे, असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी राजेश्वर मारावार यांनी कळविले आहे.

### जयभवानी कला मंडळातर्फे जनजागृती



औंढा नागनाथ- औंढा तालुक्यातील शिरड शहापूर येथील जय भवानी कला मंडळ यांची महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था मुंबई, आणि जिल्हा रुग्णालय हिंगोली यांच्या आदेशानुसार हिंगोली जिल्ह्यांमध्ये जय भवानी कला मंडळ शिरड शहापूर,, प्रमुख नारायण गोविंदराव धोंगडे यांच्या मार्गदर्शनाखाली शेवाळा, कुर्तडी, गोळेगाव, घोटा देवी, बेलुरा या पाच गावांमध्ये एच आय व्ही तसेच एड्स वरती जनजागृती कार्यक्रम सादर करण्यासाठी शिरड शहापूर येथील नारायण धोंगडे, देविदास धोंगडे, शामराव धोंगडे, पांडुरंग धोंगडे, आनंद धोंगडे, वंदनाताई खरात, शाहीर रमेश गिरी, प्रेम धोंगडे यांची निवड करण्यात आली. दि १२ डिसेंबर ते १६ डिसेंबर या कालावधीत जय भवानी कला मंडळाचे कलापथक जनजागृती करणार आहे.

### २० ठिकाणी दारू अड्डयावर पोलिसांची धाड

हिंगोली- दारू बंदी कायद्यांतर्गत जिल्ह्यात विविध २० ठिकाणी पोलिसांनी अवैध दारू विक्री करणाऱ्यांवर धाडी मारल्या असून १९ हजार १९० रूपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. आरोपीताविरूध्द गुन्हे दाखल केले आहेत. तसेच अवैध वाहतुक व वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या २० वाहनांवर कार्यवाही केली आहे.

# जिल्हा वार्षिक योजना निधी मागणीचे प्रस्ताव सादर करा- गुप्ता

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**



जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२६ अंतर्गत दायित्वाचे व निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव आयपासवर अपलोड करुन निधी मागणीसाठी प्रस्ताव तात्काळ सादर करावेत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आढावा बैठकीत दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या या बैठकीस अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सुधीर ठोंबरे, जिल्हा नियोजन अधिकारी अनिता लव्हारे, सहायक जिल्हा नियोजन अधिकारी गं. गो. चितळे, प्रदीप नळगीरकर, समाज कल्याण सहायक आयुक्त गीता गुट्ठे, एकात्मिक आदिवासी विकास विभागाचे प्रकल्प अधिकारी सुनिल बारसे यांच्यासह सर्व विभागप्रमुख उपस्थित होते.

विविध विकास योजनांतील निधी वितरणासाठी संबंधित विभागांनी दायित्वाचे प्रस्ताव आयपासवर अपलोड करणे अत्यावश्यक आहे. प्रस्ताव अपलोड न झाल्यास निधी वितरीत करण्यात येणार नाही. वितरित निधी विहित पद्धतीचे पालन करून खर्च करावा. तसेच सन २०२६-२७ च्या वार्षिक योजनेचे प्रारूप आराखडे तात्काळ सादर करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिल्या.

या बैठकीत २०२५-२६ मधील नवीन कामांच्या प्रशासकीय मान्यता, निधी वितरण प्रक्रिया, सर्वसाधारण, अनुसूचित जाती उपयोजना, आदिवासी उपयोजना, पायाभूत सुविधा प्रकल्पांना युनिक आयडी देणे, पुनर्विनियोजन प्रस्ताव यावर सविस्तर आढावा घेण्यात आला. पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांसाठी महाराष्ट्र असेट रजिस्ट्रेशन सिस्टीम पोर्टलवरून युनिक आयडी घेण्याची कार्यवाही अनेक विभागांनी अद्याप सुरू केली नसल्याचे निदर्शनास आले आहे. याबाबत तातडीने कार्यवाही करण्याचे आदेश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

आरोग्य व शिक्षण विभागांनी सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रे, उपकेंद्रे, शाळा व महाविद्यालयांचे सोमवारपर्यंत जीओ मॅपिंग पूर्ण करून अपलोड करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तसेच सर्व विभागांनी जनपरिचय पोर्टलवरील नोंदणी पूर्ण करून पीएम गतिशक्ती पोर्टलवर प्रकल्पांची माहिती अपलोड करावी व प्रगती अहवाल तात्काळ सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी गुप्ता यांनी दिले.

या बैठकीत दिव्यांगांसाठी ५ टक्के राखीव निधी, सुगम इमारत संकल्पना, दिव्यांग छळ प्रतिबंधक कायद्याची अंमलबजावणी, बोगस दिव्यांग प्रमाणपत्रांवरील कारवाई, रेशनकार्ड वाटप, संजय गांधी निराधार योजनेतील वाढीव अनुदान, तसेच वार्षिक योजनेतील एक टक्का निधी खर्च आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. सार्वजनिक बांधकाम विभागाने सर्व शासकीय इमारतींचे सुगम इमारत निकषांनुसार क्रमांकन करून अहवाल सादर करण्याचे निर्देशही देण्यात आले.

दरम्यान, अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम १९८९ (सुधारित २०१५) अंतर्गत अत्याचाराच्या प्रकरणांतील मृत पीडितांच्या वारसांना शासकीय, निमशासकीय सेवेत गट-ड मधील नोकरी देण्यासाठी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा दक्षता व नियंत्रण समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीत प्राप्त १८ प्रस्तावांपैकी ४ प्रस्तावांना मान्यता देण्यात आली. या बैठकीस समितीचे सदस्य सचिव तथा समाज कल्याण सहायक आयुक्त गीता गुट्ठे व समितीचे अन्य सदस्य उपस्थित होते.

# मॉडर्न कॉलेजच्या विद्यार्थ्यांचा छळ? गुणपत्रिका न दिल्याने कुलगुरूंकडे तक्रार

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ डिसेंबर**



शिक्षणाचे मंदिर मानल्या जाणाऱ्या महाविद्यालयातच विद्यार्थ्यांची हेटाई होत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. मॉडर्न कॉलेज ऑफ कॉम्प्युटर सायन्स अँड आयटी (नांदेड) येथील एमएससर सीएस द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्याला अद्ययावत गुणपत्रिका न देता महिनोन्महिने चकरा लावायला लावल्या गेल्याचा गंभीर आरोप विद्यार्थी सुमेर सिद्दीकी यांनी केला आहे.

१७ एप्रिल २०२५ रोजी मी कॉलेजमध्ये जाऊन जुनी गुणपत्रिका जमा केली. 'उद्या मिळेल', 'परवा मिळेल', 'फाईल प्रक्रियेत आहे' अशी आश्वासने देत कॉलेज प्रशासनाने मला महिनोनमहिने फिरवत ठेवले. २९ मे ला महाविद्यालयाने स्वतः पत्र देऊन गुणपत्रिका मिळेल असे लिहूनही दिले, पण तेवढीही जबाबदारी त्यांनी पाळली नाही!

ही केवळ हलगर्जीपणा नसून विद्यार्थ्यांच्या भविष्यासोबत केलेला खेळ असल्याचा आरोप विद्यार्थ्याने केला आहे.त्याचा थेट फटका सुमेर सिद्दीकीला बसला. आयटी सेक्टरमध्ये इंटरव्ह्यू उत्तीर्ण होऊनही मास्टर डिग्रीचे अद्ययावत कागद नसल्याने त्याची अंतिम निवड थांबली. शिक्षण हातचे गेले, नोकरी हातची गेली, मानसिक त्रास वेगळाच!

शैक्षणिक संस्थेतील असा सुस्तपणा आणि बेफिकिरी खपवून घेतली जाणार नाही, असा संताप विद्यार्थ्यांत उसळला आहे. याप्रकरणी विद्यार्थ्याने थेट कुलगुरू, युजीसी, अध्यक्ष, राज्यपाल, तसेच उच्च व तंत्र शिक्षण मंत्री यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे. विद्यापीठ प्रशासनाला सतत अशा तक्रारी येत असताना प्रश्न असा विद्यार्थ्यांचे भवितव्य कोणी घालवणार, आणि जबाबदार कोण? आता संबंधित अधिकार्यांवर कारवाई होते की प्रकरण नेहमीप्रमाणे फाईलमध्येच पुरले जाते, याकडे विद्यार्थ्यांचे डोळे लागले आहेत.

# दराडे विद्यालयाचे सामूहीक नृत्य स्पर्धेत यश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ डिसेंबर**

भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय हिंगोली येथील विद्यार्थिनींनी लोकनृत्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला आहे.

मेरा युवा भारत हिंगोली युवा कार्यक्रम आणि खेळ मंत्रालय भारत सरकार याद्वारे लोकनृत्य स्पर्धा घेण्यात आली होती. सहभागी विद्यार्थ्यांमध्ये श्रद्धा वानखेडे, आर्या जाधव, प्रतिज्ञा अवचार, वैभवी शिंदे, कनिष्का चांदेकर, श्वेता खंदारे, राधिका अंभोरे, ज्ञानेश्वरी कुरवाडे, आरती धाबे तसेच आराधना भिसे या विद्यार्थिनी सहभागी होत्या. शाळेचे शिक्षक संजय गुट्टे यांनी मार्गदर्शन केले. विजयी संघाला रोख तीन हजार रुपये, प्रमाणपत्र तसेच ट्रॉफी देऊन सन्मानित करण्यात आले. तसेच शाळेमध्ये मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे, पर्यवेक्षक अनिल लोळेवार व भारत शिंदे यांनी संघाचा सत्कार केला. संस्थेचे अध्यक्ष, सचिव व सर्व संचालक यांनी सर्व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.यावेळी सर्व अध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांची या प्रसंगी उपस्थिती होती.

# माहूरगड पर्यटन विकास आराखड्यास अंतिम मान्यता मिळावी यासाठी आमदार भिमराव केराम यांचे सरकार दरबारी पाठपुरावा

भा वृतसेवा
केनवट, दि. १२ डिसेंबर-

किनवट-माहूर विधानसभा तदारसंघाचे आमदार भीमराव केराम ांनी श्री क्षेत्र माहूरगड पर्यटनस्थळाच्या मग्र विकासासाठी करण्यात आलेल्या ८२९.१३ कोटी रुपयांच्या भव्य विकास आराखड्यास अंतिम मान्यता मिळावी म्हणून राज्याच्या हिवाळी अधिवेशनामध्ये भेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, तसेच राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची विशेष भेट घेऊन आवश्यक निवेदन सादर केले.



नागपूर येथील महाराष्ट्र सुदूर संवेदन अनुप्रयोग केंद्रात मा. मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीची अत्यंत महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीत माहूरगड पर्यटन विकास आराखड्याबाबत अंतिम निर्णय होणार असल्याने, आराखड्यास तात्काळ मंजुरी मिळावी यासाठी आमदार केराम यांनी शासनदरबारी प्रखर पाठपुरावा सुरू केला आहे.

आमदार केराम यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना प्रत्यक्ष भेटून दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, श्री क्षेत्र माहूरगड हे प्रमुख शक्तिपीठ, श्री रेणुकामातेचे स्थळ, तसेच दत्तसंप्रदायाचे जन्मस्थान असून वर्षभर लाखो भाविक येथे भेट देतात परंतु विद्यमान सुविधा वाढत्या गर्दीपुढे अपुऱ्या पडतात. जिल्हाधिकारी नांदेड यांनी सादर केलेला ८२९.१३ कोटी रुपयांचा भव्य पर्यटन विकास आराखडा शासनाने ६ मे २०२५ रोजी तत्वतः मान्य केलेला आहे.

आता अंतिम मंजुरी उच्चाधिकार समितीकडून देणे अत्यावश्यक आहे. या अनुषंगाने, मुख्य सचिवांना आवश्यक त्या सूचना देऊन आराखड्यास अंतिम मान्यता मिळण्यास सहकार्य करावे, अशी विनंती त्यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांना केली. शासकीय पत्रव्यवहारास गती, मुख्य सचिवांची भेट घेतली सध्या राज्याचे हिवाळी अधिवेशन सुरु असुन अधिवेशनादरम्यान आमदार केराम यांनी मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांची भेट घेऊन, पर्यटक सुविधा, धार्मिक स्थळांचे संवर्धन, वाहतूक मार्ग, मूलभूत सोयीसुविधा, सुरक्षा व्यवस्थापन, रस्ते, पायाभूत सुविधा, सांस्कृतिक वारसा संवर्धन आदी सर्व मुद्द्यांवर सविस्तर चर्चा केली. त्यांनी मुख्य सचिवांना योजना किती जनहिताची व क्षेत्राच्या विकासासाठी अत्यावश्यक आहे हे स्पष्टपणे पटवून दिले व मंजुरीसाठी निवेदन दिले.

८२९.१३ कोटींचा विस्तृत मास्टर प्लॅन दोन टप्प्यात श्री रेणुकामाता मंदिर परिसर, दत्तशिखर, अनुसया माता स्थळ, वनदेव मंदिर, मातृतीर्थ कुंड, सोनापीर परिसर, शेख फरीद बाबा दर्गा परिसर, या सर्व ठिकाणांना समर्पक रस्ते, पार्किंग, पायाभूत सुविधा, धर्मशाळा, स्वच्छता, प्रकाशव्यवस्था, सुरक्षा व पर्यटन सुविधा उभारल्या जाणार आहेत.

**उच्चाधिकार समितीची महत्त्वपूर्ण बैठक सर्व विभागांना हजर राहण्याचे आदेश**

नियोजन विभागाने जारी केलेल्या पत्रानुसार (क्र. तीक्षेवि-२०२५/ प्र.क्र.३३/का.१४४४-अ) मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखालील बैठक आयोजित करण्यात आली असून वित्त, नगरविकास, सार्वजनिक बांधकाम, पर्यटन, सांस्कृतिक कार्य, पुरातत्व, जिल्हा प्रशासन, पोलीस विभाग आदी प्रमुखांनी हजर राहण्याचे आदेश दिले आहेत.

**माहूरगड विकासप्रदेशातील आर्थिक प्रगतीस नवी चालना**

आमदार केराम यांच्या म्हणण्यानुसार आराखडा मंजूर झाल्यास नांदेड, किनवट, माहूर परिसरातील पर्यटन वाढ,नवीन रोजगारनिर्मिती, स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना, परिवहन व संपर्क व्यवस्था सुधारणा, आंतरराष्ट्रीय दर्जाच्या पर्यटन सुविधांची निर्मिती होईल. माहूरगडच्या विकासाची लोकाभिलाषा लवकरच पूर्ण होईल आमदार भिमराव केराम यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना सांगितले की, माहूरगडचे सर्वांगीण व जागतिक दर्जाचे पर्यटनस्थळ म्हणून रूपांतर करणे ही माझीच नव्हे तर संपूर्ण मतदारसंघाची लोकाभिलाषा आहे. आराखड्यास अंतिम मंजुरी मिळावी यासाठी मी स्वतः शासनाच्या प्रत्येक स्तरावर पाठपुरावा करत आहे. मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांच्याशी केलेल्या चर्चेला सकारात्मक प्रतिसाद मिळत असून या प्रकल्पाला नक्कीच न्याय मिळेल.

# कोलंबीत ग्रामस्थांच्या एकजुटीतून उभारला वनराई बंधारा

तभा वृतसेवा
नायगाव, दि. १२ डिसेंबर-

नायगांव तालुक्यातील कोलंबी तील सकल ग्रामस्थांच्या संकल्पनेतून साकारलेल्या पाणी वाचवा, पाणी साठवा या संकल्पनेला मूर्तरूप देत ग्रामस्थांच्या एकजुटीने वनराई बंधाऱ्याची उभारणी करून लोक सहभागाचे अद्वितीय उदाहरण संपूर्ण जिल्ह्यात घालून दिले आहे. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत ग्रामस्थांनी श्रमदान, सामाजिक उत्तरदायित्व आणि सामूहिक भावनेतून गावालगतच्या ओढ्यावर हा बंधारा उभारला.

वनराई बंधारा हा कच्च्या स्वरूपातील पण अत्यंत परिणामकारक उपाय मानला जातो.या बंधाऱ्यामुळे पाणी साठवणूक,भूजल स्तर वाढ, तसेच मृदसंधारण साध्य होते. पाणी टंचाई सारख्या महत्त्वाच्या समस्ये वर मात करण्यासाठी हा बंधारा गावासाठी मोठी देणगी ठरणार आहे.



या उपक्रमात सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य, ग्रामपंचायत अधिकारी, तलाठी, कृषी सहायक या सह सर्व विभागांचे कर्मचारी,महिलापुरुष नागरिक अशा मोठ्या संख्येने ग्रामस्थांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. एकाच ध्येयाने प्रेरित होऊन ग्रामस्थांनी केलेल्या श्रमदानाने कोलंबी गावातील विकासाची दिशा अधिक मजबूत केली आहे.

गावाच्या सकल ग्रामस्थांच्या पुढाकारातून साकारलेला हा वनराई बंधारा केवळ पाण्याचा स्रोत नव्हे, तर जणू भविष्यातील कोलंबी ग्रामविकासाच्या नव्या उंचीची सुरुवात ठरली आहे.

# सरपंच संघटना पंचायत समितीला लावणार कुलूप

तभा वृतसेवा
हदगाव, दि. १२ डिसेंबर-

सरपंच संघटना हदगाव यांनी वेळोवेळी पंचायत समिती, जिल्हा परिषद व जिल्हाधिकारी.नांदेड यांना पत्रव्यवहार करून घरकुलाचे हप्ते मिळत नाहीत तसेच एमआरजीएस च्या माध्यमातून विहिरी बंदिस्त, नाली, सीसी रोड इत्यादी कामे दोन वर्षापासून सरपंचांनी आपल्या गावात मूलभूत सुविधा देण्यासाठी कामे केली आहेत पण दोन वर्षापासून कुशल बिल मिळत नाही. पंचवीस पंधरा ची कामे, गावातील नळ जोडणी, ग्रामपंचायत चे १५ व्या वित्त आयोगाचे हप्ते जमा होत नाहीत. जनसुविधाचे कामे करून सुद्धा दहा महिने झाले त्यांचे बिल मिळत नाहीत. सरपंच सदस्याचे पाच वर्षापासून मानधन मिळत नाही, मीटिंगचे भत्ता आज पर्यंत दिला गेला नाही तसेच कर्मचारी वेळेवर हजर राहत नाहीत फक्त वेळ काढूपणा करत आहेत अशा अनेक अडचणीला सरपंच संघटना व्यथा सांगून प्रत्येक कार्यालयाला चकरा मारून मारून सरपंच संघटना थकली आहे लोकप्रतिनिधी सुद्धा या बाबीकडे लक्ष देत नसल्यामुळे आता हीच वेळ आली आहे त्यामुळे नाक दाबल्याशिवाय तोंड उघडत नाही अशी गत शासनाची व प्रशासनाची झालेली आहे त्यामुळे लवकरच पंचायत समिती कार्यालयाला कुलूप लावण्याचे ठरवले आहे .याची दखल आठ दिवसाच्या आत नाही घेतल्यास पुढील कारवाई करण्यात येईल अशी चर्चा सरपंच संघटनेच्या वतीने चालू आहे.

## श्री समर्थ रामदास स्वामींच्या चरण पादुकांचे २० रोजी नांदेड येथे आगमन

**नांदेड** -सद्गुरू श्री समर्थ रामदास स्वामींच्या चरण पादुकांचे शनिवार, दि. २० डिसेंबर रोजी श्री हनुमान मंदिर, अशोकनगर येथे आगमन होणार असून २९ डिसेंबर पर्यंत मुक्कामी असणार आहेत. भाविकांना श्री समर्थांच्या चरण पादुकांचा अभिषेक व पूजा आपल्या निवासस्थानी पादुका घेऊन जाऊन करता येणार आहे. तसेच सकाळी ८ ते दुपारी १२ पर्यंत नांदेड शहरात विविध ठिकाणी भिक्षाफेरी असणार आहे. ज्या विभागात भिक्षाफेरी जाणार आहे, तेथे पूर्वसंध्येला कळविण्यात येईल. श्री हनुमान मंदिर, अशोकनगर येथे पहाटे ५ वाजता भुपाळी, काकडा आरती, अभिषेक, पूजा, आरती तथा दुपारी भजन, सायंकाळी उपासना आणि रात्री ८.३० वाजता सुश्राव्य कीर्तन आदी कार्यक्रम संपन्न होणार आहेत. भाविकांनी दर्शनाचा व श्रवणाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संयोजकांनी केले आहे. चरण पादुकांची पाद्यपूजा तथा भिक्षाफेरीच्या माहितीकरिता कृपया रघुवीर मोरे ९४२२८७४४११, रमेश कन्नावार ९७६४१११४११, बंडोपंत कुंटूरकर ९४०३७४४४४९, रमेश भायेकर ८७८८४०१३५२ व जगदीश कुंटूरकर ९१७५९००६३६ या क्रमांकावर भाविकांनी संपर्क साधावा.

## शिवराज पाटील यांच्या निधनाने पितृतुल्य मार्गदर्शक हरपला : खा. चव्हाण

**नांदेड** -लोकसभेचे माजी अध्यक्ष व माजी केंद्रीय गृहमंत्री शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाने पितृतुल्य मार्गदर्शक हरपल्याचे माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे. शिवराज पाटील चाकूरकर यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त करताना ते म्हणाले की, देशाचे एक व्यासंगी व कणखर नेतृत्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. राष्ट्रीय राजकारणात ते महाराष्ट्राचा एक चेहरा होते. त्यांनी आयुष्यभर सार्वजनिक प्रश्नांना अग्रक्रम दिला आणि देशसेवा केली. केंद्रीय गृहमंत्री म्हणून त्यांनी अनेक दूरदर्शी धोरणे अवलंबली. त्या धोरणांचा प्रभाव व सकारात्मक परिणाम आजही दिसून येतो. राजकारण, समाजकारण व प्रशासनात त्यांनी दिलेले योगदान चिरंतर राहिल. शिवराज पाटील चाकूरकर यांचे निधन माझ्यासाठी मोठी वैयक्तिक हानी आहे. डॉ. शंकरराव चव्हाण व त्यांचे बंधुत्वाचे नाते होते. मागील अनेक वर्षांपासून दोन्ही कुटुंबात आत्मियतेचे संबंध राहिले आहेत. सार्वजनिक कार्यात त्यांनी मला नेहमीच मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केल्याचे खा. अशोकराव चव्हाण यांनी म्हटले आहे.

## कर्जबाजारी शेतकरी महिलेची आत्महत्या

**माहूर**-माहूर तालुक्यातील मौजे मच्छिंद्र पार्डी दासू नाईक तांडा येथील एका कर्जबाजारी शेतकरी महिलेने राहत्या घरी सकाळी पाच वाजता विषारी औषध प्राशन केल्याने घरच्या मंडळींनी तिला वाई



बाजार आणि माहूर येथील रुग्णालयात दाखल केले असता तिची उपचारादरम्यान प्राणज्योत मालवल्याची हृदयद्रावक तेवढीच खळबळजनक घटना दि.१२ रोजी घडल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे. माहूर तालुक्यातील मौजे मच्छिंद्र पार्डी दासू नाईक तांडा येथील सुनिता परसराम राठोड वय ४९ वर्षे यांची माहूर शिवारात गट नंबर ८३ मध्ये पाच एकर कोरडवाहू शेती आहे. त्यांचेवर भारतीय स्टेट बँक शाखा, माहूरचे एक लाख रुपये कर्ज असल्याचे समजते. तसेच बचत गटांचे कर्ज असल्याने बँकेकडून व बचत गटाकडून सततचा तगादा झाल्याने त्यांना सदरील आर्थिक व मानसिक त्रास सहन झाला नाही. त्यामुळे दि. १२ डिसेंबर रोजी सकाळी ५ वाजता राहत्या घरात त्यांनी विषारी औषध प्राशन केले. सदरील घटना त्यांचे पती परसराम राठोड व मुलगा यांना कळाल्याने त्यांनी लगेच त्यांना महेंद्र चव्हाण, गणपत मडावी यांच्या मदतीने वाईबाजार येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात दाखल केले.तेथे परिस्थिती आणखी बिघडल्याने त्यांना माहूर येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल केले असता त्यांची उपचार सुरू असताना प्राणज्योत मालवली. उपचारादरम्यान त्यांचे निधन झाल्याने पोलीस निरीक्षक देविदास चोपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक प्रकाश गेडाम, पोलीस नाईक सत्यपाल मडावी यांचे सह पोलिसांनी घटनेची नोंद घेतली. डॉ.बिपिन बाबळे यांनी मयताचे शवविच्छेदन केले. त्यांचे पश्चात पती,सासू, मुलगा असा परिवार असून बँकांचा तगादा आणि बचत गटांचे एजंट वेळोवेळी कर्जाची मागणी करत त्रस्त करून सोडत असल्याने पुरुष कर्जबाजारी शेतकऱ्यासह आता महिला कर्जबाजारी शेतकऱ्यावरही आत्महत्या करण्याची गंभीर पाळी येत असल्याने शासनाने सर्व प्रकारची कर्ज वसुली तात्काळ थांबवून मयतांच्या वारसांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी होत आहे.

## केंद्रस्तरीय शिक्षण परिषद उत्साहात

**नांदेड**- शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र राज्य व जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने निर्देशित लोहा तालुक्यातील समुह साधन केंद्र शेवडी बाजीरावची पाचवी केंद्रस्तरीय शिक्षण परिषद जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जवळा देशमुख येथे अत्यंत उत्साहात संपन्न झाली.

## जिल्ह्यात जमावबंदी, शस्त्रबंदी आदेश लागू

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १२ डिसेंबर-

जिल्ह्यात १३ डिसेंबर २०२५ चे ६ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२५ मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहणार आहे, अशी माहिती अपर जिल्हादंडाधिकारी कार्यालयाकडून देण्यात आली आहे.

कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी म्हणून अपर जिल्हादंडाधिकारी यांनी महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) व (३) अन्वये जिल्ह्यात १३ डिसेंबर २०२५ चे सकाळी ६ वाजेपासून ते २७ डिसेंबर २०२५ च्या मध्यरात्री पर्यंत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश लागू राहील. त्यानुसार पाच किंवा पाचपेक्षा अधिक व्यक्तींनी या आदेशात नमुद असलेली कृत्ये सार्वजनिक परिसर किंवा त्याच्या जवळपास करण्यास बंदी घालण्यात आली आहे. हा आदेश कामावरील पोलीस अधिकारी, शासकीय कर्मचारी, विवाह, अंत्ययात्रा, धार्मिक कार्यक्रम, यात्रा व इतर सक्षम अधिकारी यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुकांना लागू होणार नाही.

अशा मिरवणुकांना परवानगी देण्याचे अधिकार तसेच पाच व पाचपेक्षा जास्त इसम जमण्यासाठी, सभा, मिरवणुका, मोर्चा काढणे, ध्वनीक्षेपक वाजविण्यास परवानगी देण्याचे अधिकार जिल्ह्यातील पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना तसेच पोलीस अधीक्षक नांदेड यांनी प्राधिकृत केलेल्या इतर पोलीस अधिकारी यांना राहतील.

# घरकुल लाभार्थ्यांची थकीत रक्कम तात्काळ जमा करा अन्यथा आंदोलन

तभा वृतसेवा
कंधार, दि. १२ डिसेंबर-

तालुक्यात पंतप्रधान आवास योजना, मोदी आवास आणि रमाई आवास योजनेंतर्गत लाभधारकांच्या घरकुल हप्त्यांच्या रक्कमेचे वितरण मागील तीन ते चार महिन्यांपासून थांबले आहे हि रक्कम त्वरित लाभार्थ्यांच्या खात्यात जमा नाही केल्यास तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा गट विकास अधिकारी कंधार यांना शिवसेना तालुका कंधारच्या वतीने एका निवेदनाद्वारे देण्यात आला आहे.

निवेदनात म्हटले आहे की, तालुक्यातील नागरिकांनी अनेक वेळा पंचायत समिती कार्यालयात येऊन विनंत्या केल्या, थेट अधिकाऱ्यांना भेटून तसेच दूरध्वनीवरही संपर्क साधूनही डिएसी बंद असल्याचे किंवा बजेट उपलब्ध नसल्याचे कारण देत काम पुढे ढकलले जात आहे. नांदेड जिल्ह्यातील इतर सर्व तालुक्यांमध्ये घरकुल हप्त्यांची रक्कम नियमित वितरित होत असताना केवळ कंधार तालुक्यातच डिएसी बंद असल्याने हजारो लाभधारक अडचणीत आहेत, अशी टीका निवेदनात करण्यात



आली आहे.

शिवसेनेने गटविकास अधिकाऱ्यांवर निष्क्रियतेचा आरोप करताना कॉन्ट्रॅक्ट बेसवरील जे.ई. आणि कॉम्प्युटर ऑपरेटर यांच्या संगनमताने बिले काढण्यासाठी लाभधारकांची आर्थिक पिळवणूक होत असल्याचा गंभीर आरोपही केला आहे. शिवसेनेने १५ डिसेंबर २०२५ पर्यंत डिएसी सुरु करून सर्व योजनेतील लाभधारकांच्या खात्यावर रक्कम जमा न झाल्यास पंचायत समिती कार्यालयात तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. या निवेदनाची प्रत उपविभागीय अधिकारी, जिल्हा परिषद मुख्याधिकारी, प्रकल्प संचालक, तहसीलदार, पोलीस निरीक्षक यांच्यासह संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आली आहे.

निवेदनावर तालुकाप्रमुख परमेश्वर पाटील जाधव आणि तालुका संघटक पंडित देवकांबळे अच्युतराव मेटकर आदींची स्वाक्षरी आहे. कंधार तालुक्यातील लाभधारकांच्या समस्या तातडीने सोडवण्याची मागणी सध्या जोर धरत असून प्रशासन यावर कोणती भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# शेतकरी बिबट्याच्या भीतीत

तभा वृतसेवा
इस्लापूर, दि. १२ डिसेंबर-

किनवट तालुक्यातील ईस्लापूर परिसरात गेल्या दहा-बारा दिवसापासून बिबट्याच्या दहशतीमुळे परिसर सध्या भीतीच्या वातावरणात असल्यामुळे शेतकऱ्याचे रब्बी हंगामाचे कामे खोळंबले आहेत. त्यामुळे जंगल व्यतिरिक्त शेत शिवारात हिंस्र प्राण्याचे वावर वाढल्याकारणाने शेतकरी मुठीत जीव घेऊन शेतातील कामे करत असल्याचे चित्र आहे.

सविस्तर वृत्त असे की गेल्या काही दिवसाखाली हिमायतनगर तालुक्यातील वडगाव गावातील एका शेतकऱ्याला शेतात काम करत असताना अचानक बिबट्याने हल्ला केला जवळच असलेल्या बैलाने बिबट्यावर धावून गेल्यामुळे मालकाला जिव वाचवल्याची वृत्त काही दिवसाखाली ऐकण्यात मिळाली या बिबट्याच्या हल्ल्याची घटना परिसरात वाऱ्यासारखी पसरल्यामुळे शेतकऱ्यांना शेती कामासाठी मजूरच मिळत नसल्याचे चित्र असल्यामुळे संबंधित वन विभागाने उपाययोजना करून दहशत माजवत असलेल्या बिबट्याची शोध मोहीम करून जेरबंद करावे अशी मागणी परिसरातील जनते कडून होत आहे .जिल्ह्यात बिबट्याची संख्या अधिकच वाढल्याची माहिती असल्यामुळे शेतकऱ्यांनी सतर्क पूर्व काम करावे अशी सूचना देखील संबंधित विभागाकडून केली जात आहे.

**वनविभागाचे आवाहन**

टार्चचा वापर करा , हातात घुंगराची काठी ठेवा , मोबाईलवर गाणे वाजवा ,लहान मुले व वृद्धांना बाहेर एकटे सोडू नका , पशुधन जाळी बंद बंदिस्तगोठ्यात बांधा, शेतात व घराबाहेर झोपू नका`तकऱ्यांनी सतर्क रहावे. ग्रुपने राहावे ,गाणे वाजवावे ,एकमेकांशी बोलणे करावे . एकटे शेतात काम करण टाळावे असे आवाहन वनपरिक्षेत्र अधिकारी सचिन धनगे यांनी केले.

# शेतीला दिवसा वीज पुरवठा करा: आ. श्रीजया चव्हाण यांची विधानसभेत मागणी

तभा वृतसेवा
नांदेड, दि. १२ डिसेंबर-

बिबट्यांसारख्या वन्यप्राण्यांचे हल्ले होण्याच्या घटना सतत होत असल्याच्या पार्श्वभूमिवर शेतीला रात्रीऐवजी दिवसा वीज पुरवठा करण्याची मागणी भोकर विधानसभा मतदारसंघाच्या भाजप आमदार श्रीजया चव्हाण यांनी आज विधानसभेत केली.

सभागृहात मागणी केल्यानंतर याबाबत माहिती देताना त्या म्हणाल्या की, सध्याच्या काळात ऊस, केळी, गहू, हरभरा, हळद सारख्या पिकांना पाणी देण्याची गरज असते. त्यासाठी पंप सुरु करायला शेतकऱ्यांना शेतात जावे लागते. सध्या शेतीला शिफ्टमध्ये वीज पुरवठा केला जातो. वीज पुरवठ्याची वेळ रात्रीची असेल तर शेतकऱ्यांना नाईलाजाने रात्रीच्या अंधारात शेतात जावे लागते. रात्रीच्या वेळी वन्यप्राण्यांचे हल्ले होण्याची शक्यता जास्त असते. वन्य प्राण्यांच्या



वाढत्या हल्ल्यांमुळे शेतकऱ्यांमध्ये भीती निर्माण झालेली आहे. या पार्श्वभूमिवर शेतीला दिवसाच्या काळातच सकाळी ६ ते सायंकाळी ६ पर्यंत वीज पुरवठा करणे आवश्यक आहे. त्यानुसार वीज पुरवठ्याच्या वेळापत्रकात आवश्यक त्या सुधारणा तात्काळ कराव्यात, अशी मागणी नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या वतीने केल्याचे आ. श्रीजया चव्हाण यांनी सांगितले.



**नांदेड- निवासी उपजिल्हाधिकारी, नांदेड यांच्या अध्यक्षतेखाली सर्वोच्च न्यायालयाने भटक्या श्वानांच्या संदर्भात दिलेल्या निर्देशांच्या अनुषंगाने दि.१० डीसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व शहरी व ग्रामीण स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कार्यवाही करणेबाबत सर्व संबंधित यंत्रणा यांची एक बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत करावयाच्या उपाययोजना बाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले व अनुपालन करून पूर्ततेचा अहवाल सादर करण्याबाबत निर्देश देण्यात आले.**

# जिल्हाधिकाऱ्यांनी उडविले कृषी ड्रोन; सगरोळीतील ड्रोन प्रशिक्षण केंद्राची केली पाहणी

तभा वृतसेवा
बिलोली, दि. १२ डिसेंबर-

भविष्यात कृषी सर्वेक्षण आणि मॅपिंग,आपत्ती व्यवस्थापन,संरक्षण, चित्रीकरण, वाहतूक आदी क्षेत्रामध्ये विविध कामांसाठी ड्रोनचा मोठ्या प्रमाणात वापर होणार आहे.या क्षेत्रात रोजगाराची असलेली मोठी संधी लक्षात घेऊन ग्रामीण भागातील तरुणांना प्रशिक्षणाच्या माध्यमातून कौशल्य प्राप्त करता यावे म्हणून सगरोळी (ता. बिलोली) येथील संस्कृती संवर्धन मंडळ संस्थेच्या उद्यमिता लर्निंग सेंटरतर्फे ड्रोन प्रशिक्षण केंद्राची सुरुवात करण्यात आली असून गत आठवड्यात या प्रशिक्षण केंद्राची पाहणी मा. जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी



करून स्वतः पिकांवर फवारणीसाठी वापरण्यात येणाऱ्या अत्याधुनिक ड्रोन हाताळणीचा अनुभव घेतला.

येथील संस्कृती संवर्धन मंडळ व दक्षा अनमॅनड सिस्टीम प्रायव्हेट लिमिटेड, चेन्नई (कोरोमंडल इंटरनॅशनल लिमिटेड) यांच्यामध्ये हे प्रशिक्षण केंद्र सुरू करण्या साठी सामंजस्य करार झाला आहे. या प्रशिक्षण केंद्रात विविध कामासाठी उपयुक्त अत्याधुनिक ड्रोन उडविण्याचे सखोल व व्यावसायिक प्रशिक्षण देण्यात येणार असून यामध्ये संगणक-सिम्युलेटर प्रशिक्षण, मूलभूत जोडणी व देखभाल याचेही प्रशिक्षण मिळणार आहे. याकरिता नागेश गुप्ता व रोहित चौधरी या तज्ञ प्रशिक्षकांमार्फत प्रशिक्षण देण्यात येणार आहे. हे प्रशिक्षण पूर्ण झाल्या नंतर प्रशिक्षणार्थ्यांना १० वर्षासाठी ड्रोन उडविण्यासाठी चा परवाना प्राप्त होईल याचा उपयोग ड्रोन खरेदीसाठी सुद्धा होणार आहे. हे प्रशिक्षण केंद्र भारत सरकार मान्यता प्राप्त असून महाराष्ट्राच्या ग्रामीण भागातील हे पहिले प्रशिक्षण केंद्र आहे.

या प्रशिक्षण केंद्राची पाहणी केल्यानंतर जिल्हाधिकारी कर्डिले यांनी, जिल्ह्यातील तरुणांसाठी रोजगाराची ही एक सुवर्णसंधी असून तरुणांनी किसान ड्रोन,यांत्रिकीकरण,नमो ड्रोन दिदी,कृषी समृद्धी सारख्या विविध शासकीय योजना चा फायदा घ्यावा असे आवाहन केले त्यांनी जिल्ह्यात अनेक कामासाठी या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करता येईल याकरिता जिल्हा प्रशासन देखील सहकार्य करेल असे सांगितले.

यावेळी संस्कृती संवर्धन मंडळाचे चेअरमन प्रमोद देशमुख, सचिव डॉ. जयंत जकाते, जनसंपर्क अधिकारी अभिजीत महाजन, उपजिल्हाधिकारी अनुप पाटील, क्रांती डोंबे, कृषी विज्ञान केंद्राच्या प्रमुख माधुरी रेवणवार, प्रशिक्षण समन्वयक व्यंकट शिंदे, परिसरातील शेतकरी आदींची उपस्थिती होती.